# प्रकरण तीन

## लघुपाटबंधारे विभाग

**3.338 उर्से अंबिस्ते पक्का बंधारा, तालुका डहाणू.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांनी उर्से अंबिस्ते पक्का बंधारा, तालुका डहाणू या कामी शासकीय निधीमधून रक्कम रुपये 13,68,319/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामासाठी रुपये 13,30,000/- इतकी वित्तीय तरतूद उपलब्ध असतांना रुपये 13,68,319/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. वित्तीय तरतूदीपेक्षा रुपये 38,319/- इतका जादा खर्च झालेला आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम क्रमांक 87 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 नुसार सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची प्रयोगशाळा चाचणी करण्यात आलेली नाही.

3) सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक जीआर/34/सा-4/5999, दिनांक 08/01/2007 नुसार बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या सिमेंटची गुणनियंत्रण यंत्रणेमार्फत चाचणी करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33,दिनांक 22/12/2000 नुसार मोजमाप पुस्तकावर शाखा अभियंता यांनी दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968, नियम क्रमांक 168 (1) (अ) नुसार सदर कामाची अंतिम मोजमापे उपअभियंता यांनी तपासणी केल्याचे दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन क्रमांक नागरी-2011/प्र.क्र.192/जल1, दिनांक 02/02/2012 नुसार सदर कामासाठी सहकारी पाणी वापर संस्थेची स्थापना करून कार्यारंभ आदेश दिल्याचे दिसून येत नाही. तथापि सहकारी पाणी वापर संस्थेची स्थापना करण्यासाठी अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 1 नुसार रुपये 10,000/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु संस्था स्थापन केल्याचे नोंदणी प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

6) सदर कामात बाब क्रमांक 1,2,5,6,9,10,15 मध्ये 99,764/- रुपयाची बचत आणि बाब क्रमांक 3,4,7,8,11,13,14 व 16 मध्ये मंजूर प्राकलनापेक्षा रुपये 2,05,105/- इतके जादा रकमेचे काम कार्यान्वित केलेले असून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968, नियम क्रमांक 118 नुसार सक्षम प्राधिका-याचे परवानगी घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

7) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2000/प्र.क्र.85,दिनांक 11/06/2004 नुसार अंदाजपत्रक वस्तुनिष्ठ परिस्थितीवर आधारित असल्याचे दिसून येत नाही.

8) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका नियम क्रमांक 261 नुसार सक्षम प्राधिका-याचे परवानगीशिवाय प्रस्तुत कामी करण्यात आलेली बचत रुपये 2,05,105/- अंदाजपत्रकातील इतर बाबींसाठी वापरल्याचे दिसून येते.

**3.339 उचाट कोप बंधारा दुरूस्ती, तालुका वाडा.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद ठाणे यांनी सन 2014-2015 मध्ये उचाट व गेप बंधारा दुरुस्ती करण्याकरीता एकूण रक्कम रुपये 35,44,987/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 2001/प्रक्र104/जल1,दिनांक 01/01/2002 मध्ये निर्देशित केल्यानुसार प्रशासकीय मान्यतेपुर्वी अधिक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, ठाणे यांची मान्यता घेतल्याचा अभिलेख नस्तीमध्ये दिसून आला नाही.

2) विभागाने सादर केलेल्या प्रस्तावात सदरचे काम 1984 मध्ये करण्यात आल्याचे नमूद करून मूळ कामावर रक्कम रुपये 6,62,000/- इतका खर्च झालेला असल्याचे नमूद केले आहे. सन 2014-2015 अखेर या कामावर रूपये 36,15,341/- इतका दुरूस्तीसाठीचा खर्च केला आहे. हे तांत्रिकदृष्टया कसे समर्थनीय आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका, नियम 261 नुसार अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये. मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही. म्हणून या प्रकरणी, रक्कम रूपये 5,07,599/- इतकी बचत प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे इतर भागातील कामासाठी वापरल्याचे दिसून येते. हे नियमबाहय आहे.

**3.340 दूधनोली वळण बंधारा, तालुका मुरबाड.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत लाघुपाटबंधारे विभाग यांनी सन 2014-2015 मध्ये दुधनोली वळण बंधारा ता.मुरबाड च्या बांधकामासाठी एकूण राक्कम रुपये 11,37,934/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) या कामाच्या प्रति हेक्टरी Benefit Ratio नुसार बंधाऱ्याच्या लाभ क्षेत्रातील लाभधारकांना प्रति हेक्टरी रूपये 76,609/- इतके वार्षिक उत्पन्न मिळेल असे गृहीत धरून कामात प्रशासकीय, वित्तीय व तांत्रिक मान्यता देऊन या कामावर रूपये 11,37,934/- इतका खर्च केलेला आहे. कामाचा Benefit Ratio ठरवितांना प्रकल्पाची महत्तम उपयोगिता कृषी विभागाकडून निश्चित करून घेणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 2001/प्रक्र104/जल 1,दिनांक 01/01/2002 मध्ये निर्देशित केल्यानुसार प्रशासकीय मान्यतेपूर्वी अधिक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, ठाणे यांची मान्यता घेतल्याचा अभिलेख नस्तीमध्ये दिसून आला नाही.

3) या कामाच्या बाब क्र. 2,3,4,5,6,8,9,11,12,13,14,15 मध्ये मिळून एकूण रूपये 2,50,956/- इतक्या रकमेची बचत करून मूळ प्राकलनानुसार काम कार्यान्वित केल्याचे दिसून येत नाही. तसेच या कामाच्या बाब क्र.1,7 मध्ये मिळून मंजूर प्राकलनापेक्षा रूपये 10,933/- इतक्या रकमेचे जादा काम कार्यान्वित केल्याचे दिसून येते. सबब या बाबीमध्ये सुध्दा सुधारीत मंजूर प्राकलनानुसार काम केल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2008/ प्र.क्र.85,दिनांक 11/06/2004 नुसार कामाचे अंदाजपत्रक काळजीपूर्वक व वस्तुनिष्ठ परिस्थितीवर तयार करणे आवश्यक आहे. कार्यान्वित केलेल्या कामनिहाय बाबीचे अवलोकन केले असता, अंदाजपत्रक वस्तुनिष्ठ परिस्थितीवर व काळजीपूर्वक तयार केल्याचे दिसून येत नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक लपायो 2001/प्र.क्र.104/जल1, दिनांक 01/01/2002 नुसार बांधकामाचे देयक मंजूर करताना या बांधकामाचा गुणनियंत्रण चाचणी अहवाल जो शासकीय गुणनियंत्रणेमार्फत करण्यात आला आहे तो देयकांसोबत जोडणे आवश्यक असून त्यानंतर त्या बाधकामाचे प्रदान करावे. या प्रकरणी, शासकीय गुणनियंत्रण चाचणी यंत्रणेमार्फत बांधकामाचा गुणनियंत्रण चाचणी अहवाल घेतल्याचे दिसून आले नाही.

**3.341 कौलाळे येथे बंधारा बांधणे, तालुका जव्हार.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत लघुपाठबंधारे यांनी कौलाळे तालुका जव्हार येथे बंधारा बांधणे या कामाकरिता एकूण रक्कम रुपये 10,26,281/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका नियम 261 नुसार अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये. मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून

दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही म्हणून या प्रकरणी, रूपये 2,26,016**/-** इतकी बचत प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे इतर भागातील कामासाठी वापरल्याचे दिसून येते हे नियमबाहय आहे.

2) या कामाची बाब क्र. 5 मध्ये 1:3:6 या प्रमाणात 393.57 घनमीटर इतके सिमेंट कॉंक्रिटीकरण बंधाऱ्याच्या भक्कमीकरणासाठी अंदाजपत्रकीय प्राकलनात मंजूर केले आहे. प्रत्यक्षात या बाबीवर 312.82 घनमीटर इतके सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम केल्याचे दिसून आले. मंजूर प्राकलनापेक्षा या बाबी वर 20.52 टक्के मंजूर प्राकलनापेक्षा कमी काम कार्यान्वित केल्याने बंधाऱ्याचा गुणात्मक दर्जा योग्य असल्याची खात्री होत नाही खुलासा होणे आवश्यक आहे.

3) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांची अधिसूचना दिनांक 04/04/2012 अन्वये क्रमांक विसाअ(मुख्या)1/मुवक/2005/97 महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 (2005 चा महा.9) च्या उपकलम 1 च्या खंड (ख) च्या उपखंड (1) अन्वये दिनांक 01/04/2012 पासून मूल्यवर्धित कराच्या वसुल करावयाच्या टक्केवारीमध्ये सुधारणा करुन पूर्वीच्या 4 टक्के ऐवजी 5 टक्के दराने मूल्यवर्धित कराची वसुली करणेबाबत सुधारणा केली आहे. या कामाच्या देयकामधून देयकाच्या 5 टक्के रक्कम रुपये 51,344/- वसुल करणे आवश्यक होते. प्रत्यक्षात या देयकामधून रुपये 48,070/- इतकी मूल्यवर्धित कराची वसुली केली आहे. उर्वरित रक्कम रुपये 3,244/- ची वसुली करुन संबंधित शासन लेखाशिर्षाखाली भरणा करावी.

**3.342 वाडा खडकोना पक्का बंधारा, तालुका पालघर.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत लघुपाठबंधारे विभाग यांनी सन 2014-2015 वाडा खाड्कोना तालुका पालघर येथे पक्का बंधारा बांधणेकरिता एकूण रक्कम रुपये 19,69,965/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) या कामाच्या बाब क्र. 1,3,6,9,10,13,15,16 मध्ये मिळून एकूण रूपये 1,40,191/- इतक्या रकमेची बचत करून मूळ प्राकलनानुसार काम कार्यान्वित केल्याचे दिसून येत नाही. तसेच या कामाच्या बाब क्र. 2,4,5,7,8,11,14 मध्ये मिळून मंजूर प्राकलनापेक्षा रूपये 1,27,476/- इतक्या रकमेचे जादा काम कार्यान्वित केल्याचे दिसून येते. सबब या बाबीमध्ये सुध्दा मूळ मंजूर प्राकलनानुसार काम केल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम क्रमांक 118 नुसार मूळ अंदाजपत्रकात महत्वाचे घटनात्मक बदल आवश्यक असल्यास मूळ मंजूरी प्राधिकाऱ्याची परवानगी / आदेश घेणे आवश्यक आहे. वरील बाबीचे अवलोकन करता, या प्रकरणी, अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. परिणामी, मंजूर तांत्रिक प्राकलनापेक्षा बाबनिहाय कमी जादा खर्च केल्याचे दिसून आले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील नियम क्रमांक 261 नुसार मंजूर अंदाजपत्रकानुसारच काम करण्यात येत असल्याचे खातरजमा करण्याची जवाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता / अधीक्षक अभियंता यांची राहील असे ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 02/02/2012 मध्ये नमूद करण्यात आले आहे.

2) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2008/प्र.क्र.85, दिनांक 11/06/2004 नुसार कामाचे अंदाजपत्रक काळजीपूर्वक व वस्तुनिष्ठ परिस्थितीवर तयार करणे आवश्यक आहे. कार्यान्वित केलेल्या कामनिहाय बाबीचे अवलोकन केले असता, अंदाजपत्रक वस्तुनिष्ठ परिस्थितीवर व काळजीपूर्वक तयार केल्याचे दिसून येत नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८७ व ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक सिमेंट/1099/प्रक्र 56/35,दिनांक 30/06/2000 तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक जीआर/34/सा-4/5999,दिनांक 08/01/2007 नुसार बांधकाम साहित्याचा वापर करण्यापूर्वी साहित्य वापरास योग्य असल्याचा प्रयोगशाळा चाचणी अहवाल प्राप्त केल्यानंतर साहित्याचा वापर करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.343 कालेली, तालुका कुडाळ अंगणवाडी इमारत बांधणे.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** कालेली, तालुका कुडाळ येथील अंगणवाडी इमारत बांधणेकामी अभिकरण योजनेतून रक्कम रुपये 4,27,968/- एवढा खर्च करण्यात आला. सदर कामाची कार्यनस्ती तपासली असता खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाचा नामफलक “लोखंडी नामफलक” असल्याचा उल्लेख आहे. परंतु कार्यनस्तीतील छायाचित्र पाहिले असता तो डिजिटल नामफलक लावल्याचे दिसते. त्यामुळे प्रदान केलेली रक्कम रुपये 3,723/- संबंधितांकडून वसुल करण्यात यावी.

2) कामाचे प्रदान तीन वेळा वेगवेगळया देयकाने मक्तेदारास केले आहे. त्याची पडताळणी केली असता सुरुवातीचे दोन देयकाचे वेळी मोजमाप वहीत मक्तेदार यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

3) सदर कामाची मुदत दिनांक 16/7/2012 रोजी संपत असताना मुदतवाढीसाठी मक्तेदार यांनी कामाच्या मुदतवाढीसाठी निविदा अटी व शर्ती 6 अन्वये 15 दिवस अगोदर पत्रव्यवहार करणे आवश्यक होते. परंतु मक्तेदार यांनी कामाच्या मुदतवाढीसाठी दिनांक 28/2/2013 रोजीअर्ज करुन दिनांक 31/5/2013 पर्यंत मुदतवाढ मागितली. परंतु मक्तेदार यांनी या मुदतीतही काम पूर्ण न करता पुन्हा दिनांक 28/2/2015 रोजी अर्ज केला आहे. अशावेळीही कार्यालयाने मक्तेदार यांचेवर कोणतीही कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही. सदर काम दीर्घकाळ का प्रलंबित राहीले ?

4) नस्तीत जोडण्यात आलेले कामाचे छायाचित्र हे त्याच कामाचे असल्याबाबत कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग यांनी साक्षांकित केलेले नाही.

5) प्रथम व व्दितीय देयकावर मक्तेदार यांची स्वाक्षरी नाही.

**3.344 सिमेंट प्लग बंधारा कजवाडे, तालुका मालेगांव, जिल्हा नाशिक.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 151) -** सिमेंट प्लग बंधारा कजवाडे, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक यासाठी रक्कम रूपये4,94,000 /- खर्च करणेत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रस्तुत कामाच्या संचिकेत संलग्न कामाच्या वाढ - घट तक्त्यानुसार बाब क्रमांक 1,3,6,9,11 मध्ये रक्कम रुपये 38,022/- जास्त केलेला खर्च आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 120 (2) प्रमाणे अंदाजपत्रकातील काही बाबींचे काम न केल्यामुळे होणारी बचत इतर बाबींवर खर्च करता येणार नाही. तसेच नियम 153 (1) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्याची जबाबदारी मक्तेदाराची आहे. उपरोक्त कामावर एका बाबीं वर बचत करुन अन्य बाबीवर अधिक खर्च केलेला असल्याने नियम 153 (2) नुसार सक्षम प्राधिकाऱ्यांची लेखी मान्यता घेतलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 नियम 117 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जलस/ 2012/प्र.क्र.1/जल-7,दिनांक 12/11/2013 व शुध्दीपत्रक दिनांक 01/01/2014 नुसार सिमेंट कॉंक्रीट नालाबांधाची कामे M-10 संधानकात करावी त्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

4) बाब क्रमांक 9 pro., erecting and dismenting या बाबींसाठी जिल्हा दर सूची मध्ये upto 1.5 mtr व above 1.5 mtr असा स्वतंत्र दर दिलेला आहे. मात्र सदर कामात पूर्ण परिमाणास above 1.5 mtr चा दर दिल्याने जादा प्रदान रक्कम रुपये 13,317/- वसूल करणे आवश्यक आहे.

5) गौण खनिज (Royalty Charges) रक्कम कमी कपात केल्याने रक्कम रुपये 855/- वसूल करणे आवश्यक आहे.

6) कामाचे नस्ती सोबत Quarry Chart जोडला नाही. Quarry Chart जोडावा व अंतर कमी असल्यास जादा लीड रक्कम परिगणना करुन वसूल करण्यात यावी.

**3.345 सिमेंट काँक्रीट बंधारा नेऊरगांव, तालुका येवला.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 181) -** सिमेंट कॉक्रीट बंधारा नेऊरगाव यासाठी रूपये 12,96,285/- खर्च करणेत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रस्तुत कामाच्या संचिकेत संलग्न कामाच्या वाढ - घट तक्त्यानुसार कमी / जास्त खर्च केला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 120 (2) प्रमाणे अंदाजपत्रकातील काही बाबींचे काम न केल्यामुळे होणारी बचत इतर बाबींवर खर्च करता येणार नाही. तसेच नियम 153 (1) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्याची जबाबदारी मक्तेदाराची आहे. उपरोक्त नमूद केलेप्रमाणे एका बाबीवरील बचत दुसऱ्या बाबींवर वापरण्यात आली आहे. सक्षम प्राधिकारी यांची मान्यता घेतलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 नियम 117 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

3) प्रादेशिक दरसुची 13/14 चे सी.एस.आर. पान नंबर 39 अनुक्रमांक 33 मध्ये सदर कामाच्या बाब क्रमांक 8 चे दरपृथक्करण दिलेले आहे. त्यानुसार 2,832.02 दर देय असतांना रूपये 2,980.44 दर दिल्याने दर तफावत रुपये 148.42 नुसार एकूण परिमाण 358.44 साठी रक्कम रुपये 53,200/- जादा प्रदान झालेले आहे. ते वसुल करणे आवश्यक आहे.

4) मोजमाप पुस्तिका नंबर 71 पान नंबर 6 वरील बाब क्रमांक 7 providing and fixing m.s.channel. needle चे रक्कम रुपये 4,635.58 व बाब क्रमांक 8 नुसार रक्कम रुपये 19,707.30 असे एकुन 24,343/- रकमेचे प्रदान झालेले आहे .परंतु फोटोमध्ये चॅनेल निडल दिसत नाही. त्यामुळे रक्कम रुपये 24,343/- वसुल करणे आवश्यक आहे.

5) सदर बंधाराच्या कामातील बाब 1:3:6 कॉक्रीटीकरणाच्या 398.26 घ.मी. परिमाणातुन 20 टक्के प्लम वजावट करणे आवशक होते तथापि, 10 टक्के वजावट केलेली आहे. त्यामुळे 398.26 घ.मी. परिमाणासाठी अतिरिक्त 10 टक्के परिमाण 39. 83X 2980.प्रमाणे 45 रक्कम रुपये 1,18,711/- वसुल करण्यात यावे.

**3.346 सिमेंट प्लग बंधारा बांधणे मरळगोई, तालुका निफाड.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 190) -** सिमेंट प्लग बंधारा मरळगोई तालुका निफाड यासाठी रूपये 14,91,633/- खर्च करणेत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रस्तुत कामाच्या संचिकेत संलग्न कामाच्या वाढ - घट तक्त्यानुसारर कमी / जास्त खर्च केला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 120 (2) प्रमाणे अंदाजपत्रकातील काही बाबींचे काम न केल्यामुळे होणारी बचत इतर बाबींवर खर्च करता येणार नाही. तसेच नियम 153 (1) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्याची जबाबदारी मक्तेदाराची आहे. उपरोक्त नमूद केलेप्रमाणे एका बाबीवरील बचत दुसऱ्या बाबींवर वापरण्यात आली आहे. सक्षम प्राधिकारी यांची मान्यता घेतलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 नियम 117 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

3) सदरचे बांधकाम ग्रामपंचायतीस हस्तांतरण केलेबाबत दस्तऐवज नस्तीसोबत दिसुन आले नाही. तसेच 7/12 उताऱ्यावर ग्रामपंचायतीचे नांव लावलेले नाही. त्यामुळे भविष्यात मालकी हक्काबाबत वाद निर्माण होवू शकतो. कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**3.347 साठवण बंधारा धाडरी (धमडी नाला), तालुका धुळे बांधकामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर कामावर रक्कम रुपये 13,88,278/- एवठा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968, नियम 117 नुसार पुर्ण कामाच्या नोदी नमुना नंबर 69 व नमुना नंबर 39 घेण्यात आलेल्या नाहीत.

2) कोरे निविदा रक्कम 500/- संबंधितांकडून वसुल करणेत आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/275/प्र.क्र. 172/पंरा-7,दिनांक 19/10/2011 मधील परिच्छेद क्रमांक 1 (अ) (2) व शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2013/प्र.क्र.49/पंरा-7,दिनांक 07/02/2013 अन्वये ई-टेंडरींग माध्यमातून खरेदी करणेबाबत बंधनकारक केले असतांना पंचायतीने एकुण सिमेंट बॅग 1873 x 300 प्रमाणे एकुण रुपये 5,61,900/- एवढयाची खरेदी विना ई-टेंडरीगने केलेली आहे.

4) ग्रामपंचायतीचा दिनांक 20/05/2014 रोजीचा वाढीव कामाबाबतचा अर्जानुसार वाढीव कामाचा खर्च ग्रामपंचायत करणार असल्याने वाढीव कामास मंजुरी दिलेली आहे. तथापि वाढीव कामाचेही रक्कम अदा केलेने सदरची रक्कम रुपये 93,640/- रक्कम वसुलपात्र करण्यात येत आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक व्हीपीएम-1099/प्र.क्र.44/33,दिनांक 22/12/2000 काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविला नाही.

**3.348 मौ.कात्री नं.6 (कामोदपाडा) साठवण बंधारा तालुका धडगांव**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** मौ.कात्री नं.6 (कामोदपाडा) ता.धडगांव साठवण बंधाराचा बांधकाम करण्यासाठी रक्कम रुपये 1,24,9,332/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 153 (1) प्रमाणे मक्तेदाराने कराराप्रमाणे काम करणे आवश्यक आहे असे असतांना काम 15 महिने उशिराने पुर्ण झाले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार यांचे पत्र जा.क्र./जिपन/बांध/लेखा/340/ 2012/नंदुरबार, दिनांक 09/03/2012 अन्वये रुपये 70,562/- एवढा दंड आकारावयास पाहिजे असतांना प्रत्यक्षात रुपये 12,493/- दंड केला आहे. कमी दंड रुपये 58,069/- वसुल करुन भरणा करण्यात यावा.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण परिपत्रक परास 1001/पे वे 40 जस.3,दिनांक 19/01/2001 मधिल अट क्र. 18 अन्वये जिल्हा परिषद स्तरावर बंधारे बांधतांना कोणतेही तांत्रीक बदल करु नये असे निर्देश असतांना वॉटर कुशनचा अंदाजपत्रकात समावेश नसतांना वॉटर कुशनचे काम केले आहे. 19.72x2373=84 =46892 चे जादा प्रदान झाले आहे.

**3.349 मौ.सुरगस नं.6 साठवण बंधारा तालुका अक्कलकुवा.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 153 (1) प्रमाणे मक्तेदाराने कराराप्रमाणे काम करणे आवश्यक आहे असे असतांना काम 6 महिने उशिराने पुर्ण झाले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार यांचे दिनांक 09/02/2012 चे परिपत्रकान्वये निविदा रक्कमेचे 3.5 टक्के, रुपये 44,726/- दंड कपात करणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात रुपये 5,000/- कपात करण्यात आला आहे. कमी दंड कपात रुपये 39,736/- वसुल करुन भरणा करण्यात यावा.

**3.350 मौ.सिसा नं.3 (शेंद्रीपाडा) साठवण बंधारा तालुका धडगांव.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 153 (1) प्रमाणे मक्तेदाराने कराराप्रमाणे काम करणे आवश्यक आहे असे असतांना काम 6 महिने उशिराने पुर्ण झाले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार यांचे निविदा रक्कमेचे 3.5 टक्के, पेड आकारावयास पाहिजे होता प्रत्यक्षात रुपये 6,017/- कपात करण्यात आला आहे कमी कपात (21060-6017) = रुपये 15,043/- वसुल करुन भरणा करण्यात यावा.

**3.351 मौजे चोरवड -1 तालुका रावेर येथे साठवण बंधारा बांधणे.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** चोरवड, तालुका रावेर येथे साठवण बंधारा बांधकामावर रक्कम रुपये 20,78,421/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अर्धसमास पत्र क्रमांक 5,दिनांक 19/11/2015 अन्वये ई-निविदेमध्ये प्राप्त निविदाकारांची कागदपत्रे मागणी करण्यात आली. तथापि लेखापरिक्षण कालावधीपर्यंत कागदपत्रे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत. तसेच ई-निविदा प्रसिद्ध करतांना निविदेविषयी व्यापक प्रसिद्धी देण्यासाठी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2006/ प्र.क्रं.366/वित्त 9,दिनांक 31/12/2009 अन्वये रोस्टरप्रमाणे दैनिक / साप्ताहीक वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्धी देण्यात आलेली नाही.

2) मुख्य अभियंता लघु पाटबंधारे (स्थानिकस्तर), पुणे यांचे परिपत्रक क्रमांक मुअ/लपा (स्था.स्तर)उपविअ/2/1042 सन 2006,दिनांक 13/4/2006 नुसार वहन अंतर व नकाशा 10 कि.मी. च्या पुढील अंतराचे ठिकाणासाठी अधीक्षक अभियंता यांनी अंतरे प्रमाणीत करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2006/ प्र.क्रं.44/33, दिनांक 22/12/2000 मधील बाब क्र.13 नुसार काम पूर्ण झाल्यावर पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 117 नुसार नमुना नं.69 मध्ये पूर्ण कामांची नोंदवही व नियम 97 नुसार नमुना नं.39 मध्ये अचल मालमत्ता नोंदवहीत नोंदी घेणे आवश्यक आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. जागेच्या 7/12 उताऱ्यावर ग्रामपंचायतीचे नाव करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) 153 (3) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्याची जबाबदारी मक्तेदाराची आहे. तसेच एखाद्या बाबीवर बचत करुन अन्य बाबीवर खर्च केलेला असलेने नियम 153 (2) नुसार सक्षम प्राधिका-याची मान्यता घेण्यात आलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/ प्रक्रं.347/जल,दिनांक 31/07/2000 मधील परिच्छेद एक नुसार लघु पाटबंधारे योजनांच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांना एकत्र येऊन योजनेच्या सिंचन व्यस्थापन देखभाल व दुरुस्तीसाठी सहकारी पाणीवापर संस्था स्थापन करुन सिंचनक्षेत्र हस्तांतरीत केल्याचे कागदपत्र पहावयास मिळाले नाही.

6) कामाचे आदेशानुसार कंत्राटदाराकडून 5 टक्के सुरक्षा अनामत रक्कम कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार एकूण रुपये 1,04,000/- इतकी सुरक्षा अनामत रक्कम कपात करणे आवश्यक होते. तथापि कंत्राटदाराने रुपये 21,000/- किंमतीची बँक ऑफ महाराष्ट्र ची मुदत ठेव पावती जमा केलेली आहे. तसेच देयकामधून रुपये 51,500/- इतकी सुरक्षा अनामत कपात करण्यात आलेली आहे. म्हणजेच एकूण रुपये 72,500/- इतकी रक्कम जमा करण्यात आलेली आहे. त्यामुळे रुपये 31,500/- इतकी सुरक्षा अनामत रक्कम कमी कपात करण्यात आलेली आहे.

7) डि-वॉटरींग या बाबीखाली लॉगबुकनुसार 10 तास पाणी उपसण्याचे काम करण्यात आलेले आहे. जलसंपदा विभागाचे सन 2011-12 च्या दरसूचीनुसार 5 ते 9 हॉर्सपॉवर मशिनकरिता दर निश्चित करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे 10 तासाकरीता (10*190.23) एकूण रुपये 1,902.30 इतकी रक्कम अदा करणे आवश्यक असतांना रुपये 9,511.50 असे प्रदान करण्यात आलेले आहे. त्यामुळे रुपये 7,609.20 जादा प्रदान झाले आहे.

**3.352 प्रलंबित अग्रीम बाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 62) -** अग्रीम नोंदवही नुसार एकुण रक्कम रुपये 90,44,923/- अग्रिम वसुल होणे बाकी आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 31/03/2015 अखेर प्रलंबित अग्रिम रक्कम रुपये 90,44,923/- पैकी रुपये 89,98,170/- खाते प्रमुखाकडे सन 1966-1967 पासुन अग्रिम प्रलंबीत आहे. प्रलंबीत अग्रिम वसुली / समायोजनाबाबत ग्रामविकास व

जलसंधारण विभागाकडील पत्र क्रमांक लेकअ/1092/पदु-1489/30, दिनांक 14/03/1994 नुसार कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे एवढ्या मोठ्या तसेच अग्रिम नोंदवहीत खातेप्रमुखांचे नाव नमुद नाही

2) सदर प्रलंबीत वसुली / समायोजनाबाबत लेखापरीक्षणात वेळोवेळी परिच्छेद नोंदवुनही अग्रिम वसुलीबाबत कार्यवाही केलेली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील परिपत्रक क्रमांक झेडपीए-2009/प्र.क्र.522/ वित्त-9, दिनांक 10/12/2010 नुसार एकदा अग्रिम दिले असल्यास त्याचे समायोजन झाल्याशिवाय पुन्हा अग्रिम प्रदान करु नये असे स्पष्ट आदेश आहेत.

4) प्रलंबीत अग्रिम वेळीच वसुल / समायोजन न झाल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

**3.353 जिल्हा परिषद जळगांव यांनी उपलब्ध करुन दिलेल्या पूर्ण कामांबाबत सर्वसाधरण आक्षेप.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 65) -** लघुसिंचन विभागाकडील पुर्ण झालेल्या कामांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विकास कामे पूर्ण करतांना मुळ जमिनीच्या मालकीविषयक पडताळणी करण्यात आली नाही, त्यामुळे न्यायालयीन प्रकरण उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/प्र.क्र.347/जल, दिनांक 31/07/2000 मधील तरतुदीनुसार लघु पाटबंधारे योजनांच्या लाभक्षेत्रात पाणीवापर संस्था स्थापन करुन सिंचन क्षेत्र हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय संकीर्ण 2009/ प्रक्रं.180/परा 8, दिनांक 31/12/2009 नुसार कामाचे निविदेमध्ये दोषनिवारण कालावधी नमूद करणे आवश्यक आहे.

4) मक्तेदार, मजूर सहकारी संस्था अथवा सुशिक्षीत बेराजगार अभियंता यांचेकडून निविदा भरुन घेतल्यानंतर मक्तेदाराचा अनुभव, त्याची तांत्रिक व आर्थिक क्षमता तपासण्याची आलेली नाही, त्यामुळे कामाच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमांक जीआर/34/का-4/5162,दिनांक 9/1/1987 नुसार शासकीय प्रयोगशाळे ऐवजी खाजगी इंजिनिअरींग कॉलेजकडून गुणवत्ता तपासणी करण्यात आलेली आहे.

6) मुख्य अभियंता पाटबंधारे (स्थानिक स्तर) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक मुअ/लपा(स्था.स्तर)उपविअ/2/1042/सन 2006, दिनांक 13/4/2006 नुसार 10 किलोमीटर च्या पुढील अंतराचे ठिकाणासाठी अधीक्षक अभियंता यांनी अंतरे प्रमाणीत करणे आवश्यक आहे.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2006/प्र.क्रं.44/33, दिनांक 22/12/2000 मधील बाब क्रमाक 13 नुसार काम पूर्ण झाल्यावर पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक आहे.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 120 नुसार अंदाजपत्रकातील काही बाबींच्या कामामध्ये होणारी बचत इतर बाबींसाठी खर्च करण्यात येऊ नयेत, असे असतांना एका बाबीवरील बचत दुसऱ्या बाबींवर वापरण्यात आलेली आहे.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 146 नुसार कामाचे आदेश देण्यापूर्वी करारनामा करणे आवश्यक असतांना, करारनामा अपूर्ण स्वरुपात आहे व त्यावर करारनामा करुन देणार व करारनामा करुन घेणार यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

**3.354 हिंगणगांव, तालुका पारनेर, येथे साठवण बंधारा बांधणे.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** जिल्हा परिषद, अहमदनगर ने सदर कामासाठी रुपये 15,11,955/- इतकी रक्कम गुंतविलेली आहे. सदर कामावर प्रमाणक क्रमांक 244,दिनांक

16/02/2015 रुपये 6,06,000/- प्रमाणक क्रमांक 249, दिनांक 18/03/2015 रुपये 9,05,955/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नस्तीसोबत मंजूर प्राकलन लेखापरिक्षणास उपलब्ध करणेत आलेले नाही. कामाच्या नस्तीसोबत खोदकामाचे मोजमापाचे फिल्डबुक तपासणीस उपलब्ध झाले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 नुसार पुर्ण झालेल्या कामाच्या नोंदी नमुना 39 मध्ये घेणे आवश्यक आहे. परंतू त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) निविदेतील विवरणपत्रामधील माहिती निविदाकारांनी भरलेली नाही. त्यामुळे निविदाकाराकडील उपलब्ध अवजारे व संयंत्रे कर्मचारी, तांत्रिक कर्मचारी, मजूर इत्यादी आवश्यक बाबी त्यांच्याकडे असल्याची लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही. सदर उणिवा असतांना निविदा स्विकारलेली आहे.

4) बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 132 नुसार कामांचे स्थळ निरिक्षण करुन तांत्रिक अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रथम पहाणी अहवाल व प्रस्तावित कामांचे चिन्हांकित नकाशे नस्तीसोबत जोडणेत आलेले नाहीत. त्यामुळे पहाणी अहवालात नमूद बाबींचा अंदाजपत्रकीय समावेश व प्रस्तावित काम योग्य जागेत झाल्याची खात्री करता आली नाही.

5) निविदा सादर करतांना मक्तेदारांचे टीन नंबरचे प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे, मक्तेदाराकडून मुल्यवर्धित कर 5 टक्के वसूल करणे आवश्यक असतांना तो फक्त 2 टक्के वसुल केल्याने उर्वरित 3 टक्के रक्कम रुपये 45,359/- वसूल करुन शासन सदरी भरणा करुन पुर्तता करावी.

6) एकूण 1,680.69 ब्राससाठी रुपये 70.68 दराने रुपये 1,18,791/- रॉयल्टीची रक्कम कपात करणे आवश्यक असतांना देयकातून रक्कम रुपये 97,241/- कपात केलेली आहे. कमी कपात रॉयल्टीची रक्कम रुपये 21,550/- वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

7) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा -प्र-5,दिनांक 22/02/2008 नुसार व आयकर अधिनियम क्रमांक 194-सी नुसार सर्व कंत्राटी कामाच्या एकूण रकमेच्या 2 टक्के इतकी आयकर रक्कम रुपये 30,240/- देयकातून कपात करणे आवश्यक असतांना आयकर रक्कम रुपये 15120/- कपात केलेली आहे.

**3.355 को.प. बंधारा देवठाण तालुका अकोले.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदर कामावर प्रमाणक क्रमांक 66,दिनांक 03/10/2014 रुपये 24,92,800/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नस्तीसोबत मंजूर प्राकलन लेखापरिक्षणास उपलब्ध करणेत आलेले नाही. प्राकलनातील दराप्रमाणे विहीत दर लावून व प्राकलनाप्रमाणेच काम झाले किंवा नाही याची पडताळणी करता आली नाही. कामाचे नस्तीसोबत खोदकामाचे मोजमापाचे फिल्डबुक तपासणीसाठी उपलब्ध झाले नाही.

2) निविदातील विवरणपत्रामधील माहिती निवीदाकाराने भरलेली नाही. त्यामुळे निविदाकाराकडील उपलब्ध हत्यारे व सयंत्रे कर्मचारी तांत्रिक कर्मचारी, मजूर इत्यादी आवश्यक बाबी कंत्राटदाराकडे असल्याची खात्री करता आली नाही, सदर उणिवा असतांना निविदा स्वीकारलेली आहे.

3) बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 132 नुसार कामांचे स्थळ निरिक्षण करुन तांत्रिक अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रथम पहाणी अहवाल व प्रस्तावित कामांचे चिन्हांकीत नकाशे नस्तीसोबत जोडणेत आलेले नाहीत. त्यामुळे पहाणी अहवालात नमूद बाबींचा अंदाजपत्रकीय समावेश केल्याची व प्रस्तावित काम योग्य जागेत झाल्याची खात्री करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमासं 1098/प्र.क्र.29/98 शासन हमी दिनांक 19/08/1998 अन्वये कंत्राटदाराने काम सुरु करणेपूर्वी संबंधीत कंत्राटी कामाचा व कामगारांचा विमा उतरवून विमा पत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे. तथापि विमा उतरविणेत आलेला नाही. नमूद खर्चापैकी 1 टक्का विमा रक्कम रुपये 24,928/- विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर/1007/प्र-कोषा/105 प्र.क्र.5, दिनांक 22/05/2008 आयकर अधिनियम 194 (2)-सी नुसार सर्व कंत्राटी कामांच्या एकूण रकमेच्या 2 टक्के इतकी आयकर रक्कम रुपये 49,856/- देयकातून कपात करुन आयकर विभागाकडे भरणा करणे आवश्यक असतांना आयकर रक्कम रुपये 24,928/- कपात केलेला आहे. तरी कमी कपात आयकर रक्कम रुपये 24,928/- संबंधीत कंत्राटदाराकडून वसूल करुन आयकर विभागाकडे भरणा करावा.

**3.356 कोल्हापूर पध्दतीचा बंधारा मोरगाव नेवसेवस्ती तालुका बारामती**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** कोल्हापूर पध्दतीचा बंधारा मोरगाव नेवसेवस्ती तालुका बारामती करिता शासन निधीमधून एकूण दोन प्रमाणकांन्वये एकूण रक्कम रूपये 33,99,469/- खर्च करण्यात आलेला आहे**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-1 जल/347/प्र.क्र.1099/ लपायो, दिनांक 31/07/2000 अनुसार पाणी वापर संस्था स्थापन केल्यानंतर काम चालू करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न करता काम चालू केले आहे.

2) सदर कामाची मुदत 18 महिने असताना सदरचे काम 3 महिन्यातच अत्यल्प कालावधीत घाई गडबडीने पूर्ण केले मुळे केलेले काम योग्य दर्जाचे झाल्याची खात्री होत नाही.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक, भांखस 6 उद्योग (2512)/1088, दिनांक 02/01/1992 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 7/परा/72/प्र.क्र.275/2010, दिनांक 19/10/2011 नुसार कामाची जाहिरात दिल्याचे कात्रण उपलब्ध झाले नाही.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र. /108/कामगार 7अ/मंत्रालय, मुंबई, दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 व 6 अन्वये इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर याखाती 1 टक्का उपकराची रक्कम रूपये 33995/- वसुल करणे आवश्यक असताना रक्कम रूपये 32,087/- वसुल केलेने कमी वसुल रक्कम रूपये 1908/- संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

5) लघुपाटबंधारे विभागाकडील नियमपुस्तिकेमधील भाग 7 मधील नियम क्रमांक 8.6(4) नुसार कठिण खडकाची खोदाई 0.60 मीटरपेक्षा जास्त खोदकाम करता येत नसताना जादा खोदाई केल्याने रक्कम रूपये 2,429/- संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

6) निविदा शर्त 14 व 15 तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114, 118, 120 व 152(2) नुसार अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे एखाद्या बाबीवर 25 टक्के किंवा खर्चात रककम रुपये 5,000/- पेक्षा वाढ होत असेल तर त्याकामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची निरीक्षण टिपणीद्वारे पूर्व मान्यता घेऊनच काम करणे आवश्यक असताना बाब क्रमांक 3 व 6 करिता पूर्वमान्यता न घेताच काम केल्याने सदर बाबीवरील नियमबाह्य जादा खर्च रक्कम रुपये 93,112/- केला आहे.

**3.357 साठवण सिमेंट बंधारा डाळज नंबर 2 तालुका इंदापूर**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 36) -** साठवण सिमेंट बंधारा डाळज नंबर 2 तालुका इंदापूर करिता शासन निधीमधून प्रमाणक क्रमांक 21**,**दिनांक 01/10/2014 अन्वये रक्कम रूपये 20,44,106/- इतका खर्च करण्यात आलेला आहे**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) सदर कामाची मुदत 12 महिने असताना सदरचे काम 1 महिन्यातच अत्यल्प कालावधीत घाई गडबडीने पूर्ण केले मुळे केलेले काम योग्य दर्जाचे झालेबाबत खात्री होत नाही**.**

2) ग्रामपंचायत अधिनियम 1958 व ग्रामपंचायत हिशोब तपासणी नियम 1961 नुसार नमुना नंबर 25 मध्ये काम पूर्ण अथवा दुरूस्तीच्या खर्चाची नोंद केले बाबतचा उतारा उपलब्ध झाला नाही**.**

3) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 180 नुसार रक्कम अदा करताना प्रमाणक्र क्रमांक दिनांकासह मोजमाप पुस्तकावर लाल शाईने नमुद करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही**.**

4) महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस 6 उद्योग (2512)/1088,दिनांक 02/01/1992 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 7/परा/72/प्र.क्र.275/2010 दिनांक 19/10/2011 नुसार कामाची जाहीरात दिलेचे कात्रण उपलब्ध झाले नाही**.**

5) अनोंदणीकृत ठेकेदार असलेस 5 टक्के प्रमाणे विक्रीकर कपात करणे बंधनकारक असताना रक्कम रूपये 1,02,205/- ऐवजी रक्कम रूपये 40,882/- विक्रीकर कपात केल्याने रूपये 61,323/- इतका कमी वसूल केलेला विक्रीकर शासन जमा करावा**.**

6) महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/ प्र.क्र./108/कामगार 7अ/मंत्रालय, मुंबई दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 व 6 अन्वये इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर याखाती 1 टक्का उपकराची रक्कम रूपये 20,441/- वसुल करणे आवश्यक असताना रक्कम रूपये 19,398/- वसुल केलेने कमी वसुल रक्कम रूपये 1,043/- संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

7) लघुपाटबंधारे विभागाकडील नियमपुस्तिकेमधील भाग 7 मधील नियम क्रमांक 8.6(4) नुसार कठिण खडकाची खोदाई 0.60 मीटरपेक्षा जास्त खोदकाम करता येत नसताना जादा खोदाई केल्याने रक्कम रूपये 2,064/- संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

**3.358 शेळगाव (शिंगाडेवाडी) सिमेंट साठवण बंधारा तालुका इंदापूर या कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 41) -** शेळगाव (शिंगाडेवाडी) सिमेंट साठवण बंधारा तालुका इंदापूर करिता जिल्हा परिषद देखभाल व दुरुस्ती निधीमधून प्रमाणक क्रमांक 58, दिनांक 05/08/2014 अन्वये रक्कम रूपये 21,33,481/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रक बाब क्रमांक 7 M15 (MSA 20) मध्ये सिमेंटचा बाजारभाव दर सूचीमधील तफावत रुपये 95/- दरपृथक्करणामध्ये मिळविले असून त्यामुळे दर वाढविला आहे. सन 2011-12 प्रादेशिक दर सुचीमधील सर्वसाधारण सुचना पान क्रमांक 3 बाब क्रमांक 8 नुसार दरवाढ सीएसआर मधील प्रसिध्द केल्यासच देय आहे. परंतू दर प्रसिध्दीची प्रादेशिक विभागाची मान्यता नस्तीसोबत नसल्याने बाब क्रमांक 5 अनुसार परिमाण 489.74 X दर रुपये 95/- इतकी जादा अदा रक्कम रूपये 46,525/- वसुल करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र. /108/कामगार 7अ/मंत्रालय, मुंबई,दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 व 6 अन्वये इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर याखाती 1 टक्का उपकराची रक्कम रूपये 21,335/- वसुल करणे आवश्यक असताना रक्कम रूपये 20,236/- वसुल केलेने कमी वसुल रक्कम रूपये 1,099/- संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

3) सदर कामाची मुदत निविदेमध्ये 18 महिने नमुद असताना कार्यारंभ आदेशामध्ये 12 महिने मुदत नमुद करणेत आलेली आहे.

4) कार्यारंभ आदेशाप्रमाणे सदर कामाची मुदत एक वर्ष असताना काम पावसाळ्याच्या कालावधीत 50 दिवसांमध्ये कश्या प्रकारे पूर्ण करण्यात आले.

5) सदर बंधा-याची पाणी साठविल्यानंतर व पाण्याची गळती होत नसल्याचे पाहून चाचणी झाल्यानंतरच 10 टक्के रक्कम देय असताना विहीत कालावधी पूर्ण न होताच 10 टक्के चाचणी राखीव रक्कम परत करण्यात आलेली आहे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2000/प्रक्र.44/38,दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवणे आवश्यक असताना एकाच मोजमाप पुस्तिकेत अनेक कामाच्या नोंदी केलेल्या आहेत.

7) निविदा शर्त 14 व 15 तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114, 118 व 152(2) नुसार अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे एखाद्या बाबीवर 25 टक्के किंवा खर्चात रककम रुपये 5,000/- पेक्षा वाढ होत असेल तर त्याकामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची निरीक्षण टिपणीद्वारे पूर्व मान्यता घेऊनच काम करणे आवश्यक असताना बाब क्रमांक 1 करिता पूर्वमान्यता न घेताच रक्कम रुपये 1,91,835/- चे जादा काम नियमबाह्यरित्या केलेले आहे.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 180 व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली, परिशिष्ट 24 (नियम 13 ते 15) नुसार लेखाशाखेने मोजमाप पुस्तकामध्ये दुसरी कर्णरेषा मारलेली नाही.

9) लघुपाटबंधारे विभागाकडील नियमपुस्तिकेमधील भाग 7 मधील नियम क्रमांक 8.6(4) नुसार कठिण खडकाची खोदाई 0.60 मीटरपेक्षा जास्त खोदकाम करता येत नसताना जादा खोदाई केल्याने रक्कम रूपये 4,361/- संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम क्रमांक 177 नुसार विकास कामांच्या देयकावर पृष्टांकनप्रित्यर्थ विभाग प्रमुख म्हणून कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी केली आहे परंतु नियम 186(1) चा (3) नुसार अंतिम देयकावर कार्यकारी अभियंता यांनी प्रतीस्वाक्षरी केलेली नाही.

11) महसुल व वन विभागाचे परिपत्रक क्रमांक अशाक्र मुद्रांक 2009/2707/प्र.क्र.326/म-1,दिनांक 09/10/2009 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपी 2009/प्र.क्र.514/वित्त 9,दिनांक 20/11/2009 नुसार अंदाजपत्रकीय रक्कम विचारात घेवून रूपये 1,500/- चे मुद्रांक वापरून करारनामा करणे आवश्यक असताना रूपये 1,300/- च्या मुद्रांकावर करारनामा केलेला असलेने कमी रक्कम रूपये 200/- वसुल करणे आवश्यक आहे.

**3.359 डिंगोरे शेरीचा ढोह कोल्हापूर बंधारा तालुका जुन्नर**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 53) -** डिंगोरे शेरीचा ढोह कोल्हापूर बंधारा तालुका जुन्नर करिता शासन निधीमधून एकूण 3 प्रमाणकांन्वये एकूण रक्कम रूपये 5169478/- इतका खर्च करण्यात आलेला आहे**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक-1 जल/347/प्र.क्र.1099/ लपायो,दिनांक 31/07/2000 अनुसार पाणी वापर संस्था स्थापन करून त्यानंतर काम चालू करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही न करता काम चालू केले आहे.

2) ठेकेदाराने काम विहीत मुदतीत पूर्ण न झालेने कामाची मुदत वाढवून मिळणेसाठी अर्ज केलेला नाही. काम दिनांक 14/11/2013 ला सुरू केलेले असून कामाची मुदत दिनांक 29/09/2014 रोजी संपलेली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 नुसार ठेकेदाराने मुदत संपणेपूर्वी 15 दिवस अगोदर मुदतवाढीसाठी अर्ज करणे आवश्यक असताना कामाची मुदत संअपलेनंतरही मुदतवाढीसाठी ठेकेदाराने अर्ज केलेला नाही. अदाईच्या 1 टक्के दंड रक्कम रूपये 51,695/- वसुल करणे आवश्यक असताना ठेकेदाराने 20 महिने विलंबाने काम पूर्ण करूनदेखील ठेकेदाराकडून नगण्य रक्कम रूपये 500/- एवढा दंड वसुल करणेत आलेला आहे. त्यामुळे कमी वसुल दंड रक्कम रूपये 51,195/- वसुल करणे आवश्यक आहे.

3) सदर कामाची मुदत 18 महिने असताना सदरचे काम 2 महिन्यातच अत्यल्प कालावधीत घाई गडबडीने पूर्ण केले मुळे केलेले काम योग्य दर्जाचे झालेबाबत खात्री करता आली नाही.

4) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 180 नुसार रक्कम अदा करताना प्रमाणक्र क्रमांक दिनांकासह मोजमाप पुस्तकावर लाल शाईने नमुद करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस 6 उद्योग (2512)/1088,दिनांक 02/01/1992 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 7/परा/72/प्र.क्र.275/2010,दिनांक 19/10/2011 नुसार कामाची जाहिरात दिलेचे कात्रण उपलब्ध झाले नाही.

6) महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/ प्र.क्र./108/कामगार 7अ/मंत्रालय, मुंबई,दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 व 6 अन्वये इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर याखाती 1 टक्का उपकराची रक्कम रूपये 51,695/- वसुल करणे आवश्यक असताना रक्कम रूपये 49,524/- वसुल केलेने कमी वसुल रक्कम रूपये 2,171/- संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

**3.360 ई निविदांची प्रसिध्दी वृत्तपत्रात न केलेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 138 नुसार निविदासंदर्भातील जाहिराती स्थानिक वृत्तपत्रात तसेच राज्यशासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करुन मोकळेपणाने पाहण्यास उपलब्ध होतील अशी तरतुद असताना लघुपाटबंधारे विभागाने सन 2014-15 मधील विकासकामांच्या कोणत्याही निविदेची जाहिरात अथवा विभागस्तरावरील वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली नाही. याबाबत सर्व निविदा ह्या ई निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द असलेने वृत्तपत्रात जाहिरात न केलेबाबतचा खुलासा करण्यात आला तथापि ई निविदे संदर्भातील शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक 19/10/2011 मधील मुद्दा 5 (3) नुसार ई निविदेस जिल्हास्तरावर व्यापक प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करणेसंबंधी सूचीत केलेले आहे. ई निविदा संकेतस्थळ हे निविदा प्रसिध्दीसंबंधी पुरेसे नसून कामांची छोटी जाहिरात वर्तमान पत्रात देऊन तपशिलवार माहिती संकेतस्थळांवर देणे आवश्यक आहे. तसेच सध्या शासनाच्या विविध विभागांकडील ई निविदेसंदर्भातील जाहिराती वर्तमानपत्रात छोट्या जाहिरातीद्वारे प्रसिध्द केल्या जातात त्यामुळे उपरोक्त जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम शासनाने रद्द केलेला नाही. त्यामुळे निविदांना व्यापक प्रसिध्दी देणे आवश्यक असून त्यामुळे जिल्ह्यातील तसेच जिल्ह्याबाहेरील सर्व मक्तेदारांना, नागरिकांना कामांची माहिती मिळते व जिल्हा परिषदेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळून कामे कमीत कमी दराने व दर्जेदार पध्दतीने करता येणे शक्य होते. तथापि विभागाने अशी कार्यवाही न केलेने जिल्हापरिषदेचे आर्थीक नुकसान झालेले आहे.

**3.361 निविदा रकमेपेक्षा जादा रकमेच्या देयकास मंजूरी दिल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांचेकडील कामांची पडताळणी केली असता निविदा रक्कम व प्रदान केलेली रक्कम याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

मक्तेदाराने अंदाजपत्रकीय तरतूदीपेक्षा जादा केलेल्या कामाकरीता अनुज्ञेय रकमेपेक्षा खालीलप्रमाणे जादा प्रदान झाले आहे.

1) साठवण बंधारा, पाचवड (घाणीची मळवी), ता. खटाव सदर काम 5 टक्के जादा दराने मंजूर झाले आहे. त्यामुळे निविदा रक्कम रुपये 19,61,831/- च्या 5 टक्के जादा दराने रुपये 20,59,923/- ऐवजी मुल्यांकनाप्रमाणे 5 टक्के जादा रुपये 20,67,326/-आदा केल्याने रुपये 7,403/- जादा प्रदान झाले आहे.

2) साठवण बंधारा आंबवडे, चिमणगिरी, ता. खटाव सदर काम 2 टक्के जादा दराने मंजूर झाले आहे. त्यामुळे निविदा रक्कम रुपये 23,07,762/- च्या 2 टक्के जादा दर रुपये 23,53,957/- ऐवजी मुल्यांकनाप्रमाणे 2 टक्के जादा रुपये 23,71,051/- आदा केल्याने रुपये 17,134/- जादा प्रदान झाले आहे.

3) मौजे सोकासन (कवटमळा) साठवण बंधारा, माण सदर काम 4.95 टक्के जादा दराने मंजूर झाले आहे. त्यामुळे निविदा रक्कम रुपये 20,06,196/- च्या 4.95 टक्के जादा दराने रुपये 21,05,505/- ऐवजी मुल्यांकनाच्या 4.95 टक्के जादा दराने रुपये 21,14,795/- एवढे आदा केल्याने जादा प्रदान रुपये 9,292/- झाले आहे.

मक्तेदारासोबत निविदा रकमेनुसार वाढीव दराने काम करणेबाबत करारनामा केला असल्याने मुल्यांकन रकमेवर वाढीव दर अनुज्ञेय नाही. अन्य कामांबाबत निविदा रकमेच्या मर्यादेत देयके पारीत केलेली आहेत. सबब उपरोक्त 3 कामांकरीता जादा आदा रक्कम रुपये 33,829/- वसुली करुन शासन निधीत भरणे आवश्यक आहे.

**3.362 सिमेंट बंधारा बांधणे, कोंडाईवाडी शिराळा.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** सिमेंट बंधारा बांधणे कोंडाईवाडी शिराळा कामावर रक्कम रुपये 16,46,413/- केलेल्या खर्चा बाबत तपासणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे अंदाज पत्रकात 8 गेट व त्याची रुंदी 2.12 मीटर व उंची 0.50 मीटर असे ms needles चे एकूण परिमाण 8.48 sqm इतके प्रस्तावित केले असताना प्रत्यक्षात काम मात्र 16.96 sqm चे केले आहे.मंजूर अंदाज पत्रक नकाशा प्रमाणे काम केले नाही. सदर 8.48 sqm वाढीव परिमाण बाबत कार्यकारी अभियंता छोटे पाटबंधारे विभाग जिल्हा परिषद सांगली यांचा निरीक्षण अहवाल नस्ती सोबत नाही.वास्तविक बंधाऱ्याच्या नकाशा मध्ये प्रस्तावित केले प्रमाणे MS NEEDLES चे परीमाण 8.48 sqm हे योग्यच होते. संकल्पन चित्रात कोणताही बदल झाला नसताना ms needles चे परिमाणात दुप्पट वाढ केलेली आहे. सदर अनावश्यक ms needles बसविले बाबत तांत्रिक दृष्ट्या खुलासा होणे आवश्यक आहे. सदर ms needles चे परिमाणात वाढ झाल्यामुळे ms vertical chanel चे देखील परिमाणात 9.80 रनिंग मीटर वाढ झाली आहे.सदर अनावश्यक वाढ लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.तरी बाब क्रमांक 11 व 12 च्या वाढीव परिमाणामुळे अनुक्रमे रुपये 8,223/- व रुपये 78,291/- असे एकूण रक्कम रुपये 86,514/- लेखा परीक्षणात अमान्य करण्यात येत आहेत.

2) सदर सिमेंट नाला बंधारे बांधणेचे काम हे m-15 संधानकात 328.26 घन मिटर केले आहे. परंतु मुख्य अभियंता, संकल्पन, प्रशिक्षण संशोधन व सुरक्षितता महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी नाशिक यांचेकडील दिनांक 19/08/2013 व तदपूर्वी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सिमेंट नाला बंधारे m-10 संधानकात करण्या बाबत सूचित केले आहे.परंतु तसे न करता सिमेंट नाला बंधाऱ्याचे काम m-10 ऐवजी m-15 मध्ये केल्याने कामावर रक्कम रुपये 56,132/- इतका अनावश्यक खर्च झाला आहे.

3) सिमेंट बंधाऱ्याचे काम पूर्ण झाल्यानंतर 07/05/2003 चे शासन परिपत्रकानुसार सदर सिमेंट बंधारा पाणी वापर संस्थेकडे नियमानुसार हस्तांतर करणे आवश्यक आहे.

**3.363 मौजे घाटनांद्रे, तालुका कवठेमहांकाळ येथे नवीन सिमेंट बंधारा बांधणे.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** मौजे घाटनांद्रे, तालुका कवठेमहांकाळ येथे नवीन सिमेंट बंधारा बांधणे कामावर रक्कम रुपये 21,04,930/- केलेल्या खर्चा बाबत तपासणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे बांधकामामध्ये बाब क्रमांक 5 Tor Steel चा 2.62 मेट्रिक टन वापर केला आहे व त्यासाठी प्रती मेट्रिक टन रुपये 59,514.26/- इतका दर निश्चित करून मक्तेदारास रक्कम आदा केली आहे परंतु दर सूची सन 2011-12 मधील Tor Steel साठी मूळ दर प्रती मेट्रिक टन रक्कम रुपये 42,470/- इतका असताना रक्कम रुपये 54,252/- इतका घेतलेला आहे. त्यामुळे मक्तेदारास रक्कम रुपये 31,178/- चे अती प्रदान झाले आहे.

2) संबधित कामाचे देयकातून उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक बीसीए(इमारत)/2009/प्रक्रं 108/कामगार 7अ,दिनांक 03/07/2010 नुसार व शासन परिपत्रक क्रमांक बीसीए/ 2007/प्रक्रं 788/कामगार 7अ,दिनांक 26/10/2009 कामगार कल्याण व उपकर निधी 1 टक्का प्रमाणे कामगार कल्याण मंडळाकडे कपात करुन भरणे आवश्यक आहे. सदर कामाच्या देयकातून 1 टक्के विम्याची रक्कम रुपये 21,049/- वसूल होणे आवश्यक आहे.

3) टेस्ट रिपोर्ट साठी पाठविलेले संधानकाचे नग व टेस्ट रिपोर्टमधील संधानकाचे नग यामध्ये विसंगती आहे.

4) सदर सिमेंट बंधाऱ्याची जमीन पाझरास योग्य असलेबाबत वरिष्ठ भू वैज्ञानिक यांचे प्रमाणपत्र सादर करावे.

5) सदर कामाची व कामात वापरलेल्या वस्तूंची तपासणी ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक ग्रा.रो.यो.2000 प्र.क्र.75/यो-9,दिनांक 29/05/2008 अन्वये जिल्हा परिषद योजनेच्या कामातील सर्व चाचण्या पंतप्रधान ग्रामीण रोजगार योजना यांचे मार्फत उभारलेल्या जिल्हा प्रयोगशाळे मध्ये करावयाच्या असताना अशी तपासणी पद्मभूषण वसंतराव दादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी बुधगाव सांगली येथे करण्यात आली आहे.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक दिनांक 06/11/2004 नुसार कोल्हापूर पद्धतीचा बंधारा व सिमेंट बंधारा यांची पायाची खोली हि साधारणतः बंधाऱ्याच्या उंची पेक्षा जास्त नसावी अशा सर्व प्रकारच्या कामांचे प्रस्ताव तांत्रिक मान्यता घेणेपूर्वी अधिक्षक अभियंता(स्थानिक स्तर) पुणे यांचे कडे सादर करून मंजुरी घेणे आवश्यक होते. परंतु सदर कामाबाबत तशी कार्यवाही केली नाही त्यामुळे उपरोक्त शासन परिपत्रकाचे पालन झाले नाही.

7) महारष्ट्र शासन परिपत्रक जलसं -2012/प्र क्र 65/जल-7 ग्राम विकास व जल संधारण विभाग मुंबई,दिनांक 22/01/2013 नुसार सिमेंट बंधारा कामाच्या ठिकाणी नामफलक लावणे आवश्यक आहे पण तशी कार्यवाही केलेली नाही.

8) सिमेंट बंधारा काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक 07/01/2003 च्या शासन परिपत्रकानुसार सदर बंधारा ग्राम पंचायती कडे हस्तांतर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.364 सिमेंट नाला बंधारा बांधकामावरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** सिमेंट नाला बंधारा बांधणे कामावर रक्कम रुपये 1,00,07,842/- केलेल्या खर्चा बाबत तपासणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) छोटे पाटबंधारे विभागाने एकूण 07 सिमेंट नाला बंधारे बांधणेचे काम हे m-15 संधानकात केले आहे.परंतु मुख्य अभियंता, संकल्पन, प्रशिक्षण संशोधन व सुरक्षितता महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी नाशिक यांचेकडील दिनांक 19/08/2013 व तदपूर्वी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सिमेंट नाला बंधारे m-10 संधानकात करण्या बाबत सूचित केले आहे.संधानक m-10 एवजी m-15 मध्ये केल्यास बंधाऱ्याच्या काटछेदात कोणत्याही प्रकारचा बदल होत नसल्याने सदर बाब खर्चिक होईल म्हणून सिमेंट नाला बंधारे पूर्वी संकल्पित केल्याप्रमाणेच m-10 मध्येच ठेवणे संयुक्तिक आहे.तसेच सदर कामाच्या सुरक्षितते बरोबरच आर्थिक बचतीचा विचार होऊन संकल्पन करणे अभिप्रेत आहे,जेणे करून अंदाज पत्रकात अनावश्यक आर्थिक वाढ होणार नाही,ते पाहणे आवश्यक आहे.सिमेंट नाला बंधाऱ्याचे काम m-10 ऐवजी m-15 केल्याने कामावर रक्कम रुपये 4,42,904/- इतका अनावश्यक खर्च झाला आहे.

2) सदर सात सिमेंट नाला बंधाऱ्याच्या बांधकामामध्ये tor steel चा वापर केला आहे व त्यासाठी प्रती मेट्रिक टन दर रुपये 48,560/- इतका घेऊन दर निश्चित केला आहे.परंतु दरसूची सन 2011-2012 मधील tor steel चा मूळ दर प्रती मेट्रिक टन 42,470/- इतका असताना रुपये 48,560/-प्रती मेट्रिक टन इतका घेतल्याने व त्यावर वाढीव दर देऊन दर निश्चित केल्याने ठेकेदारास रक्कम रुपये 73,061/- चे अती प्रदान झाले आहे.

3) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अनुच्छेद 63 प्रमाणे कार्य करारावर मुद्रांक शुल्क देय आहे. परिशिष्ठ क्रमांक 03 मध्ये नमूद केले प्रमाणे कामाच्या कार्य करारा पोटी फक्त 100/- रुपये घेतल्याने शासनाचे नुकसान झाले आहे. तरी सदर नुकसानीची रक्कम रुपये 6,000/- वसूल करावेत.

4) सदर सिमेंट नाला बंधारे बांधकामाचे अंदाज पत्रकात embankment casing या बाबीवर मोठ्या प्रमाणात तरतूद करून खर्च नाममात्र केला आहे.म्हणजेच अनावश्यक जादा तरतूद करून बचत झालेली रक्कम इतर बाबीवर (cc-m15) खर्च केलेली आहे.त्यामुळे लेखासंहीता 1968 मधील नियम 120, 153 चे उल्लंघन झाले आहे.

**3.365 कोल्हापूर टाईप बंधारा शिनोळी खुर्द, तालुका चंदगड मधील अनियमितेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद कोल्हापूर छोटे पाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) यांचेमार्फत एजन्सी तत्वावर सदर बंधारेचे काम केले आहे. सदर कामाची तपासणी करता याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सदर कामामधील बाबींची दर निश्‍चिती मुळ दर अधिक रॉयल्टी रक्कम अधिक लिड चार्जेस वजा सिमेंट बॅग रक्कम इत्यादी दर वजा करुन निश्‍चित होण्याऱ्या रकमेवर 5 टक्के प्रमाणे डोगरी भागासाठी जादा दर धरुन निश्‍चिती केली आहे. प्रत्यक्षात होणाऱ्या रॉयल्टी रक्कमाही शासनास भरणा होणारी रक्कम असल्याने त्यावर 5 टक्के प्रमाणे डोगरी भागाचा दर देणे योग्य नसताना तो दिल्याने ठेकेदारास रक्कम रुपये 2,247/- जादा आदा झाली आहे.

2) माईल्ड स्टील पुरवठा करणे करिता कोल्हापूर हे ठिकाण धरुन 141 कि.मी. लिड चार्जेस पोटी रक्कम अदा केली आहे. प्रत्यक्षात कामाचे ठिकाणापासून चंदगड/बेळगांव ही ठिकाणे जवळ असताना व त्याचे अंतर 41 कि.मी लिड चार्जेस देणे योग्य होते. तसे न केल्याने 100 कि.मी. पोटी दिलेले जादा लिड चार्जेस रक्कम रुपये 19,950/- वसूल होणे आवश्यक आहे.

3) काम पूर्ण करणेची मुदत दिनांक 15/07/2013 रोजी असताना ठेकेदाराचा दिनांक 30/04/2014 रोजीचा मुदतवाढीचा अर्ज स्विकारला आहे. कामाची मुदत संपल्यानंतर स्विकारलेला अर्ज व त्याद्वारे दिलेली भाववाढ रक्कम रुपये 2,29,993/- ही मान्य करता येत नसल्याने सदर रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

4) पॅनेल व स्टील बनविणे या बाबीची डिझाईन व मापे निश्‍चित असल्याने, त्यामध्ये महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 267 प्रमाणे बदल करता येत नाही. डिझाईनपेक्षा जादा नोंदविलेली मापे व याकरिता आदा केलेली रक्कम 87,720/- वसूल होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका परिच्छेद 10 उपपरिच्छेद 2 प्रमाणे मोजमाप पुस्तकात खाडाखोड करणे अयोग्य असताना सदर कामाचे मोजमाप पुस्तक 221/ पान नंबर 694 मधील तारखामध्ये खाडाखोड केली आहे.

6) कामाची मुदत 15/07/2013 रोजी संपत असलेने अशी खाडाखोड करून भाववाढीचा फायदा मक्तेदारास देणेचा उद्देश स्पष्ट होतो. सबब प्रथम बिलामध्ये अदा झालेली भाववाढ रक्कम रूपये 4,43,788/- ही केवळ मान्य करता येत नाही.

7) काम पूर्ण झाले असताना कामाचा ताबा हा जिल्हा परिषदेस अद्याप दिलेला नाही.

8) जिल्हा परिषदेच्या ठरावाप्रमाणे प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादित रक्कमेमध्ये खर्च करणे असताना प्रशासकीय मान्यतेपेक्षा जादा खर्च केला आहे.

**3.366 कोल्हापूर टाईप बंधारा व्हन्नाळी, तालुका कागल मधील अनियमितेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद कोल्हापूर छोटे पाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) यांचेमार्फत सदर बंधाऱ्याचे काम एजन्सी तत्वावर केले आहे. कामाच्या तपासणीमधील खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामासाठी कटिंग व बेडिंग हुक ह्या बाबीसाठी डिझाईन व मापे निश्‍चित करुन 1.1 टन स्टील निश्‍चिती केली असताना प्रत्यक्षात मोजमाप पुस्तकामध्ये 1.375 माप दर्शविले आहे. त्याआधारे जादा झालेली रक्कम 14,931/- वसूल होणे आवश्यक आहे.

2) सदर कामासाठी स्लॅब रुंदी 2 मीटर असताना ती 3.40 मीटर करण्यात आली आहे. वाढीव कामाचा खर्च ठेकेदार स्वत: करणार असल्याचे त्यांनी लेखी मान्य केले असताना त्यांना जादा कामापोटी दिलेली रक्कम रुपये 52,455/- वसूल होणे आवश्यक आहे.

3) स्लॅब संकल्पनेत बदल केल्यामुळे मूळ स्ट्रक्चरल संकल्पनेत बदल होत असल्याने पूर्ण कामाचे ड्राईंग व एस्टीमेट यामध्ये बदल होणार असल्याने त्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

4) वाढीव कामाची लेखी जबाबदारी ठेकेदाराने स्विकारली असल्याने अंदाजपत्रकास रक्कमेच्या मर्यादित रक्कम ठेकेदारास आदा होणे असताना त्यांना त्यापेक्षा जादा रक्कम रुपये 19,85,381/- आदा झाली आहे. ती वसुल होणे आवश्यक आहे.

**3.367 हासुर येथील पाझर तलावाचे काम अपूर्ण स्थितीत ठेवून केलेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** जिल्हा परिषद कोल्हापूर छोटे पाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) यांचे सदर पाझर तलावाचे काम ठेव तत्वावर लघुसिंचन विभाग यांचेमार्फत चालू आहे. कामाच्या तपासणीमधील अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंपदा) विभाग कोल्हापूर यांनी भूसंपादन कार्यवाही पूर्ण केल्याशिवाय कार्यारंभ आदेश देऊ नये, असे असतना भूसंपादन न करता कामाचे आदेश देऊन खर्च केला आहे व अद्यापही भूसंपादन काम प्रलंबित असल्याचे लेखापरीक्षणास सादर केले आहे.

2) सदर पाझर तलावास गट क्रमांक 719 हा निश्चित केला त्याप्रमाणे प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली होती. प्रत्यक्षात लेआऊट पाहता तो 721 व 719 च्या मध्यावर असल्याचे दिसून येते व बदलास कोणाचीही मान्यता नाही. त्यामुळे सदर बाबत भविष्यात अडचणी निर्माण होणेची शक्यता नाकरता येत नाही.

**3.368 उमरड, तालुका करमाळा सिमेंट बंधारा नालाखोलीकरणासह बांधकाम करणे.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) देयक प्राप्त् न झाल्यामूळे वजावटींची खात्री करता आलेली नाही

2) निविदा प्रक्रिया, कार्यारंभ आदेश, करारपत्रे इत्यादी लेखापरिक्षणास उपलब्ध नाही.

3) काम पुर्णत्वाचा दाखला उपलब्ध नाही.

4) Excess/Saving statement उपलब्ध नाही.

5) Dewatering ची रक्कम 80 टक्के ऐवही 85 टक्के प्रमाणे अदा केल्यामूळे रूपये 1,122/- चे अतिप्रदान झालेले आहे. तरी रूपये 1,122/- वसूल करण्यात यावे.

6) वापरण्यात आलेल्या साहित्याचे टेस्ट रिपोर्ट घेण्यात आलेले नाहीत.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 166 (6). अन्वये मोजमाप पुस्तिका मधिल खाडाखोड, उपरी लेखन सक्षम प्राधिका-याने प्रमाणित करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8) नमुद कामावरील एकुण खर्च रक्कम रुपये 12,19,051 एवढया रकमेवर 4 टक्के सुरक्षा ठेव रक्कम रुपये 48,762/- वसुल करणे आवश्यक असता रक्कम रुपये 21,680/- इतके कपात केलेले आहे. आता रक्कम रुपये 27,082/- करणे आवश्यक आहे.

9) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 152 (3) अन्वये एखादया बांधकामासाठी स्विकारण्यात आलेली निवीदेची रक्कम ही मंजूर अंदाजापेक्षा 10 टक्के किंवा रूपये 10,000/- यापैकी जी रक्कम अधिक असेल तर निविदेतील दरांनुसार नवीन संक्षिप्त् अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे परंतू सदर कामाची निविदा ही 13 टक्के कमी दराने स्विकारण्यात आलेली आहे व वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.369 मोहोळ (कृष्णात गायकवाड शेत), तालुका मोहोळ सिमेंट बंधारा नालाखोलीकरणासह बांधकाम करणे**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर निविदेच्या लिफाफा एक मध्ये मशिनरीसंदर्भात कोणतीही कागदपत्रे नसताना (Appendix-C मध्ये बाब क्रमांक A मधिल Excavation Equipment बाबतची) निविदा पात्र कशी झाली याचा खुलासा केलेला नाही.

2) 5 टक्के व्हॅट ऐवजी 2 टक्के म्हणजेच रूपये 90,717/- ऐवजी रूपये 36,287/- वसूल करण्यात आलेला आहे. रूपये 54,430/- कमी वसूल करण्यात आलेला आहे.

3) 4 टक्के सुरक्षा ठेव रक्कम रुपये 72,574/- वसुल करणे आवश्यक असता रक्कम रुपये 26,150/- इतके कपात केलेले आहे. आता रक्कम रुपये 46,424/- करणे आवश्यक आहे.

4) Excavation in soil,soft murum,hard murum,soft rock 10064.72 cum होत असताना 10598.61 cum चे प्रदान करण्यात आलेले आहे. रूपये 27,047/- चे अतिप्रदान झालेले आहे. (534 x 50.65 = 27,047)

5) कार्यारंभ आदेशातील अट क्रमांक 4 अन्वये सुरक्षा ठेव दोन वर्षांनी परत करणे आवश्यक असताना ती एक वर्षातच परत करण्यात आलेली आहे.

6) सदर सिमेंटबंधा-याची नोंद ग्रामपंचायत मालमत्ता नोंदवही घेणे आवश्यक असताना तशी घेण्यात आलेली नाही.

**3.370 मौजे कवठे क्रमांक 1 बोरामणी क्रमांक 2 उत्तर सोलापूर येथेल नाला खोलीकरणासह सिमेंट बंधारा बांधणे, गाळ काढणे, रिचार्ज शाफट करणे.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 40) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 4 टक्के ऐवजी 1.5 टक्के सुरक्षा ठेव कपात करण्यात आलेली आहे. रक्कम रुपये 33,808/- वसुल करणे आवश्यक आहे.

2) तांत्रीक मंजूरी, प्रशासकिय मंजूरी, अंदाजपत्रक तपासणीस उपलब्ध न झाल्यामूळे अंदाजपत्रकाप्रमाणे काम झाले असल्याबाबत खात्री करता आलेली नाही.

3) अंदाजपत्रकातील 6106.18 cum ऐवजी 7591.57 म्हणजेच 1485.39 cum झालेले आहे. 10 टक्के पेक्षा जास्त झाल्यामूळे रूपये 72,045/- वसूल करण्यात यावे.

4) सदर सिमेंटबंधा-याची नोंद ग्रामपंचायत मालमत्ता नोंदवहीत घेणे आवश्यक असताना तशी घेण्यात आलेली नाही.

5) सागर सेल्स कार्पोरेशन यांच्याकडून 620 बॅग सिमेंट खरेदी करण्यात आलेल्या आहेत. परंतु त्याच्या मूळदेयके (टॅक्स इनव्हाईस) लेखापरिक्षणासाठी उपलब्ध नाहीत.

**3.371 बंडगर वस्ती, सलगर (खु) तालुका मंगळवेढा येथील नाला खोलीकरणासह सिमेंट बंधारा बांधणे चे काम.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 49) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 5 टक्के इतकी रक्कम रूपये 6,77,188/- च्या रूपये 33,859/- वसूल करून ग्रामनिधीमध्ये जमा करण्यात आलेली नाही.

2) सदरचे काम हे मुदतपेक्षा 20 महिन्यांपेक्षा जास्त विलंबाने झाल्याने शासनाचा हेतू सफल झालेला नाही.

3) सिमेंट व सळईची मूळ देयके सादर करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 166(6) अन्वये मोजमाप पुस्तिका मधिल खाडाखोड, उपरी लेखन सक्षम प्राधिका-याने प्रमाणित करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामाची नोंद योग्य त्या तपशीलासह ग्रामपंचायत मालमत्ता नोंदवहीमध्ये घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

6) बी-1 निवेदेतील खंड 38 नुसार एखादी बाबीचे 25 टक्के पेक्षा जास्त् वाढ होत असल्यास कार्यकारी अभियंता यांची मंजूरी घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न करता Embankment चे काम 245.91 cum ऐवजी 712.68 cum जादा झालेले आहे तरी जादा खर्च रूपये 61,941/- अमान्य करण्यात येत आहे.

**3.372 गाव तलाव हिरुळपुर्णा तालुका चांदूरबाजार येथील नुतनीकरण कामातील अनियमितता. (शासकीय निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** गाव तलाव हिरुळपुर्णा नुतणीकरणाच्या कामावर रुपये 5,85,614/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रथम देयकातुन 1 % सुरक्षा ठेव रुपये 5,856/- कमी कपात करण्यात आलेली आहे.

2) मुळ अंदाजपत्रकात बाब क्रमांक 3 नमुद नसतांना देयक अदा करतांना सदर बाबीवर रुपये 17,636/- चे प्रदान करण्यात आलेले आहे.

3) कामाची निविदा 16.16% कमी दराची असल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम 152(3) नुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन मंजुरी घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक ल.पा.यो. 2001/प्र.क्र.104/जल-01/ग्राविवि व जंसवि, दिनांक 01/01/2002 तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पंरास 1001/प्रक्रमांक60/38, दिनांक 08/08/2001 नुसार आवश्यक ते चाचणी अहवाल देयकासोबत जोडणे आवश्यक असतांना असे अहवाल जोडण्यात आलेले नाही.

5) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-109/प्र क्र.54/08, दिनांक 20/05/1999 तसेच परिपत्रक क्रमांक 2009/प्र.क्र.81/पंरा-07, दिनांक 8 जुन 2009 अन्वये बांधकामाचे जागेवर नामफलक लावणे आवश्यंक असतांना अशा प्रकारची कार्यवाही केल्याबाबत दस्तऐवज लेखापरीक्षणास दिसून आले नाही.

6) रुपये 100 चे मुद्रांकावर करारनामा करण्यात आला नाही.

7) सदर कामाचा करारनामा व प्रपत्र ब वर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नाही.

8) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक परास-2009/प्र क्र.40/ जा क्र.3, दिनांक 19/10/2001 अन्वये कंत्राटदाराकडून दोन वर्ष देखभालीची हमी घेण्यात यावी व त्यासाठी 10 टक्के रक्कम राखुन ठेवावी. परंतु याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.373 साठवन बंधारा क्रमांक 2 थिलोरी तालुका दर्यापुर येथील बांधकाम खर्चातील अनियमितता. (शासकीय निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** लघुसिंचन विभागाने साठवण तलाव थिलोरी क्रमांक 2 चे बांधकामावर सन 2014-2015 मध्ये रुपये 19,14,918/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामपूर्णत्वाचे प्रमाणपत्रानुसार सदर काम विहीत मुदतीत पूर्ण झाले असल्याचे दिसते. मात्र कामाचे दुसरे चालू देयक दिनांक 30/03/2012 ला प्रदान करण्यात आले व अंतीम देयक 4 वर्षानंतर दिनांक 31/03/2015 ला प्रदान करण्यात आले आहे. यावरुन कंत्राटदाराने विहीत मुदतीत काम पुर्ण झाल्याचे दाखवण्यात आले आहे असे दिसते.

2) देयकातून उपकराचे रक्कम रुपये 9,123 कपात करण्यात आली नाही.

3) कामावर वापरण्यात आलेल्या गौणखनिजासाठी स्वामित्वधनाची रक्कम रुपये 34,916/- वसुल करण्यात आली नाही.

4) सदर कामाचे दुसरे देयकात मोजमापे चुकीचे नोंदविल्यामूळे रक्कम रुपये 20,687/- चे जादा प्रदान झाले आहे. सदर रक्कम चार वर्षानंतर तीसरे देयकातून कमी करण्यात आली आहे.

5) बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल देयकासोबत जोडण्यात आले नाही.

6) कार्यकारी अभियंता यांनी कामाची तपासणी केल्याबाबत दिनांक नमुद केला नाही.

7) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2009/ प्र क्र.81/ पंरा-7, दिनांक 08/06/2009 अन्वये कामाचे ठिकाणी कामाचा फलक लावण्याबाबत फोटो नस्तीस आढळून आले नाही.

8) पाणी उपसा करण्यासाठी वापरण्यात आलेल्या ऑईल इंजिनचे लॉगबुक ठेवण्यात आले नाही.

9) शासनाचे धोरणानुसार सिंचन तलावाचे बांधकाम होण्यापूर्वी सहकारी पाणी वाटप संस्था स्थापन केल्याचे दिसून येत नाही.

10) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/2009/प्र क्र.40/ जा क्र.3, दिनांक 19/10/2001 नुसार कंत्राटदारावर दोन वर्ष देखभालीची हमी देवून त्यासाठी 10% रक्कम राखीव ठेवणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.374 प्रशासकीय मंजुरीपेक्षा जादा खर्च करणेबाबत. (शासकीय निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** सन 2014-2015 या वित्तीय वर्षात भुसंपादनाकरीता करण्यात आलेल्या खर्चाची तपासणी केली असता पाझर तलाव व साठवन बंधारे बांधकाम या योजनेवर प्रकल्पाची एकुण प्रशासकीय मान्यता रुपये 415.31 लक्ष घेण्यात आली होती व प्रत्यक्ष खर्च एकुण रुपये 538.54 लक्ष करण्यात आलेला आहे. जादा करण्यात आलेला खर्च एकुण रुपये 123.23 लक्ष सक्षम प्राधिकारी यांची सुधारीत प्रशासकीय मंजुरी प्राप्त नसतांना केल्याचे दिसून येते.

**3.375 प्रलंबित अग्रीमाच्या रकमा समायोजीत न करणेबाबत. (स्वनिधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद अमरावती यांचेकडे सन 1981-82 ते सन 2007-2008 पर्यंत रक्कम रुपये 25,46,531/- अग्रीम प्रलंबित आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 212 नुसार अग्रीम नोंदवही नमुना 79 मधील नोंदी घेण्यात आल्या नाहीत.

2) अग्रिम कोणाकडे प्रलंबित आहे याचा तपशिल नोंदवहीत नमुद केलेला नाही. तसेच अग्रीम प्रलंबित राहण्याची कारणे व समायोजनासाठी केलेली कार्यवाही याचा तपशिल नमुद नाही.

3) अग्रिमाची रक्कम दिर्घकालावधीपासून प्रलंबित असतांना वसुल का करण्यात आली नाही याबाबत खुलासा करावा.

**3.376 पुर्ण झालेल्या 0 ते 100 हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या योजनेतुन सिंचन न करणेबाबत. (शासकीय निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 22) -** लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत 0 ते 100 हेक्टर सिंचन क्षमता असलेले प्रकल्प पुर्ण करण्यासाठी सन 2014-2015 पर्यंत रुपये 7163.07 लक्ष खर्च करण्यात आला असून 2.79% सिंचनाची टक्केवारी आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विभागाने सन 2014-2015 पर्यंत 704 योजना पूर्ण केल्या आहेत. त्यावर रुपये 7163.07 लक्ष खर्च करण्यात आला आहे. यातून 15,748 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. परंतु प्रत्यक्ष केवळ 440.50 हेक्टर क्षेत्र ओलीत होत आहे. सिंचनाची टक्केवारी केवळ 2.79% असल्याने योजनेचा उद्देश सफल झाला नाही. त्यामुळे योजनेवर निष्फळ खर्च झाला आहे.

2) लघुसिंचन विभागामार्फत फळया टाकून पाणी अडवण्यावर नियमित खर्च करण्यात येत आहे मात्र त्यातून केवळ 2.99% सिंचन होत आहे. त्यामुळे झालेला खर्च निष्फळ ठरत आहे.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1001/प्र क्र.40/ जल-3 दिनांक 19 ऑक्टोंबर 2001 नुसार नविन बंधारा हाती घेण्यापूर्वी किती शेतकरी पाणी घेतील याची खात्री करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही न केल्याने ओलीताचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते.

**3.377 कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा सस्ती - 2 तालुका पातुर येथील अपूर्ण बांधकामावरील खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद अकोला यांनी कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा सस्ती - 2 तालुका पातुर येथील अपुर्ण बांधकामावर सन 2014-2015 मध्ये रूपये 26,17,562/- खर्च केलेला आहे**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) कामाची निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द केल्यासंबंधी अभिलेखे नस्ती सोबत आढळले नसल्याने पुरेशी प्रसिध्दीबाबत खात्री पटत नाही. निविदा दिनांक 16/05/2006 रोजी उघडून कार्यादेश दिनांक 12/02/2007 रोजी नऊ महिने उशीरा देण्यात आल्याने कामास विलंब झाला करारनाम्यात विहीत मुदतीत काम पुर्ण न झाल्याने दंडाची कार्यवाही होणे, तथा कामाची किंमत, अटी, शर्ती मान्य असल्याबाबत व कोणत्या दराने काम करण्यात तयार आहे याबाबीचा उल्लेख नाही. करारानाम्यासाठी कोरा मुद्रांक केल्याचे दिसुन येत नाही.

2) कामावर वापरण्यात आलेल्या साहित्याची वापरापूर्वी शासकीय प्रयोगशाळेतून तपासणी केली नाही व 15 लक्ष किंवा अधिक रकमेच्या कामाची तपासणीस अधिक्षक अभियंता यांनी केल्याचे दिसून येत नाही.

3) उपअभियंता यांनी शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक 22/12/2000 नुसार उपअभियंता यांनी बांधकामाची मोजमापे 100 टक्के तपासतांना दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही. कार्यकारी अभियंता यांनी रूपये 50,000/- च्या प्रत्येक टप्यात 5 टक्के कामाची तपासणी केलेचे दिसत नाही. कंत्राटदाराने कामाच्या मुदतवाढीसाठी सलग तीन वेळा वेगवेगळ्या कारणांसह अर्ज सादर केला. मात्र मुदतवाढीची शिफारस करतांना उपअभियंता व कंत्राटदाराने नमुद केलेल्या कारणांमध्ये विसंगती दिसून येते.

4) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक 04/09/2000 नुसार अंदाजपत्रक तयार करतांना खोदकामासाठी चाचणी खड्डे घेणे आवश्यक असून तशी कार्यवाही करण्यात आली नसल्याने कामात मुळ परिमाणापेक्षा प्रत्यक्षात कार्यान्वीत बाबी मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. सदोष अंदाजपत्रक तयार केल्यामुळे सदर कामाचा खर्च तब्बल पाच पट वाढला आहे. कामाच्या परीमाणात वाढ झाली असतांना देखील अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (जलसंधारण) मंडळ, अमरावती यांनी पत्रक क्रमांक 2323 दिनांक 11/07/2013 अन्वये शासनाचा कोणताही प्राधिकार मंजूरी आदेशात नमुद न करता कार्यकारी अभियंता यांचे जबाबदारीवर तांत्रीक अनुमती प्रदान केली आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 124 नुसार मक्तेदाराकडे सोपविण्यात आलेल्या प्रत्येक कामाचे कार्यादेश पुस्तक ठेवण्यात आलेले नाहीत.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 67 नुसार कामाच्या प्रगतीची नोंदवही नमुना 23 मध्ये नोंद घेण्यात आली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 118 नुसार बांधकामात रचनात्मक फेरबदल करण्यापूर्वी वरीष्ठ प्राधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेण्यात आली नाही.

8) ब-1 निविदा प्रपत्रात जनरल स्पेसिफीकेशन मधील सेक्शसन 1 मधील खोदकाम परीच्छेदात साईड क्लीयरन्स वरील खर्च समाविष्ट असतांना स्वतंत्ररीत्या 1,000/- रूपये खर्च करण्यात आले असून ते वसूलपात्र आहे.

**3.378 कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा सस्ती - 1 तालुका पातुर येथील अपूर्ण बांधकामावरील खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद अकोला यांनी कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा सस्ती - 1 तालुका पातुर येथील अपुर्ण बांधकामावर सन 2014-15 मध्ये रूपये 1,72,01,78/- खर्च केलेला आहे**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) काम वाटप समिती मार्फत श्री. चौखंडे सुशिक्षीत बेरोजगार अधिकारी यांना काम वाटप करण्यात आले. परंतु त्यांनी काम न केल्यामुळे करारनामा रद्द करून श्री. जी. जे. हरमकर सुशिक्षीत बेरोजगार अधिकारी यांना

कार्यादेश दिले. विभागाने श्री. चौखंडे यांनी करारनामा करून काम पूर्ण न करणेबाबत कार्यवाहीचे अभिलेखे नस्तीस उपलब्ध झाले नाहीत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 146, 147, 148 नुसार नमुना 48 मध्ये करारनामा नोंदवही ठेवली नाही. करारनामा करण्यासाठी कोरा मुद्रांक नस्तीमध्ये जोडलेला आहे. त्यावर करारनामा केल्याचे दिसत नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 87 व शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक सिमेंट 1009/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 अन्वये साहित्याची चाचणी अहवाल प्राप्त केला नाही.

4) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए- 2000/ प्र.क्र.44/33,दिनांक 22/12/2000 नुसार उपअभियंता यांनी बांधकामाची मोजमापे 100 टक्के तपासतांना दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही. कार्यकारी अभियंता यांनी रूपये 50,000/- च्या प्रत्येक टप्यात 5 टक्के कामाची तपासणी केली नाही. कामाची मुदत संपण्याच्या 15 दिवस आधी मदतवाढीसाठी अर्ज केला नाही.

5) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-1097/प्र.क्र.-1943/33,दिनांक 04/09/2000 नुसार अंदाजपत्रक तयार करतांना खोदकामासाठी चाचणी खड्डे घेणे आवश्यक असून तशी कार्यवाही करण्यात आली नसल्याने कामात मुळ परिमाणापेक्षा प्रत्यक्षात कार्यान्वीत बाबी मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे.

6) निविदेमध्ये अंतर्भुत नसलेल्या अतिरीक्त बाबींचे दरसूची प्रस्ताव व वाढीव परीमाणाचे कलम 38 (2) नुसार प्रस्ताव तयार करून त्वरीत सादर करणे आवश्यक असतांना साडे पाच वर्षाचे विलंबाने सादर केले असल्यामुळे अंदाजपत्रकीय किंमतीमध्ये पाच पट वाढ झाली याबाबत विभागाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील उपलब्ध झाला नाही. कामाच्या परीमाणात वाढ झाली असतांना देखील अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (जलसंधारण) मंडळ, अमरावती यांनी पत्र क्रमांक 2818 दिनांक 17/08/2013 अन्वये शासनाचा कोणताही प्राधिकार मंजूरी आदेशात नमूद न करता कार्यकारी अभियंता यांचे जबाबदारीवर तांत्रीक अनुमती प्रदान केली आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 124 नुसार मक्तेदाराकडे सापविण्यात आलेल्या प्रत्येक कामाचे कार्यादेश पुस्तक ठेवण्यात आलेले नाहीत.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 67 अन्वये कामाच्या प्रगतीची नोंदवही नमुना 23 मध्ये नोंद घेण्यात आली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 118 नुसार बांधकामात रचनात्मक फेरबदल करण्यापर्वी वरीष्ठ प्राधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेण्यात आली नाही.

10) ब-1 निविदा प्रपत्रात जनरल स्पेसिफीकेशन मधील सेक्शन 1 मधील खोदकाम परीच्छेदात साईड क्लीयरन्स वरील खर्च समाविष्ट असतांना स्वतंत्ररीत्या 1,200/- रूपये खर्च करण्यात आला असून वसूलपात्र आहे.

**3.379 कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा चरणगाव - 3 तालुका पातुर येथील अपूर्ण बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद अकोला यांनी कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा चरणगाव - 3 तालुका पातुर येथील अपुर्ण बांधकामावर सन 2014-15 मध्ये रूपये 17,52,060/- खर्च केलेला आहे**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) निविदा प्रसिध्दी संबंधी अभिलेखे नस्ती सोबत आढळले नसल्याने पुरेशी प्रसिद्धीबाबत खात्री पटत नाही. निविदा दिनांक 14/09/2009 रोजी उघडून कार्यादेश दिनांक 01/01/2010 रोजी साडे तीन महिनेपेक्षा जास्त अवास्तव अशीरा कालावधीने देण्यात आलेला आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 146, 147, 148 नुसार नमुना 48 मध्ये करारनामा नोंदवही ठेवली नाही. नस्तीमध्ये कोरा मुद्रांक जोडणेत आलेला आहे. त्यावर करारनामा केलेचे दिसत नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 87 अन्वये साहित्याची चाचणी अहवाल प्राप्त केला नाही. कामावर वापरण्यात आलेल्या साहित्याची वापरापूर्वी शासकीय प्रयोगशाळेतून तपासणी केली नाही.

4) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 नुसार उपअभियंता यांनी बांधकामाची मोजमापे 100 टक्के तपासतांना दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही. कंत्राटदाराने मुदतवाढीसाठी अर्ज केला असून खोदकामात कठीण भुस्तर न लागल्यामुळे अधिक्षक अभियंता यांचे मार्गदर्शन विलंबाने घेण्यात आल्याचे कारण नमुद आहे. परंतू सदर प्रकरणासंबंधी पत्रव्यवहार नस्ती सोबत आढळला नाही.

5) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-1097/प्र.क्र.-1943/33, दिनांक 04/09/2000 नुसार अंदाजपत्रक तयार करतांना खोदकामासाठी चाचणी खड्डे घेणे आवश्यक असून तशी कार्यवाही करण्यात आली नसल्याने कामात मुळ परिमाणापेक्षा प्रत्यक्षात कार्यान्वीत बाबी मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 124 नुसार मक्तेदाराकडे सापविण्यात आलेल्या प्रत्येक कामाचे कार्यादेश पुस्तक ठेवण्यात आलेले नाहीत.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 67 अन्वये कामाच्या प्रगतीची नोंदवही नमुना 23 मध्ये नोंद घेण्यात आली नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 118 नुसार बांधकामात रचनात्मक फेरबदल करण्यापर्वी वरीष्ठ प्राधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेण्यात आली नाही.

9) ब-1 निविदा प्रपत्रात जनरल स्पेसिफीकेशन मधील सेक्शन 1 मधील खोदकाम परीच्छेदात साईड क्लीयरन्स वरील खर्च समाविष्ट असतांना स्वतंत्ररीत्या 2,500/- रूपये खर्च करण्यात आला असून वसूलपात्र आहे.

10) सदर कामाचे मुळ व सुधारीत अंदाजपत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने आवश्यक पडताळणी करता आली नाही.

### 3.380 कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा नावली, तालुका रिसोड, जिल्हा वाशिम.

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** सन 2014-15 मध्ये लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, वाशिम यांचे लेखापरीक्षण दरम्यान कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा नावली, तालुका रिसोड येथील बांधकामावर गुंतलेली रक्कम रुपये 5,27,975/- आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/प्र.क्र.172/पंरा-7 दिनांक 19/10/2011 व महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक निविदा-2012/प्र.क्र.97/पंरा-7 दिनांक 23/09/2013 अन्वये विहीत केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब केलेला नाही. स्पर्धा न करताच निविदा कार्यवाही करण्यात आली असल्याने सदर शासन निर्णयाचा भंग झालेला आहे.

2) प्रमाणक क्रमांक 1118 मध्ये गौण खनिज रक्क्म रुपये 32,064/- वसुल करण्यात आली नाही. सदर वसुलपात्र रकमेची वसुली करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 कलम 116 नुसार निविदेच्या प्रत्येक पानांवर ठेकेदार व करार करुन घेणाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आले नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता यांनी झालेल्या कामाचे 5 टक्के तपासणी केल्याचे मोजमाप पुस्तीकेत नमुद नसतांना देयक प्रदान केलेले आहे.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.44/33 दिनांक 22/12/2000 नुसार कामाचे मोजमापे नोंदवितांना अभियंता यांनी दिनांकित स्वाक्षरी केलेली नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक मा.क.पंरास/001/प्र.क्र.40/ जल.03 दिनांक 19/10/2001 अन्वये देखभालीची हमी बाबत 10 टक्के रक्कम राखुन ठेवलेली नाही.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक व्हीपीएम/1099/प्र.क्र.54/08 दिनांक 20/05/1999 तसेच शासन निर्णय क्रमांक स्थानिक विकास कार्यक्रम 369/1145 दिनांक 28/11/2003 अन्वये कामाचे ठिकाणी माहितीचे फलक लावण्यात आला नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक पंरास/1099/प्र.क्र.59/135 दिनांक 31/01/2000 नुसार बांधकामावर साहित्य वापरण्यापुर्वी गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून चाचणी करण्यात आली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 67 नुसार कामाच्या प्रगतीची नोंद नोंदवही नमुना 23 मध्ये घेण्यात आलेला नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 180 नुसार मोजमाप नोंदवही वर दुबार प्रदान टाळण्यासाठी मोजमापाच्या पानावर कर्ण रेषा मारुन रदद करुन प्रमाणक क्रमांक व दिनांकासह लाल शाईनी पृष्ठांकन करण्यात आलेली नाही.

**3.381 गाव तलाव पांगरी नवघरे, तालुका मालेगाव**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17)** - सन 2014-15 मध्ये लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद वाशिम यांचे लेखापरिक्षण दरम्यान गाव तलाव बांधकाम, पांगरी नवघरे या कामावरील गुंतलेली रक्कम रुपये 13,10,930/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे नस्ती प्रमाणे सदरचे कामावर यापुर्वी जिल्हा ग्राम विकास यंत्रणा मार्फत आश्वासीत रोजगार योजना मधून रक्कम रुपये 10,68,000/- खर्च केला असतांना त्यावेळेस सदरचे बांधकाम का पुर्ण झाले नाही याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

2) शासन आदेश क्रमांक 1093/61 दिनांक 09/12/1993 अन्वये वर्ष 1993-94 पासून ते सन 2014-15 पर्यंत जवळ-जवळ 20 वर्षापासून सदर काम अपूर्ण ठेवण्यात आले आहे.

3) करार नामा व कामाचे आदेश क्रमांक 359 दिनांक 21/02/2014 अन्वये सदरचे काम सहा महिन्यात पुर्ण करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही व कंत्राटदारावरही कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 कलम 116 नुसार निविदेच्या प्रत्येक पानांवर ठेकेदार व करार करुन घेण्याऱ्याच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आले नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता यांनी झालेल्या कामाचे 5 टक्के तपासणी केल्याचे मोजमाप पुस्तीकेत नमुद नसतांना देयक प्रदान केलेले आहे.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.44/33 जल.03 दिनांक 22/12/2000 नुसार कामाचे मोजमापे नोंदवितांना अभियंता यांनी दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक मा.क.पंरास/001/प्र.क्र.40/ जल.03 दिनांक 19/10/2001 अन्वये देखभालीची हमी बाबत 10 टक्के रक्कम राखून ठेवलेली नाही.

8) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक व्हीपीएम/1099/प्र.क्र.54/08 दिनांक 20/05/1999 तसेच शासन निर्णय क्रमांक स्थानिक विकास कार्यक्रम 369/1145 दिनांक 28/11/2003 अन्वये कामाचे ठिकाणी माहितीचे फलक लावण्यात आला नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक पंरास/1099/प्र.क्र.59/135 दिनांक 31/01/2000 नुसार बांधकामावर साहित्य वापरण्यापुर्वी गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून चाचणी करण्यात आली नाही.

10) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/प्र.क्र.172/पंरा-7 दिनांक 19/10/2011 व महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक निविदा-2012/प्र.क्र.97/पंरा-7 दिनांक 23/09/2013 अन्वये विहीत केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब केलेला नाही. स्पर्धा न करताच निविदा कार्यवाही करण्यात आली असल्याने सदर शासन निर्णयाचा भंग झालेला आहे.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 67 नुसार कामाच्या प्रगतीची नोंद नोंदवही नमुना 23 मध्ये घेण्यात आलेला नाही.

12) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 180 नुसार मोजमाप नोंदवही वर दुबार प्रदान टाळण्यासाठी मोजमापाच्या पानावर कर्ण रेषा मारुन रदद करुन प्रमाणक क्रमांक व दिनांकासह लाल शाईनी पृष्ठांकन करण्यात आलेले नाही.

**3.382 खंडाळा, तालुका मानोरा, जिल्हा वाशिम गाव तलाव बांधकाम करणे अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26)** - सन 2014-2015 मध्ये लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद वाशिम यांचे लेखापरिक्षण दरम्यान खंडाळा, तालुका मानोरा गाव तलाव बांधकाम या कामावरील गुंतलेली रक्कम रुपये 11,40,812/- आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा ग्रामविकास यंत्रणा मार्फत आश्वासीत रोजगार योजनेतून रक्कम रुपये 11,40,812/- खर्च केले आहे. रक्कम खर्च केल्यानंतर त्या वेळेस सदरचे बांधकाम पुर्ण झाले नाही.

2) शासनाचे आदेश क्रमांक 558/97 दिनांक 13/03/1997 अन्वये वर्ष 1987-88 पासून ते 2014-15 पर्यंत जवळ-जवळ 25 वर्षापासून सदरचे काम अपुर्ण आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 कलम 116 नुसार निविदेच्या प्रत्येक पानांवर ठेकेदार व करार करुन घेणाऱ्याच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आले नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता यांनी झालेल्या कामाचे 5 टक्के तपासणी केल्याचे मोजमाप पुस्तीकेत नमुद नसतांना देयक प्रदान केलेले आहे.

5) ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 नुसार कामाचे मोजमापे नोंदवितांना अभियंता यांनी दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक मा.क.पंरास/001/प्र.क्र.40/ जल.03 दिनांक 19/10/2001 अन्वये देखभालीची हमी बाबत 10 टक्के रक्कम राखून ठेवलेली नाही.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक व्हीपीएम/1099/प्र.क्र.54/08 दिनांक 20/05/1999 तसेच शासन निर्णय क्रमांक स्थानिक विकास कार्यक्रम 369/1145 दिनांक 28/11/2003 अन्वये कामाचे ठिकाणी माहितीचे फलक लावण्यात आला नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक पंरास/1099/प्र.क्र.59/135 दिनांक 31/01/2000 नुसार बांधकामावर साहित्य वापरण्यापुर्वी गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून चाचणी करण्यात आली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 67 नुसार कामाच्या प्रगतीची नोंद नोंदवही नमुना 23 मध्ये घेण्यात आलेला नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 180 नुसार मोजमाप नोंदवही वर दुबार प्रदान टाळण्यासाठी मोजमापाच्या पानावर कर्ण रेषा मारुन रदद करुन प्रमाणक क्रमांक व दिनांकासह लाल शाईनी पृष्ठांकन करण्यात आलेले नाही.

11) कंत्राटदाराने मुदतवाढीचे पत्र दिलेले नसतांना लघुसिंचन उपविभाग कारंजा यांनी केलेल्या शिफारशीनुसार सदर कामाला कार्यकारी अभियंता लघुसिंचन यांनी दिनांक 04/04/2014 ला मुदतवाढ देण्यात आली तसेच सदर कंत्राटदाराकडून विलंब शुल्क वसुल केले नाही.

**3.383 पुरसंरक्षण माती बांधकाम गाव-वडगाव ईजारा, तालुका कारंजा येथील बांधकामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 37)** - सन 2014-15 मध्ये लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद वाशिम यांचे लेखापरिक्षण दरम्यान पुरसंरक्षण अंतर्गत बांधकाम योजनेतील कामाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्राम पंचायत स्तरावर प्रमाणक क्रमांक 04 दिनांक 28/05/2015 अन्वये 22/05/2015 ते 28/05/2015 या कालावधीत मातीचे काम केल्याने रक्कम रुपये 51,700/- मजुरीचे शोधन केले असतांना देयका सोबत जोडलेल्या बांधकाम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्रा प्रमाणे सदरचे काम दिनांक 30/03/2015 रोजी पुर्ण झालेले असतांना शासकीय निधीतून नियमबाहयपणे रक्कम काढल्याचे आढळते.

2) बांधकाम पुर्ण नसतांना शाखा अभियंता यांनी मोजमापे नोंदवून कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग वाशिम यांनी काम पुर्णत्वाचे खोटे प्रमाणपत्र दिले. याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

3) मजुरीचे हजेरीपटात सदर काम 7 दिवसात पुर्ण झाल्याचे दिसते. परंतु काम सुरु करण्याचे आदेश व काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र यात तीन दिवसांचा कालावधी असल्याने काम न करता दिनांक 31/03/2015 रोजी शासकीय निधीतून नियमबाहयपणे रक्कम काढल्याचे आढळते.

4) ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.472/वित्त-09, दिनांक 09/02/2009 अन्वये ग्राम पंचायतीने फक्त त्यांचे गावठाण्यातील विकास कामे करणेबाबत आदेश असतांना सदर काम त्यांचे गावठाणा असलेबाबत खात्री न करता ग्राम पंचायतीला दिले आहे.

5) ग्राम विकास व जलसंधारण विभागचे परिपत्रक क्रमांक व्हीपीएम/1099/प्र.क्र.54/08/ दिनांक 20/05/1999 तसेच शासन निर्णय क्रमांक स्थानिक विकास कार्यक्रम 369/1145 दिनांक 28/11/2003 अन्वये कामाचे ठिकाणी माहितीचे फलक लावण्यात आला नाही.

6) 4 टक्के प्रमाणे विक्रीकराची रक्कम रुपये 10,400/- वसुल करणे आवश्यक आहे.

7) आयकर रक्कम रुपये 5,200/- वसुल करणे आवश्यक आहे.

### 3.384 भुसंपादन मोबदला जादा प्रदान करणे व नोंदवही नमुना 141 अपुर्ण असल्याची अनियमितता.

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** सन 2014-2015 या वित्तीय वर्षात लघु पाटबंधारे विभाग जिल्हा परिषद यवतमाळ यांचे अतर्गत भुसंपादन मोबदला देय रक्कमेपेक्षा जादा देण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भुसंपादन नमुना 041 सविस्तर भरण्यात आली नसल्यामुळे जमीनीचा मोबदला कशाच्या आधारावर दिला याबाबत खात्री करता आली नाही.

2) जमिनीचा मोबदला दिल्याबाबत पोच नाही.

3) शेतकऱ्यांकडे सरकारी थकबाकी नसल्याबाबत अभिलेखे नस्तीला आढळले नाही.

4) प्रमाणक क्रमांक 1194, दिनांक 10/10/2014 रुपये 12,62,184/- चे देयकाची रक्कम मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, यवतमाळ यांचे आदेश क्रमांक येजीपी/ सिंचन अभिखनन/वशि 157417, दिनांक 25/08/2014 अन्वये (मुळ भुसमाक्र.18/47/92-93) भुसमा क्रमांक.1/28 अ 11-12 मौजा डोंमगा, तालूका नेर प्रकरणात दिनांक 19/07/2014 रोजी पारीत करण्यात आलेल्या अंतिम निवाडयानुसार संबधीत भुधारकांना वाढीव मोबदला अदा करण्याकरिता एकुण रुपये 12,62,184/- मंजूर करण्यात आले आहे. सदर रक्कम खालील प्रमाणे भुधारकांना श्री. सुनराव करीबोदिन रक्कम रुपये 7,01,858/- श्री. विश्वासराव वा खेडागडे रुपये 63,432/- श्री बबन गो विर रक्कम रुपये 4,96,894/- अशी एकुण रक्कम रुपये 12,62,184/- रुपये अदा केले. परंतू अनुक्रमांक 1 श्री सुनराव ज करीबोदिन यांना वाढीव मोबदला अदा केल्याचे विवरणपत्राची पडताळणी केली असता त्यांना वाढीव मोबदला रक्कम रुपये 6,65,261/- देय असतांना रक्कम रुपये 7,01,858/- अदा करण्यात आल्यामुळे रक्कम रुपये 36,597/- जादा प्रदान केलेली रक्कम वसुल करुन योग्य शिर्षाखाली जमा करावी.

### 3.385 आसोला जहॉगीर नवीन पाझर तलावाचे बांधकामाध्ये चुकीचे मोजमाप घेणेबाबत.

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मोजमाप पुस्तीका क्रमांक 4598 पान क्रमांक 15 वर कठीण खडकामध्ये खोदकामाचे मोजमाप 0.00x30=0.00 येत असतांना मोजमाप 93.00 घेवुन रक्कम रुपये 26,370/- चे कंत्राटदारास जादा प्रदान केले.

2) मोजमाप पुस्तीकेत मुल्यांकन नोंदवीतांना अंदाजपत्रकातील दर न घेता weighted rate नुसार मुल्यांकन दर्शविले. तसेच अंदाजपत्रकात दरपृथ:करण नसल्याने दराबाबत पडताळणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 नुसार कामाचे प्रत्येक भागाचे किमान 5% तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

**3.386 वाघोरा येथील तलावाचे मुल्यांकनाची परिगणना करतांना चुकीची केल्याने जादा प्रदान झालेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कंत्राटदाराने स्विकारलेला निविदा दर 3.5 टक्के कमी आहे. सदर बाबत कंत्राटदारास प्रदान करतांना रॉयल्टीच्या रक्कमेसह असलेल्या एकुण मुल्यांकनावर 3.5% कमी करुन शिल्लक रकमेतुन कपाती करणे आवश्यक आहे.असे असंतांना एकुण मुल्यांकनातुन रॉयल्टीची रक्कम रुपये 10,54,485/- वजा केल्यानंतर असलेल्या रकमेवर 3.5% कमी स्वीकृत निविदादाराची कपात दर्शविली आहे. त्यामुळे कंत्राटदारास रक्कम रुपये 36,907/-इतक्या रकमेचे जादा प्रदान झाले आहे.

2) नस्तीमध्ये काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र नसल्याने काम पुर्ण झाले किंवा नाही याबाबत खुलासा करावा.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 168 नुसार कामाचे प्रत्येक भागाचे किमान 5% तपासणी केल्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी तपासणी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

**3.387 जमिन भुसंपादन प्रकरणी मोबदला उशिरा दिल्याने व्याजासह रक्कम दिल्याने झालेल्या शासनाचे नुकसानी बाबत.**

**जिल्हा परिषद बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मौजे अंत्रज तालुका खामगाव येथील भुसंपादन प्रकरणी रक्कम रुपये 2,45,315/- प्रति हेक्टर भुसंपादन केली त्यावेळी प्रदान न केल्याने शासनास व्याज, कोर्टखर्च, वकील फी बाबत रक्कम रुपये 8,16,627/- रुपये अतिरिक्त भुर्दड सोसावा लागला. विभागाने त्यावेळेस योग्य नियोजन करुन सदर रकमेची मागणी केली असती तर शासनास अतिरिक्त भुर्दड पडला नसता.

2) वरिल प्रमाणेच श्री.रमेश मांगीलाल पवार यांना 2.58 हेक्टर जमीन संपादीत प्रकरणी सुध्दा रक्कम रुपये 1,56,460/- भुसंपादन केली तेव्हाच प्रदान न केल्याने शासनास व्याजासह रक्कम रुपये 5,19,129/- अतिरिक्त प्रदान करण्यात आले.

3) त्याच प्रमाणे श्री.मन्साबाई तायबा पवार यांना 0.73 हेक्टर जमीन संपादीत प्रकरणी सुध्दा रक्कम रुपये 39,240/- भुसंपादन केली तेव्हाच प्रदान न केल्याने शासनास व्याजासह रक्कम रुपये 1,32,708/- अतिरिक्त प्रदान करण्यात आले.

4) आयकर अधिनियम 1961 चे नियम 194(LA) नुसार नुकसान भरपाईची रकमेबाबत रुपये 1.00 लक्ष च्यावर रक्कम अदा केली असल्यास त्यावर 10 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असतांना श्री.महाले,श्री.पवार व मन्साबाई पवार यांना प्रदान रकमेवर आयकर कपात न केल्याने शासनाचे रक्कम रुपये 1,87,979/- रकमेचे नुकसान झाले आहे.

5) मौजे अंत्रज तालुका खामगाव येथील गट क्रमांक 204 मधील एकुण 3.82 हेक्टर जमीन सिंचना करीता एकूण 3 शेतकऱ्याकडून प्रति हेक्टर रक्कम रुपये 1,20,000/- प्रमाणे संपादित करुन (3.82x1,20,000=4,58,400/- देय होते. त्यावेळेच्या निवाडयानुसार रुपये 2,13,085/- एवढी रक्कम संबधीतास देण्यात आली उर्वरित रक्कम रुपये 2,45,315/- विलंबाने प्रदान केल्याने त्यावरील व्याज,कोर्ट खर्च,वकिल फी रक्कम रुपये 8,16,6627/- एवढी अतिरिक्त रक्कम संबधीतास देण्यात आली आहे.

**3.388 डोंगरताल, उपविभाग रामटेक येथे साठवण बंधारा बांधकामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** मौजा डोंगरताल येथील साठवण बंधारा बांधकामावर रूपये 9,65,449/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नियमबाह्यपणे निविदा स्विकृतीबाबत - विभागाने नियमबाहयपणे 23.44 टक्के कमी दराची निविदा स्विकारली आहे. महाराष्ट् शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परीपत्रक क्रमांक जीव्हीएन-1088/समिती/सीआर/37(5)/भाग-1/इमा-2, दिनांक 13/03/1989 मधील सुचनेनुसार कार्यवाही केलेली नाही.

2) अंदाजपत्रकातील परिमाणापेक्षा कमी/जादा काम करणेबाबत - अंदाजपत्रकातील परीमाणापेक्षा रूपये 37,879/- चे जादा काम करून प्रदान केलेले आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. संकीर्ण-2004/ प्र.क्र.85/रस्ते-01, दिनांक 11/06/2004 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेतलेली नाही.

3) तांत्रिक मंजूरीबाबत - तांत्रिक मंजूरी घेऊन नंतर प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. महाराष्ट् जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 151 नुसार प्रथम प्रशासकिय मंजूरी घेऊन त्यानंतर तांत्रिक मंजूरी देणे आवश्यक आहे.

4) कामाचे स्थान बदलाबाबत - निर्धारित स्मशानभूमीची बांधकामाची जागा, कंत्राटदार यांचे अर्जानुसार शाखा अभियंता यांनी बदलवून दिली. महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 118(1) व 120(1) नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेतलेली नाही.

5) एकाच ठिकाणी (गावठाणमध्ये) बंधारा बांधकामाबाबत.- गावठाणमध्ये डोंगरताल(3) व डोंगरताल(4) असे दोन साठवण बंधारे बांधण्यात आले, परंतु त्यासाठी पर्जन्यमान व पाण्याची सेवा याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र प्राप्त केलेली नाही.

**3.389 मुरादपूर, उपविभाग उमरेड येथील लघुसिंचन तलावाचे मुख्य जल विमोचकाचे कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** मौजा मुरादपूर येथील लघुसिंचन तलावाचे मुख्य जल विमोचकाचे बांधकामावर रूपये 14,56,286/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे नावे आलेला धनादेश क्रमांक 39916, दिनांक 08/01/2013 रूपये 17,500/- व डिडी क्रमांक 462674, दिनांक 03/12/2013 रूपये 18,900/- असे एकूण रूपये 37,400/- लेखापरीक्षणाचे दिनांकापर्यंत जमा न केल्याने व्याजाचे नुकसान झालेले आहे.

2) विभागाने 21.51 टक्के कमी दराची निविदा स्विकारली आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक जीव्हीएन-1088/समिती/सीआर/37(5)/भाग-1/ इमा-2, दिनांक 13/03/1989 मधील सुचनेनुसार कार्यवाही केलेली नाही.

3) अंदाजपत्रकातील परिमाणापेक्षा रूपये 27,537/- चे जादा काम केलेले आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2004/प्र.क्र.85/रस्ते-01, दिनांक 11/06/2004 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेतलेली नाही.

4) बांधकामाच्या ठिकाणी फलक लावलेला नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस-1099/प्र.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 नुसार बांधकामाच्या ठिकाणी दर्शनी भागात फलक लावणे आवश्यक आहे.

5) कार्यारंभआदेशानुसार दिनांक 23/10/2013 रोजी काम पुर्ण करणे आवश्यक होते. प्रत्यक्षात दिनांक 20/10/2014 रोजी काम पूर्ण करण्यात आले. प्रथम मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्रमांक 2565 दिनांक 30/10/2014 नुसार दंडात्मक कार्यवाही करून दिनांक 01/03/2014 ते 30/10/2014 या कालावधीकरीता दुसरी मुदतवाढ देण्यात आली. प्रत्यक्षात बांधकामाची मुदत संपण्यापूर्वीच मुदतवाढ देणे आवश्यक आहे. त्यामुळे दिनांक 30/10/2014 रोजी पुन:श्च मुदतवाढ न देता, महाराष्ट्र जिल्हा परीषद व

पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 149 नुसार केलेल्या कसुरीबाबत नुकसान भरपाई वसुल करणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 151 नुसार प्रशासकीय मंजूरी घेऊन त्यानंतर तांत्रिक मंजूरी देणे आवश्यक असतांना तांत्रिक मंजूरी आधी घेऊन नंतर प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

**3.390 नाला सरळीकरण व खोलीकरण नाचणगाव, तालुका देवळी येथील कामावरील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा**, **सन 2014-2015** (**परिच्छेद क्रमांक 2) -** सदर कामावर एकूण रुपये 1,95,689/- खर्च करण्यात आला आहे.

1) बाबनिहाय एकूण रुपये 5,15,079/- खर्च केलेला आहे. निविदा अट क्रमांक 38 (5) व (6) नुसार जर एखादया बाबीवर 25 टक्के बदल अथवा रुपये 5000/- पेक्षा जास्त यापैकी जे अधिक असेल त्याविषयी सुधारीत तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम, विभाग परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2004/प्र.क्र./85 दिनांक 11/06/2004 प्रमाणे अंदाजपत्रक काळजीपूर्वक व वस्तुनिष्ठ परिस्थितीवर आधारीत असावे. एखादया बाबीच्या निविदेतील परिमाणात 25 टक्के वाढ होणे अटळ असल्यास त्याविषयीचा सविस्तर प्रस्ताव कारणांसह कार्यकारी अभियंता यांना उप अभियंता यांनी तात्काळ सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 154(3) तसेच 124 प्रमाणे बांधकामाच्या नमूद बाबीवरील जादा खर्चाचे काम ठेकेदारास तोंडी आदेशावरुन पार पाडून घेता येणार नाही. जादा खर्चाबाबत सक्षम अधिका-यांची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक आहे. कामात वाढ किंवा घट करावयाची असल्यास सक्षम अधिका-याच्या सुधारित तांत्रिक मंजुरी व प्रशासकीय मंजुरी शिवाय काम करु नये असे असल्यामुळे रक्कम वसुल पात्र ठरते.

3) प्राकलनातील परिमाणनुसार काम न करता प्राकलन किंमतीच्या 37.27 टक्के इतके काम केलेले आहे व 62.73 इतका कमी केलेला आहे व 37.27 टक्के किमंती इतके Reduced Estimate तयार केले आहे. सदर Reduced Estimate वस्तुनिष्ठ परिस्थितीवर आधारीत नसून समायोजनात्मक बाबीवर केले आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 156 अन्वये कोणत्याही निर्देशित कामात वाढ / बदल करण्यासाठी कंत्राटदारास सांगण्यात आले असेल, तर कोणत्या अटीवर त्याने असे काम करावे त्या अटी विवरणपत्रात नमूद करुन संमती प्रित्यर्थ सही घेण्यात यावी. याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्याने सदरहु खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येणार नाही.

5) सदर कामाचा मुल्याकन मूळ अंदाजपत्रक वरुन काम करण्यात आला आहे. त्यातील परिमाणातील मुल्यांकन नुसार नंतर Reduced Estimate टीएस 121/15 दिनांक 29/03/2015 केले आहे व अंदाजपत्रक लेखापरीक्षणास सादर केले नाही.

**3.391 साठवण बंधारा, डवालापूर तालुका हिंगणघाट येथील बांधकामात आढळून आलेली अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा**, **सन 2014 - 2015** (**परिच्छेद क्रमांक 3) -** सदर कामावर प्रमाणक क्रमांक 275, दिनांक 26/03/2015 रक्कम रुपये 5,79,624/- (दुसरे धावते देयक) अन्वये खर्च करण्यात आले आहे.

1) दिनांक 06/02/2013 पर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही, कंत्राटदाराने प्रथम मुदतवाढ मागितली असतांना दिनांक 08/02/2013 ते 31/03/2014 पर्यंत काम पूर्ण करण्याचा वाढीव कालावधी करीता प्रती दिवस रुपये 60/- दंडासह काम पूर्ण करण्याची शिफारस करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात रुपये 10/- प्रती दिवस दंडासह काम पूर्ण करण्याची शिफारस कार्यकारी अभियंता यांच्या आदेशाने करण्यात आली. तसेच द्वितीय मुदतवाढ दिनांक 01/04/2014 ते 31/03/2015 पर्यंत रुपये 10/- दंडासह देण्यात आली. बी-1 फॉर्म करारनामा मधील नमूद क्लॉज 6 अन्वये जेव्हा कामाचा कालावधी वाढवावयाचा असेल तेव्हा कंत्राटदाराने 30

दिवसापूर्वी कार्यकारी अभियंता यांना लेखी कळविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच मुदतवाढ देतांना रुपये 10/- दंडासह मुदतवाढ देण्यात आली आहे, परंतु दिलेली मुदतवाढ ही कोणत्या प्राधिकारातंर्गत देण्यात आली याचा खुलासा होणे आवश्यक आहे. बी-1 फॉर्म करारनामा या मधील क्लॉज 6 चे काटेकारपणे पालन करण्यात आलेल नाही. याबाबत अर्धसमास पत्र दिले असता समाधानकारक उत्तर देण्यात आले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. लपायो 1099/प्र.क्र.347/जल1 मंत्रालय, मुंबई-400012, दिनांक- 31/07/2000 अन्वये मुद्दा क्रमांक 5.4 नुसार जि.प. अंतर्गत 0-100 हेक्टर सिंचन क्षमतेच्या नवीन योजनेसाठी पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याखेरीज योजनेचे बांधकाम सुरु करण्यासाठी कार्यारंभ आदेश देण्यात येऊ नयेत. असे असतांना पाणी वापर संस्थेची त्या क्षेत्राच्या सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे नोंदणी करण्यात आलेली नाही त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) निविदा अट क्रमांक 38 (5) व (6) नुसार जर एखाद्या बाबीवर 25 टक्के बदल अथवा रुपये 5,000/- पेक्षा जास्त यापैकी जे अधिक असेल त्याविषयी सुधारीत तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2004/प्र.क्र./85 दिनांक 11/06/2004 प्रमाणे अंदाजपत्रक काळजीपूर्वक व वस्तुनिष्ठ परिस्थितीवर आधारीत असावे. एखाद्या बाबीच्या निविदेतील परिमाणात 25 टक्के वाढ होणे अटळ असल्यास त्याविषयीचा सविस्तर प्रस्ताव कारणांसह कार्यकारी अभियंता यांना उप अभियंता यांनी तात्काळ सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 154 (3) प्रमाणे बांधकामाच्या नमूद बाबीवरील जादा खर्चाचे काम ठेकेदारास तोंडी आदेशावरुन पार पाडून घेता येणार नाही. जादा खर्चाबाबत सक्षम अधिका-यांची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 156 अन्वये कोणत्याही निर्देशित कामात वाढ / बदल करण्यासाठी कंत्राटदारास सांगण्यात आले असेल तर कोणत्या अटीवर त्याने असे काम करावे त्या अटी विवरणपत्रात नमूद करुन संमती प्रित्यर्थ सही घेण्यात यावी. याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्याने सदरहु खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येणार नाही. सदर कामात मंजुर प्राकलनातील खालील बाबीत रुपये 5,000/- अधिक बदल झालेला आहे. त्यामुळे उपरोक्त रक्कम रुपये 58,431/- वसुल होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम क्रमांक 146 व 148 अन्वये करारनामा करतांना वापरण्यात आलेल्या स्टॅम्प पेपर क्रमांक एफए 216592 ते 216595 संपूर्णपणे कोरा आहे. त्यावर अटी व शर्ती लिहिण्यात आलेल्या नाही. एखादे बांधकाम करत असतांनी कंत्राटदारासोबत करारनामा करणे गरजेचे आहे. परंतु करारनामा कोरा असल्यामुळे प्रत्यक्षात करारनामा केला किंवा नाही. याबाबत सांशकता निर्माण होते. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 08 दिनांक 22/04/2016 दिले असता समाधानकारक उत्तर देण्यात आले नाही.

5) सदर कामात खोदकामाची बाब एकत्रित करण्यात आलेली आहे त्याकरिता खोदकामाचे एकत्रित वेटेड रेट विवरणपत्र कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरीसह तयार करण्यात येते परंतु ते सादर करण्यात आले नाही. त्यामुळे सदर प्रदान करण्यात खोदकामाची रक्कम तांत्रिक मंजुरीसह देण्यात आल्याचे निष्पन्न होत नाही.

6) सदर कामासाठी सिमेंट, रेती, व गिटटी इत्यादी साहित्याचा वापर करण्यात आलेला आहे. परंतु महाराष्ट्र शासन, ग्राम विकास परिपत्रक क्र. साहित्य/1099/प्र.क्र.65/35 मंत्रालय, मुंबई दिनांक 30 जुन 2006 अन्वये बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतून करणे आवश्यक असतांना व जवळपास 90 टक्के काम पूर्ण होत असतांना दिनांक 11/03/2015 रोजी चाचणी करण्यात आल्याचे नस्तीवरुन दिसुन येते. बांधकाम सुरु करण्यापूर्वी कोणत्याही वापरात येत असलेल्या साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतून चाचणी करणे आवश्यक असतांना नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन बांधकाम नियमावली 296 (ब) अन्वये माहे फेब्रुवारी व मार्च मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात येवु नयेत. असे असतांना नियमबाहयपणे दिनांक 07/03/2012 रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

**3.392 साठवण बंधारा, पांढुर्णा तालुका आष्टी कामावरील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा**, **सन 2014-2015** (**परिच्छेद क्रमांक 5) -** सदर कामावर प्रमाणक क्रमांक 80 दिनांक- 22/07/2014 रक्कम रुपये 9,82,712/- अन्वये खर्च करण्यात आले आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक ग्रासयो/प्र.क्र.-1/यो-9, दिनांक 2007 मधील परिच्छेद क्रमांक 2.7 अन्वये सुबेअ यांना कंत्राटदाराप्रमाणे 5% सुरक्षा अनामत रक्कम कार्यादेश दिल्यानंतर त्वरीत विभागाकडे जमा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही 3 टक्के सुरक्षा देयकातून कपात केली आहे तरी कमी कपात रक्कम रुपये 22,000/- वसुल होणे आवश्यक आहे.

2) मुंबई विक्रीकर आयुक्त यांच्या दिनांक 01/04/2005 च्या अधिसुचनेनुसार तसेच महा. व्हॅल्यु ॲडेड कायदा 2002 मधील तरतुदी नुसार  ठेकेदार नोंदणी धारक नसल्यास 4 टक्के विक्री पोटी व नफयापोटी वसुली करणे आवश्यक असतांना ती 2 टक्के वसुल केलेली आहे.  कमी वसुल 2 टक्के रुपये 22,000/- वसुल करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम क्रमांक 146 व 148 अन्वये तसेच जिल्हा परिषद व पंचायत लेखासंहिता 1968 मधील कलम 116(2) नुसार करारनामा करतांनी त्यावर अटी व शर्ती तसेच दिनांक लिहिण्यात आलेल्या नाही. एखादे बांधकाम करत असताना कंत्राटदारासोबत करारनामा करणे गरजेचे आहे. परंतु, करारनामा कोरा असल्यामुळे प्रत्यक्षात करारनामा केला किंवा नाही. याबाबत सांशकता निर्माण होते.

4) अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.अ.अ./रशवि-171 दिनांक 17/01/1995 अन्वये पाझर तलाव, बंधारा ची कामे सुरु करण्याचे ठेकेदारास कार्यादेश देतांना सदर कार्यादेशाची प्रत दक्षता व गुणनियंत्रण मंडळास कार्यकारी अभियंता यांनी पाठविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) लाभधारकांची पाणी वापर संस्था स्थापन करुन पूर्ण झालेले हस्तांतरण करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण, विभागाचे परिपत्रक क्रमांक - परास 1001/प्र.क्र.40/जल-3, दिनांक 19/10/2001 नुसार संबंधित ठेकेदाराने देखभालीची हमी घेणे व ठेकेदाराची 10 टक्के रक्कम ठेवण्याचे निर्देश असतांना तशी कार्यवाही केली नाही.

7) शासन निर्णय क्रमांक लपायो1003/विपु/प्र.क्र.17/जल-1 दिनांक- 22 मार्च 2003 नुसार 05 लाखापेक्षा जास्त रक्कमेची दुरुस्ती कामांना मुख्य अभियंता स्थानिक स्तर महाराष्ट्र राज्य, पुणे यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

8) बंधारे बांधकाम व दुरुस्ती कामाच्या तांत्रिक मान्यतेची प्रत नस्तीसोबत नसल्याने कोणत्या DSR/CSR प्रमाणे दर घेतलेले आहेत. ते तपासता आले नाहीत.  तसेच तांत्रिक मान्यता पत्रातील अटी/शर्ती पालनाची खात्री करता आली नाही.

9) विमा, आयकर, वॅट, उपकर, रॉयल्टी, टेस्ट रिपोर्ट अनुक्रमे रक्कम रुपये 11,000/- रुपये, 47,300/- रुपये, 11,000/- रुपये, 15,984/- रुपये, आणि 10,000/- असे एकूण रुपये 95,284/- त्या त्या विभागात जमा करुन चलनासह पूर्तता दर्शवावी.

**3.393 साठवण बंधारा, धामकुंड तालुका कारंजा (घा.) कामावरील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा**, **सन 2014-2015** (**परिच्छेद क्रमांक 7) -** सदर कामावर एकूण रुपये 7,96,474/- खर्च करण्यात आलेला आहे.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जल संधारण विभाग शा. नि. क्रमांक ग्रासयो/प्र.क्र.-1/यो-9 8 मे दिनांक 2007 मधील परिच्छेद 2.7 अन्वये सुबेअ यांना कंत्राटदाराप्रमाणे 5% सुरक्षा अनामत रक्कम कार्यादेश दिल्यानंतर त्वरीत विभागाकडे जमा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही 3 टक्के सुरक्षा देयकातून कपात केली आहे.

2) सिमेंट कंझम्पशन स्टेटमेंट मध्ये 779 बॅग सिमेंटच्या गोण्याचा वापर केलेला आहे. असा उल्लेख आहे. परंतु खरेदीचे बिल उपलब्ध नाही. त्यामुळे व्हॅट समाविष्ट असल्याबाबत अभिप्राय देता येत नाही. सिमेंटच्या किमंतीच्या 12.5 टक्के आकारणी करुन ठेकेदाराकडून वसुल करुन योग्य शासन खाती भरल्याची चलनासह पूर्तता दर्शवावी.

3) नस्तीची तपासणी केली असता सदर काम दिनांक 07/05/2014 ला पूर्ण केले. आहे. व संबंधित ठेकेदार याचा मुदतवाढीच्या अर्जाचा दिनांक 15/09/2014 आहे. उपअभियंता यांचा मुदतवाढीचा प्रस्ताव जावक क्रमांक 462/14 दिनांक 17/09/2014 व मुदतवाढ मंजुरी चे पत्र क्रमांक 980 अ दिनांक 21/10/2014 चा आहे. यात दिनांक 20/01/2014 ते 31/05/2014 या कालावधीत रुपये 15/- दंड आकारणी करावी असे नमूद आहे. मुदतवाढीचा अर्ज, काम पूर्ण होण्याच्या 15 दिवस आधी करणे आवश्यक असतांना नियमबाह्यरित्या काम पूर्ण झाल्यानंतर 132 दिवसानंतर घेण्यात आली आहे व दंड आकारणी प्रती दिवस रुपये 15/- प्रमाणे करण्यात यावी, असे पत्रात उल्लेख केलेला आहे. काम पूर्ण झाल्यानंतर 132 दिवसाची मुदतवाढ व रुपये 15/- दंड कोणत्या नियमाखाली केलेला आहे. याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

4) सदर कामाचे अंदाजपत्रक किंमत रुपये 12,49,890/- आहे. व तांत्रिक मंजुरी रुपये 11,68,212 आहे. व करारनामा केलेला आहे. सदर काम मुल्यांकनाइतके न करता एकुण मुल्यांकन 8,05,102/- इतके केले आहे व कमी किंवा बचत करण्याची कारणे नमूद करुन Reduced Estimate टी एस नं 71/20144 दिनांक 27/10/2014 रक्कम 8,37,306/- करण्यात आले Reduced Estimate काम पूर्ण झालेनंतर 140 दिवसानंतर केले आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) विमा, आयकर, व्हॅट, उपकर, रॉयल्टीची रक्कम अनुक्रमे रुपये 5,723/-, रुपये 41,759/-, रुपये 5,723/- रुपये 12,268/- व रुपये 46,989/- एकुण रुपये 1,12,462/- त्या त्या विभागाला जमा करुन चलनासह पूर्तता दर्शवावी.

6) मुळ अंदाजपत्रका इतके काम न करता कामात बचत केली आहे. उपअभियंता यांचे चाचणी अहवालातील कारण खोदकाम पाणी न लागल्याने बचत, नाल्याचे खोदकाम कमी झालेले तसेच पिंचीग काम रदद झाले व इतर अनुषंगिक कामाची बचत झाल्याने 3.63 इतकी कमी झाल्याचे कारण नमूद करुन काम पूर्ण झाल्यानंतर 140 दिवसानंतर Reduced Estimate तयार केलेला आहे. सदर कामावरील खर्चाचे मोजमाप पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. तसेच मुल्यांकनाइतकेच अंदाजपत्रक तयार केले आहे. याचाच अर्थ प्रत्यक्षात सदर काम आधीच झालेले आहे व नंतर इतर कारणासोबत चाचणी अहवालात नमूद करुन Reduced Estimate तयार केले आहे. त्यामुळे सदर खर्च नियमबाह्य आहे, व मंजुर प्राकलनापेक्षा प्रत्यक्ष कमी खर्च व नमूद बाबीवरील काम न केल्याने कामाच्या दर्जा विषयी शंका वाटते व योजनेचा उददेश सफल झाला नाही.

**3.394 साठवण बंधारा, हिवरा (बोरगाव) तालुका सेलू कामावरील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा**, **सन 2014-2015** (**परिच्छेद क्रमांक 8) -** सदर कामावर एकूण रुपये 2,46,545/- खर्च करण्यात आलेला आहे.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक ग्रासयो/ प्र.क्र.-1/यो-9, दिनांक 2007 मधील परिच्छेद क्रमांक 2.7 अन्वये सुबेअ यांना कंत्राटदाराप्रमाणे 5% सुरक्षा अनामत रक्कम कार्यादेश दिल्यानंतर त्वरीत विभागाकडे जमा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही 3 टक्के सुरक्षा देयकातून कपात केली आहे तरी कमी कपात रक्कम रुपये 22,325/- वसुल होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, बांधकाम नियमावली 296(ब) अन्वये माहे फेब्रुवारी व मार्च मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात येवु नयेत असे असतांना नियमबाह्यपणे दिनांक 25/02/2014 रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

3) निविदा अट क्रमांक 38 (5) व (6) नुसार जर एखाद्या बाबीवर 25 टक्के बदल अथवा रुपये 5,000/- पेक्षा जास्त यापैकी जे अधिक असेल त्याविषयी सुधारीत तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2004/प्र.क्र./85 दिनांक 11/06/2004 प्रमाणे अंदाजपत्रक

काळजीपूर्वक व वस्तुनिष्ठ परिस्थितीवर आधारीत असावे. एखादया बाबीच्या निविदेतील परिमाणात 25 टक्के वाढ होणे अटळ असल्यास त्याविषयीचा सविस्तर प्रस्ताव कारणांसह कार्यकारी अभियंता यांना उप अभियंता यांनी तात्काळ सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत लेखासंहिता 1968 चे नियम 154(3) तसेच 124 प्रमाणे बांधकामाच्या नमूद बाबीवरील जादा खर्चाचे काम ठेकेदारास तोंडी आदेशावरुन पार पाडून घेता येणार नाही. जादा खर्चाबाबत सक्षम अधिका-यांची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक आहे, कामात वाढ किंवा घट करावयाची असल्यास सक्षम अधिका-याच्या सुधारित तांत्रिक मंजुरी व प्रशासकीय मंजुरी शिवाय काम करु नये असे असल्यामुळे रक्कम 3,13,645/- वसुलपात्र ठरते.

4) विमा, आयकर, व्हॅट, उपकर, रॉयल्टीची रक्कम अनुक्रमे रुपये 10,573/-, रुपये 45,205/-, रुपये 10,513/- आणि रुपये 15,052/- एकुण रुपये 81,283/- त्या त्या विभागाला जमा करुन चलनासह पूर्तता दर्शवावी.

**3.395 माजी मालगुजारी तलाव विशेष दुरुस्ती मोहघाट बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** लघुसिंचन विभागाचे जिल्हा परिषद, भंडारा येथिल सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात असे निदर्शनात आले की मामातलाव विशेष दुरुस्ती मोहघाटावर रुपये 5,23,138/- चे खर्च दर्शविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राकलन तयार करणारे शाखा अभियंता व तांत्रिक मंजुरी देणारे अधिकारी यांनी प्रत्यक्षात प्राकलनातील अंतर तपासले नसल्यामुळे संबंधित कंत्राटदारास रुपये 21,738/- चे जादा प्रदान झाले आहे.

2) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) पुणे, यांचे परिपत्रक क्र. मुअ/प्रशा-5/2611, दि. 03/08/2004 व B1 फार्म मधील Schedule A पान क्रमांक 10 मधील (4) नुसार अंदाजपत्रकात साफसफाई (site clearance) चा समावेश करण्यात येवु नये असे असतांनाही सदर बाबींसाठी रक्कम रुपये 3,024/- चे प्रदान केल्यामुळे वसुलपात्र ठरतात.

3) स्टॅम्प पेपर करारनाम्यावर स्वाक्षरीदार यांचे नाव व स्वाक्षरी नाही.

4) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील परिशिष्ट 24 (13 व 15) नुसार मोजमाप नोंदवहीवर लाल शाईने कर्णरेषा मारलेल्या नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.44/33, दिनांक 21/12/2000 नुसार काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक. झेडपीए/प्र.क्र.1864/53, दिनांक 14/11/1996 नुसार ग्रामपंचायत काम करण्यास सक्षम असल्याचे खंड विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे परंतु घेतलेले नाही.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.462/वित्त-9(33), दिनांक 09/02/2009 अन्वये केलेल्या कामाची माहिती ग्रामसभेमध्ये सादर करणेबाबत निर्देश आहेत. परंतु कामाची माहीती सादर केल्याबाबत पुरावा सादर केलेला नाही.

**3.396 साठवण बंधारा दुरुस्ती बोदरा बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद भंडारा येथील सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, साठवण बंधारा दुरुस्ती बोदरा येथील बांधकामावर रुपये 9,71,456/- चे खर्च दर्शविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राकलन तयार करणारे शाखा अभियंता व तांत्रिक मंजुरी देणारे अधिकारी यांनी प्रत्यक्षात प्राकलनातील अंतर तपासले नसल्यामुळे संबंधित कंत्राटदारास रुपये 29,258/- चे जादा प्रदान झाले आहे.

2) कार्यारंभ आदेश दिनांक 23/03/2015 चा असून शाखा अभियंता यांनी बाब क्रमांक (1) दिनांक 18/03/2015 ला रुपये 8,502/-, बाब क्रमांक (2) दिनांक 20/03/2015 ला रुपये 1,70,493/-, बाब क्रमांक (3)

दिनांक 20/03/2015 ला रुपये 1,575/-, बाब क्रमांक (8) दिनांक 23/03/2015 ला रुपये 6,069/- खर्च नोंदविला आहे. त्यामुळे दिनांक 18/03/2015 ते 23/03/2015 पर्यंत नोंदविलेल्या कामाची रक्कम रुपये 1,86,589/- आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

3) कार्यारंभ आदेश दिनांक 23/03/2015 चा असुन काम पुर्णत्वाचा दिनांक 31/03/2015 आहे. करारनाम्या नुसार कामाची मुदत 6 महिने असतांना सदर काम फक्त 8 दिवसात पुर्ण केल्याने निकृष्ठ दर्जाचे झाल्याचे शक्यता नाकारता येत नाही.

4) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील परिशिष्ट 24 (13 व 15) नुसार मोजमाप नोंदवहीवर लाल शाईने कर्णरेषा मारलेल्या नाहीत.

5) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे परिशिष्ट 5(ब) अन्वये करारनाम्यावर दोन साक्षीदारांचे नावे व स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र. 44/33/ दिनांक 21/12/2000 नुसार काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/प्र.क्र.1864/53, दिनांक 14/11/1996 नुसार ग्रामपंचायत काम करण्यास सक्षम असल्याचे खंड विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

8) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.462, वित्त-9(33), दिनांक 09/02/2009 अन्वये केलेल्या कामाची माहीती ग्रामसभेमध्ये सादर करणे बाबत निर्देश आहेत. परंतु कामाची माहीती सादर केल्याबाबत पुरावा सादर केलेला नाही.

**3.397 साठवण बंधारा सरांडी/बुज बांधकामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद भंडारा येथिल सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, साठवण बंधारा सरांडी/बुज बांधकामावर रुपये 9,28,563/- चे खर्च दर्शविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शेडयुल बी नुसार कामाची किंमत रुपये 9,11,665/- चे आहे व मुल्यांकन रुपये 9,28,563/- झाले आहे. करारनाम्यातील क्लॉज क्रमांक 38 नुसार कमी/जादा कामे करता येतात, मात्र करारनाम्यातील क्लॉज क्रमांक 42 नुसार सक्षम अधिका-याची मंजुरी घेणे आवश्यक आहे. अशाप्रकारे कार्यवाही करण्यात आली नसल्याने कंत्राटदारास रुपये 16,898/- जादा प्रदान झाले आहे.

2) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) पुणे, यांचे परिपत्रक क्र. मुअ/प्रशा-5/2611, दि. 03/08/2004 व B1 फार्म मधील Schedule A पान क्रमांक 10 मधील (4) नुसार अंदाजपत्रकात साफसफाई (site clearance) चा समावेश करण्यात येवु नये असे असतांनाही सदर बाबींसाठी रक्कम रुपये 5,200/- चे प्रदान केल्यामुळे वसुलपात्र ठरतात.

3) अंदाजपत्रकात खाडातोड व व्हाईटनर चा उपयोग करण्यात आलेला आहे. खाडातोड कार्यकारी अभियंता यांच्या कडुन प्रमाणित करुन घेण्यात आलेले नाही.

4) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील परिशिष्ट 24 (13 व 15) नुसार मोजमाप नोंदवहीवर लाल शाईने कर्णरेषा मारलेल्या नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र. 44/33, दिनांक 21/12/2000 नुसार काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

6) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे परिशिष्ट 5(ब) अन्वये करारनाम्यावर दोन साक्षीदारांचे नावे व स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे ती कार्यवाही केलेली नाही.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.462/वित्त-9(33), दिनांक 09/02/2009 अन्वये केलेल्या कामाची माहीती ग्रामसभेमध्ये सादर करणे बाबत निर्देश आहेत. परंतु कामाची माहीती सादर केल्याबाबत पुरावा सादर केलेला नाही.

**3.398 माजी मालगुजारी तलाव दुरुस्ती मांडवगोटा गट नंबर 11 बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** लघुसिंचन विभाग, जिल्हापरिषद भंडारा येथिल सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणास असे निदर्शनास आले की, मामा तलाव दुरुस्ती मांडवगोटा गट क्रमांक 11 बांधकामावर रुपये 1,50,190/- चे खर्च दर्शविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राकलन तयार करणारे शाखा अभियंता व तांत्रिक मंजुरी देणारे अधिकारी यांनी प्रत्यक्षात प्राकलनातील अंतर तपासले नसल्यामुळे संबंधित कंत्राटदारास रुपये 18,154/- चे जादा प्रदान झाले आहे.

2) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) पुणे, यांचे परिपत्रक क्र. मुअ/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2004 व B1 फार्म मधील Schedule A पान क्रमांक 10 मधील (4) नुसार अंदाजपत्रकात साफसफाई (site clearance) चा समावेश करण्यात येवु नये असे असतांनाही सदर बाबींसाठी रक्कम रुपये 107/- चे प्रदान केल्यामुळे वसुलपात्र ठरतात.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968, चे नियम 87 नुसार व बी-1 करारनाम्यातील अट क्रमांक 40 तसेच महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निणर्य क्रमांक संकिर्ण 2008/प्र.क्र.152/यंत्र कक्ष बां.सा,दिनांक 18/11/2009 नुसार साहित्याची चाचणी अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

4) सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली 1984 चे नियम 296 (ब) नुसार जानेवारी ते मार्च दरम्यान कोणतेही काम सुरु करु नये अशा स्पष्ट सुचना असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

5) नस्तीमध्ये संलग्नित असलेल्या ई-निविदा अभिलेख्यावरुन ई- निविदामधील कागदपत्रे सदर बांधकामाचे संबंधित नसुन ई-निविदा अभिलेखे ग्रामपंचायत कोलारी पंचायत समिती लाखनीचे आहेत.

6) अंदाजपत्रकात खाडातोड व व्हाईटनर चा उपयोग करण्यात आलेला आहे. खाडातोड कार्यकारी अभियंता यांच्या कडुन प्रमाणित करुन घेण्यात आलेले नाही.

7) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958, चे परिशिष्ट 5(ब) अन्वये करारनाम्यावर दोन साक्षीदारांचे नावे व स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे ती कार्यवाही केलेली नाही.

8) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984, मधील परिशिष्ट 24 (13 व 15) नुसार मोजमाप नोंदवहीवर लाल शाईने कर्णरेषा मारलेल्या नाहीत.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968, चे कलम 168 नुसार सदर कामाची तपासणी उपअभियंता यांनी 10 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र. 44/33, दिनांक 21/12/2000 नुसार काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

11) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.462, वित्त-9(33), दिनांक 09/02/2009 अन्वये केलेल्या कामाची माहीती ग्रामसभेमध्ये सादर करणे बाबत निर्देश आहेत. परंतु कामाची माहीती सादर केल्याबाबत पुरावा सादर केलेला नाही.

**3.399 को.प.साठवण बंधारा बांधकाम सितेपार तालुका सडक अर्जुनी चे कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** प्रमाणक क्रमांक 1115, दिनांक 14/09/2014 रूपये 14,04,970/- ची तपासणी केली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधीकारी गोंदिया यांचे परिपत्रक क्रमांक कलि/खनिज/कावी-168 /2001दिनांक 09/02/2001 तसेच अर्धशासकीय पत्र क्रमांक खनिज/डेस्क14 /कावी/1003/2001दिनांक 21/09/2001 नुसार रॉयल्टी मोकळे केल्याचे प्रमाणपत्राविना प्रदान देता येत नाही. परंतू सदर कामासाठी एकूण 1302.14 घनमिटर गौन खनिज वापरण्यात आल्याने प्रती घन मिटर रूपये 70.68 या दराने गौन खनिज रक्कम रूपये 92035/- देयकातुन कपात झालेली नाही. त्यामुळे शासन महसुलाचे नुकसान झाले आहे.

2) दिनांक 19 ते 22/11/2012 या कालावधी मध्ये जागा सफाई व खोदकाम असतांना पाणी उपसणे वरील दर्शविण्यात आलेला खर्च रुपये 7,985/- नियमबाह्य ठरतो.

3) महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग शासन निर्णय टिएस पी 1086/8710/प्र.क्र. 31/का.35 दिनांक 09/03/1990 नुसार आदिवासी क्षेत्रात सितेपार गाव समाविष्ट नसतांना डीएसआर 10% ने वाढवून प्रदान करण्यात आल्याने शासनाचे रुपये 65,872/- ने नुकसान झालेले आहे.

**3.400 वृदांवनटोला येथे साठवण बंधारा बांधकामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** प्रमाणक क्रमांक 1791 दिनांक 12/12/2014 रुपये 9,75,870/- ची तपासणी केली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2011-2012 मध्ये कामावर खर्चाची वित्तीय सहमती असतांना सन 2014-15 मध्ये खर्च करण्यात आला.

2) महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग शासन निर्णय टिएस पी 1086/8710/प्र.क्र. 31/का.35 दिनांक 09/03/1990 नुसार आदिवासी क्षेत्रात वृदांवन टोला हे गाव आदिवासी उपयोजना क्षेत्रात अंतर्भुत नसतांनाही दर पृथकरणात डीएसआर 10% ने वाढवून प्रदान करण्यात आल्याने शासनाचे रुपये 46,798/- ने नुकसान झालेले आहे.

**3.401 गोंगले- येथे साठवण बंधारा बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** प्रमाणक क्रमांक 1794 दिनांक 12/12/2014 रुपये 11,01,737/- ची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी कार्यालयाचे रॉयल्टी मोकळे केल्याचे प्रमाणपत्र देयकास जोडले शिवाय कंत्राटदाराची देयके पारीत करावयाची नाहीत. मात्र पारीत करून रक्कमेचे प्रदान करण्यात आले आहे. त्यामुळे रूपये 36693/- एवढया महसुलाचे नुकसान झाले आहे.

2) सन 2011-12 मध्ये कामावर खर्चाची वित्तीय सहमती असतांना सन 2014-15 मध्ये खर्च करण्यात आला.

3) महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग शासन निर्णय टिएस पी 1086/8710/प्र.क्र. 31/का.35 दिनांक 09/03/1990 नुसार आदिवासी क्षेत्रात गोंगले -2 हे गाव आदिवासी उपयोजना क्षेत्रात अंतर्भुत नसतांनाही दर पृथकरणात डीएसआर 10% ने वाढवून प्रदान करण्यात आल्याने शासनाचे रुपये 54,282/- ने नुकसान झालेले आहे.

**3.402 मनेरी तालुका सडक अर्जुनी येथे साठवण बंधारा बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** प्रमाणक क्रमांक 1154 दिनांक 24/09/2014 रुपये 11,44,138/- ची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी गोंदिया यांच्या कडील परिपत्रक क्रमांक कलि/खनिज/कावि-168/2001 दिनांक 09/02/2001 नुसार रायल्टी मोकळे केल्याचे प्रमाणपत्र देयकास जोडले शिवाय कंत्राटदाराची देयक पारीत करावयाची नाहीत. मात्र पारित करुन रकमेचे प्रदान करण्यात आले आहे.

2) महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग शासन निर्णय टिएस पी 1086/8710/प्र.क्र.31/का.35 दिनांक 09/03/1990 नुसार आदिवासी क्षेत्रात मनेरी हे गाव आदिवासी उपयोजना क्षेत्रात अंतर्भुत नसतांनाही दर पृथकरणात डीएसआर 10% ने वाढवून प्रदान करण्यात आल्याने शासनाचे रुपये 88,488/- ने नुकसान झालेले आहे.

**3.403 कनेरी तालूका सडक अर्जुनी येथे साठ्वण बंधारा बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** प्रमाणक क्रमांक 1789 दिनांक 12/12/2014 रुपये 9,51,492/- ची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 2012-13 मध्ये कामावर खर्चाची वित्तीय सहमती असतांना सन 2014-15 मध्ये खर्च करण्यात आला.

2) महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग शासन निर्णय टिएस पी 1086/8710/प्र.क्र. 31/का.35 दिनांक 09/03/1990 नुसार आदिवासी क्षेत्रात कनेरी हे गाव आदिवासी उपयोजना क्षेत्रात अंतर्भुत नसतांनाही दर पृथकरणात डीएसआर 10% ने वाढवून प्रदान करण्यात आल्याने शासनाचे रुपये 46,493/- ने नुकसान झालेले आहे.

**3.404 को.प.साठवण बंधारा म्हसवानी तालुका सडक अर्जुनी चे बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** प्रमाणक क्रमांक 2938 दिनांक 13/03/2015 रुपये 14,88,062/- ची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बी-1 निवीदा करारातील अट क्रमांक 2 प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक होते. ते न केल्यामुळे रक्कम रूपये 13,060/- शासन महसुलाचे नुकसान झाले आहे.

2) सन 2011-12 चा निधी सन 2014-15 मध्ये खर्च करण्यात आलेला आहे.

3) महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग शासन निर्णय टिएस पी 1086/8710/प्र.क्र. 31/का.35 दिनांक 09/03/1990 नुसार आदिवासी क्षेत्रात म्हसवानी हे गाव आदिवासी उपयोजना क्षेत्रात अंतर्भुत नसतांनाही दर पृथकरणात डीएसआर 10% ने वाढवून प्रदान करण्यात आल्याने शासनाचे रुपये 66,425/- ने नुकसान झालेले आहे.

**3.405 मासेमारी तलाव विशेष दुरुस्ती.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3, 4) -** मासेमारी तलाव विशेष दुरुस्ती- मोवाडा (परिच्छेद क्रमांक 3) रक्कम रुपये 6,08,475/- व सिंदगव्हाण, गट नं. 80 (परिच्छेद क्रमांक 4) रक्कम रुपये 5,44,010/- बांधकामावर एकुण रक्कम रुपये 11,52,485/- एवढा खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाची निविदा 5.89 टक्के कमी दराची असतांना रुपये 11,40,957/- चे कंत्राटदारास शोधन करणे आवश्यक असतांना रक्कम रुपये 11,52,485/- चे शोधन केलेले आहे पर्यायाने 11,528/- चे कंत्राटदारास जादा शोधन झालेले आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक -बांध-2007/384/प्र.क्र.376/जल-1, दिनांक 18 ऑगस्ट 2008 च्या बाब क्रमांक 3 नुसार जलबांध तीन महीन्यात पुर्ण करण्याबाबत कार्यवाही न करता कार्यादेशात कामाची मुदत 12 महीने दिलेली आहे. परंतु पुर्णत्वाचे प्रमाणपत्रानुसार सदर कामे हे दिनांक 13/03/2015 व दिनांक 24/03/2015 पर्यंत पुर्ण झाले असतांना 12 महीने मुदत दिलेली आहे.

3) अंदाजपत्रकात डिसमेंन्टलची तरतुद करण्यात आलेली नसल्याने अंदाजपत्रक वास्तववादी तयार केले नाही.

4) सदर कामाच्या कार्यारंभ आदेशामधील अटी व शर्तीप्रमाणे व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक जि.प.2000/प्र.क्र.837/परास8/35, दिनांक 08/05/2002 तसेच विमा

संचालनालय, मुंबई यांचे दिनांक 27/06/2003 अन्वये कामाचा व कामावरील मजुरांचा विमा शासकीय विमा निधी मुंबई यांचेकडेच काम सुरु करणेपुर्वी उतरविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) सदर मासेमारी तलाव गट क्रमांक 8 जिल्हाधिकारी तलाव हस्तांतरण यादीमध्ये नमुद नाही.

6) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 परिशिष्ट 24 मधील नियम 12 अन्वये मोजमाप पुस्तकांत कंत्राटदारांची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्राविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक - पंरास-1009/प्र.क्र.40/जल-3, दिनांक 19/10/2001 नुसार संबंधित मक्तेदारास देखभालीच्या हमीपोटी 10 टक्के निधी 2 वर्ष देण्यात येवु नये असे आदेश असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.406 कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा बांधकाम, खडकी ता. नागभिड येथे बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** उपरोक्त कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा बांधकाम हे ग्रामपंचायत, खडकी येथे मंजुर करण्यात आले व कामाचा आदेश देण्यात आला. केलेल्या कामाची मोजमापाचे मुल्यांकन करुन प्रथम, द्वितीय व अंतिम देयकाद्वारे एकुण रुपये 14,44,159/- रक्कमेचे शोधन करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) पुणे यांचे परीपत्रक क्रमांक -मुमअ/उविअ-2/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2004 अन्वये अंदाजपत्रकात साईट क्लिअरन्स ही बाब अंतर्भुत करण्यात येवु नये असे असतांना, मोजमाप पुस्तिकेत बाब क्रमांक-1 नुसार साईट क्लीअरन्स वर 1200 स्क्वे.मी काम दर्शवुन रक्कम रुपये 1,380/- चा खर्च नोंदविला आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीई-2001/प्र.क्र.115/बिल-9, दिनांक 26/08/2002 नुसार सदर ग्रामपंचायतीकडे संयत्रे व औजारे उपलब्ध असल्याबाबतचे कोणतेही अभिलेखे किंवा संबंधीत नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

3) सदर कामाचे प्रथम धावते देयकामधुन व्हॅटची 4 टक्के प्रमाणे एकुण रुपये 47,742/- कपात करण्यात आले. परंतु ता. आयुक्त विक्रीकर, विक्रीकर भवन, माजगाव यांचे ट्रेड परीपत्रक क्रमांक - Vat/ADM/1010/1-AMD/6V ट्रेड 2Toff.2010, दिनांक 17/03/2010 अन्वये दिनांक 01/04/2010 पासुन 5 टक्के व्हॅट रुपये 59,677/- ची कपात करावयाची आहे. रुपये 11,935/- नुकसानाची रक्कम शासन शिर्षात जमा करावी.

4) अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे आदेश क्रमांक 635, दिनांक 29/03/2014 अन्वये कंत्राटदाराला विहित मुदतीत काम पुर्ण न केल्याबाबत 520 दिवसाची मुदतवाढ मंजुर करण्यात आलेली आहे. परंतु सदर मुदतवाढ ही 542 दिवसाची मंजुर करावयास पाहीजे होती रुपये 792/- चे नुकसान झालेले आहे.

5) सदर कामाचा कार्यारंभ आदेशामधील अटी व शर्ती प्रमाणे महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक जि.प.2000/प्र.क्र.837/परास8/35, दिनांक 08/05/2002 तसेच विमा संचालनालय, मुंबई यांचे दिनांक 27/06/2003 अन्वये कामाचा व कामावरील मजुरांचा विमा शासकीय विमा निधी, मुंबई यांचेकडे काम सुरु करणेपुर्वी उतरविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 मधील मुद्दा क्रमांक 13 नुसार काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेला नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-पीएम1099/सी.आर./54/03, दिनांक 20/05/2000 अन्वये कामाच्या ठिकाणचा फोटो घेणे आवश्यक असतांना फोटो नस्तीमध्ये लावण्यात आलेला नाही.

**3.407 पाझर तलाव विशेष दुरुस्तीबाबत, पांचगाव (ठाकरे), गट क्र. 1, उपविभाग भद्रावती.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पाझर तलाव विशेष दुरुस्तीबाबत, पांचगाव (ठाकरे), गट क्रमांक 1, उपविभाग भद्रावती बांधकामावर रक्कम रुपये 7,45,216/- एवढा खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर-9006/प्र.क्र.105/कोशा-5, दिनांक 22/02/2008 व आयकर कायदा 161 चे कलम 194 (सी) नुसार दुसरे व अंतिम देयकातुन 2 टक्के आयकर रक्कम रुपये 14,904/- व सरचार्ज रक्कम रुपये 1,788/- व शिक्षण सेस रुपये 447/- अशी एकुण रक्कम रुपये 17,139/- कपात करुन शासन शिर्षात जमा केले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118 नुसार अंदाजात दिलेल्या मंजुरीचे अधिकार मर्यादीत असुन कोणतेही अतिरीक्त किंवा वाढीव (जादा) बांधकामे करण्यासाठी विशेष प्राधिकाराशिवाय वापर करता येणार नाही. तसेच B1 निविदा अट क्रमांक 38(1) नुसार मंजुर कामाचे बाबनिहाय परिमाणापेक्षा 25 टक्के पर्यंत किंवा त्यांचे मुल्य रुपये 5,000/- पर्यंत खर्च करण्याची तरतुद असतांना, त्यापेक्षा जादा रक्कम खर्च केल्यामुळे रक्कम रुपये 74,116/- मान्य करता येणार नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासहींता 1968 मधील नियम क्रमांक 148 प्रमाणे सदर कामाच्या अटी शर्तीची नोंद ही करारनाम्यात करणे आवश्यक आहे. अशी तरतुद नियमात असतांना त्याप्रमाणे करारनामा करण्यात आलेला नाही.

4) सदर कामाच्या कार्यारंभ आदेशामधील अटी व शर्ती प्रमाणे व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक जि.प.2000/प्र.क्र.837/परास8/35, दिनांक 08/05/2002 तसेच विमा संचालनालय, मुंबई यांचे दिनांक 27/06/2003 अन्वये कामाचा व कामावरील मजुरांचा विमा शासकीय विमानिधी, मुंबई यांचेकडेच काम सुरु करणेपुर्वी उतरविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधाण विभाग, परीपत्रक झेडपीए-2000/ प्र.क्र.44/33,दिनांक 22/12/2000 मधील मुद्दा क्रमांक 13 नुसार काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना तो नोंदविलेला नाही.

**3.408 सिमेंट प्लग बंधारा-सावरगाव, तालुका नागभीड, उपविभाग नागभीड.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** सिमेंट प्लग बंधारा-सावरगाव बांधकामावर रक्कम रुपये 5,53,153/- एवढा खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासहींता 1968 मधील नियम क्रमांक 148 प्रमाणे करारनामा करण्यात आलेला नाही.

२) सदर कामाच्या कार्यारंभ आदेशामधील अटी व शर्तीप्रमाणे व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक जि.प.2000/प्र.क्र.837/परास8/35, दिनांक 08/05/2002 तसेच विमा संचालनालय, मुंबई यांचे दिनांक 27/06/2003 अन्वये कामाचा व कामावरील मजुरांचा विमा शासकीय विमानिधी मुंबई यांचेकडेच काम सुरु करणेपुर्वी उतरविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधाण विभाग, परीपत्रक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 मधील मुद्दा क्रमांक 13 नुसार काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना तो नोंदविलेला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पीएम 1099/सीआर/ 54/03,दिनांक 20/05/2000 अन्वये कामाच्या ठिकाणचा फोटो आवश्यक असतांना तो नस्तीमध्ये लावण्यात आलेला नाही.

5) B1-निविदा अट क्रमांक 38 (1) नुसार मंजुर कामाचे बाबनिहाय परिमणापेक्षा 25 टक्के पर्यंत किंवा त्यांचे मुल्य रुपये 5,000/- पर्यंत खर्च करण्याची तरतुद असतांना बाब क्रमांक 3,4 वर एकुण रक्कम रुपये 12,551/- जादा रक्कम खर्च केली आहे.

6) प्रस्तुत कामामुळे जलस्त्रोत बळकटीकरणाच्या दृष्टीने फायदा होणे अपेक्षित आहे. तथापि असा अहवाल उपलब्ध केलेला नस्तीला आढळुन आलेला नाही.

**3.409 सिमेंट प्लग बंधारा, वाघेडा, ता. भद्रावती येथे बांधकाम करणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** सिमेंट प्लग बंधारा, वाघेडा या बांधकामावर रक्कम रुपये 7,59,681/- एवढा खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाची निविदा 6.50 टक्के कमी दराची असतांना रुपये 7,13,535/- चे कंत्राटदारास शोधन करणे आवश्यक असतांना रक्कम रुपये 7,59,681/- चे शोधन केलेले आहे. पर्यायाने रुपये 46,146/- चे कंत्राटदारास जादा शोधन झालेले आहे.

2) पुरवठा आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे प्रकल्पाचे बांधकामाचे काम सुरु करण्याआधी पाणी वापर सहकारी संस्था स्थापन करणे बंधनकारक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

3) सदर कामाच्या कार्यारंभ आदेशामधील अटी व शर्तीप्रमाणे व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक जि.प.2000/प्र.क्र.837/परास8/35, दिनांक 08/05/2002 तसेच विमा संचालनालय, मुंबई यांचे दिनांक 27/06/2003 अन्वये कामाचा व कामावरील मजुरांचा विमा शासकीय विमानिधी, मुंबई यांचेकडेच काम सुरु करणेपुर्वी उतरविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) B1-निविदा अट क्रमांक 38(1) नुसार मंजुर कामाचे बाबनिहाय परिमाणापेक्षा 25 टक्के पर्यंत किंवा त्यांचे मुल्य रुपये 5,000/- पर्यंत खर्च करण्याची तरतुद असतांना बाब क्रमांक 3,4,5 वर एकुण रक्कम रुपये 70,208/- जादा रक्कम खर्च केला आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 120 नुसार बांधकामावरील बचतीवर रक्कम इतर कोणत्याही बाबीवर मंजुरीशिवाय वापरु नये, असे असतांना बाब क्रमांक 9 वरील रक्कम मंजुरीशिवाय वापरल्याचे लेखापरीक्षणास आढळले.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 मधील मुद्दा क्रमांक 13 नुसार काम पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतांना मोजमापपुस्तिकेत नोंदविलेला नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पीएम 1099/सीआर/54/03, दिनांक 20/05/2000 अन्वये कामाच्या ठिकाणचा फोटो आवश्यक असतांना सदर कामाचा फोटो नस्तीमध्ये लावण्यात आलेला नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासहींता 1968 मधील नियम क्रमांक 148 प्रमाणे करारनामा करण्यात आलेला नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक पंरास-1009/प्र.क्र.40/जल-3, दिनांक 19/10/2001 नुसार संबंधीत मक्तेदारास कामाच्या देखभालीपोटी 10 टक्के निधी 2 वर्ष देण्यात येवु नये असे आदेश असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.410 साठवणुक बंधारा, वासी क्रमांक 1 चे बांधकाम खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** साठवणुक बंधारा, वासी क्रमांक 1 चे बांधकाम कामावर प्रमाणक क्रमांक 1027,दिनांक 19/09/2014 अन्वये रुपये 20,72,191/- एवढा खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विभागीय कार्यालयाचे पत्र क्रमांक 1410/2012, दिनांक 15/05/2012 अन्वये अंदाजपत्रकीय मुळ किंमत रूपये 10,54,622/- वरुन सुधारित अंदाजपत्रकीय किंमत रूपये 22,31,500/- एवढी झाली व त्यास सुधारित प्रशासकिय व तांत्रीक मान्यता देण्यात आली. तसेच बांधकाम समितीने दिनांक 14/02/2013 चे सभेत मंजूरी प्रदान करुन अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक 31/03/2013 पर्यंत काम पुर्ण करण्याची मुदत दिली. परंतु सदर कालावधीपर्यंत काम पुर्ण झालेले नव्हते. त्यामुळे व्दितीय मुदतवाढ दिनांक 01/04/2013 ते 30/06/2014 पर्यंत पत्र दिनांक 21/02/2014 प्रमाणे मंजूरी देऊन पुर्ण करण्यात आले. परंतु बी-1 करारनाम्यातील अट क्रमांक 2 अन्वये मुळ मुदतीत 100 टक्के काम करने आवश्यक असतांना मुदत संपेपर्यंत कामास सुरूवात केली नाही व

कामात बदल केल्यामुळे करारनाम्यातील अटीनुसार 10 टक्के दंड आकारने आवश्यक असतांना दंड आकारण्यात आल्याचे आढळुन आले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे निर्णय क्रमांक झेडपीए-2008/ प्रक्र 472/क्वि-9 (33) मंत्रालय मुंबई,दिनांक 09/02/2009 अन्वये रूपये 50,000/- उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायतींना रूपये 10,00,000/- व पर्यंत रूपये 50,001/- च्या पुढे उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायतींना रूपये 15,00,000/- पर्यंतची कामे देता येऊ शकतात असे असतांना सदर वासी या ग्रामपंचायतीचे उत्पन्न रूपये 1 लक्षापर्यंत असतांना रूपये 20,72,191/- एवढ्या रकमेचे काम देऊन उपरोक्त शासन निर्णयाचे पालन विभागाने केलेले नाही. नियमाबाह्यता झालेली आहे.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्रमांक विकअ-1998/प्र.क्र.43/कराधान-1 दिनांक 05/05/1999 व महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक बीडीजी/2005/प्रक्र.324-इमारत-2,दिनांक 03/03/2006 अट क्रमांक 5 नुसार 4 टक्के विक्रिकर रूपये 82,888/- वसुल करणे आवश्यक असतांना रूपये 41,444/- कमी कपात केल्याने शासन महसुलाची हानी झालेली आहे. तरी हानीची रक्कम वसुल करुन चालानव्दारे शासन खाती जमा होणे आवश्यक आहे.

4) फार्म-बी मधील कंत्राटदाराच्या सर्वसाधारण अटीतील अट क्रमांक 18 नुसार काम पुर्ण झाल्याबाबत ठेकेदाराकडून तशी सुचना कार्यालयास देणे व तेव्हापासुन 30 दिवसाचे आत कामावर निरिक्षण करुन काम बरोबर असल्यास, काम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र ठेकेदारास देणे आवश्यक असतांना त्या अनुषंगाने ठेकेदाराची सुचना नस्तीत उपलब्ध झालेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 180(3) अन्वये देयकाचे पुर्ण प्रदान झाल्यानंतर मोजमाप पुस्तिकेवर कर्णरेषा मारने आवश्यक असतांना कर्णरेषा मारल्याचे आढळुन आलेले नाही.

**3.411 साठवणुक बंधारा, सोनसरीचे बांधकाम खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** साठवणुक बंधारा, सोनसरीचे बांधकाम यावर प्रमाणक क्रमांक 970, दिनांक 15/06/2014 अन्वये रुपये 13,08,151/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्रमांक विकअ-1998/प्र.क्र.43/कराधार-1, दिनांक 05/05/1999 व महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक बी.डी.जी./2005/प्र.क्र.324 इमारत-2,दिनांक 03/03/2006 अट क्रमांक 5 नुसार कार्यकंत्राट व मुल्यवर्धीत कर अधिनियम 2005 खाली नोंदणीकृत कंत्राटदाराकडून 2 टक्के व अनोंदणीकृत कंत्राटदाराकडुन 4 टक्के विक्रिकर वसुल करणे आवश्यक असतांना शोधन प्रमाणकातुन 2 टक्के विक्रिकर रूपये 26,164/- कपात केलेला आहे. परंतु उपरोक्त शासन निर्णयानुसार 4 टक्के विक्रिकर रूपये 52,328/- वसुल करणे आवश्यक असतांना रूपये 26,164/- कमी कपात केल्याने शासन महसुलाची हानी झालेली आहे. तरी हानीची रक्कम वसुल करुन चलानव्दारे शासन खाती जमा होणे आवश्यक आहे.

2) बांधकामाची मुळ मुदत दिनांक 11/10/2013 पर्यंत असतांना, दिलेल्या मुदतीत काम सुरु केलेले नाही. मुदत संपल्यानंतर कामाला सुरुवात करण्यात आली. बी-1 करारनाम्यातील अट क्रमांक 2 अन्वये मुळ मुदतीत 100 टक्के काम करने आवश्यक असतांना मुदत संपेपर्यंत कामास सुरूवातच केली नाही. विलंबाने काम केल्याबाबत नाममात्र दंड आकारण्यात आला. परंतु करारनाम्यातील अटीनुसार 10 टक्के दंड आकारणीची कार्यवाही विभागाने केलेली नाही.

3) फार्म बी. मधिल कंत्राटदाराच्या सर्वसाधारण अटीतील अट क्रमांक 18 नुसार काम पुर्ण झाल्यावर ठेकेदाराकडुन तशी सुचना कार्यालयास देणे व तेव्हापासुन 30 दिवसाचे आत कामावर निरिक्षण करुन काम बरोबर नसल्यास काम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र संबंधितास देणे आवश्यक असतांना त्या अनुषंगाने कंत्राटदाराची सुचना नस्तीत उपलब्ध झालेली नाही.

**3.412 साठवणुक बंधारा, मेन्ढा (कुरुंडी चक) तालुका आरमोरीचे बांधकाम खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** साठवणुक बंधारा, मेन्ढा (कुरुंडी चक) तालुका आरमोरीचे बांधकामावर एकुण रक्कम रुपये 14,81,361/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) साठवणूक बंधारा बांधकाम करणे, मुदत दिनांक 17/05/2013 ते 16/11/2013 पर्यंत सहा महिने असतांना प्रथम मुदतवाढ मागणी अर्ज मंजूर प्रमाणकासोबत नसतांना उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद सिंचाई उपविभाग, देसाईगंज यांचे प्रस्ताव क्रमांक 1648,दिनांक 30/12/2013 अन्वये दिनांक 17/11/2013 ते 31/03/2014 पर्यंत मुदतवाढ प्रस्तावीत केली आहे. अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश दिनांक 26/03/2014 प्रमाणे दंड, व्दितीय चलित देयकात रुपये 1,660/- कपात केलेला आहे. परंतु प्रत्यक्षात दंड रुपये 2,700/- कपात करने आवश्यक असतांना रुपये 1,040/- कमी कपात केलेला आहे.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्रमांक विकअ-1998/प्र.क्र.43/कराधान-1, दिनांक 05/05/1999 व महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी/2005/प्रक्र.324-इमारत-2,दिनांक 03/03/2006 अट क्रमांक 5 नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराकडुन 4 टक्के विक्रिकर रुपये 59,254/- वसुल करणे आवश्यक असतांना रुपये 29,627/- कमी कपात केल्याने शासन महसुलाची हानी झालेली आहे. तरी हानीची रक्कम वसुल करुन चलानव्दारे शासन खाती जमा होणे आवश्यक आहे.

3) उपरोक्त बंधारा बांधकामाचे संदर्भात बाब क्रमांक 5, 11 व 13 वर अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा खर्च झालेला आहे. सदर खर्चास सक्षम प्राधिकाऱ्याची पुर्व मंजुरी नसल्याने जादा खर्च रक्कम रुपये 9,834/- वसुलीस पात्र ठरतो.

**3.413 साठवणुक बंधारा जांभळी क्रमांक 2 चे बांधकाम खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** साठवणुक बंधारा जांभळी क्रमांक 2 चे बांधकामावर प्रमाणक क्रमांक 256, दिनांक 17/06/2014 अन्वये रक्कम रुपये 10,66,656/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त बंधारा बांधकामाचे संदर्भात बाब क्रमांक 10 व 11 वर अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा खर्च रुपये 34,455/- एवढा झालेला आहे. जादा परिमाणाची रक्कम रुपये 34,455/- प्रत्यक्षात कार्यान्वीत करण्यात आलेल्या कामाचे अंदाजीत परिमाणापेक्षा 25 टक्केहुन जादा अथवा अंदाजीत रकमेहुन रुपये 5,000/- पेक्षा जादा असतांना बी-1 करारनाम्यातील अट 38 मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याची पुर्वमंजुरी प्राप्त करण्यात न आल्याने जादा नमुद करण्यात आलली खर्चाची रक्कम रुपये 34,455/- नियमबाह्य ठरत असुन ती वसुलपात्र ठरते.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक, क्रमांक विकअ-1998/प्र.क्र.43/कराधान-1, दिनांक 05/05/1999 व महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी/2005/प्र.क्र.324-इमारत-2, दिनांक 03/03/2006 अट क्रमांक 5 नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून 4 टक्के विक्रिकर रुपये 54,450/- वसुल करणे आवश्यक असतांना रुपये 27,225/- कमी कपात केल्याने शासन महसुलाची हानी झालेली आहे. तरी हानीची रक्कम वसुल करून चलनाव्दारे शासन खाती जामा होणे आवश्यक आहे.

3) ग्रामपंचायत नरचुली यांना उपरोक्त तपशिलाप्रमाणे काम देण्यात आले असतांना ग्रामपंचायतीचे पत्र दिनांक 13/12/2013 नुसार ग्रामपंचयतीने सदर काम वेगळ्या कंत्राटदाराकडून करवून घेतल्याचे दिसुन येते. सदर बाब ही नियमबाह्य आहे.

**3.414 सिमेंट बंधारा योजनेतील कामाबाबत. (उपविभाग औरंगाबाद)**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 29,93,949/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जलसिंचन विभागाच्या नियमपुस्तिका पान क्रमांक 109 परिच्छेद क्रमांक 8,7,3 चे उपपरिच्छेद (ड) नुसार माती कामासंदर्भात 20 टक्के संकोच (Shrinkage) वजा करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 02/01/2004 नुसार हार्टींग व केसींग झोन भरावयाचे संकुचन व आकुंचन 20 टक्के असल्याने विहित प्रमाणात घट दर्शविणे आवश्यक आहे. परंतु विभागाने 20 टक्के घट दर्शविली नसल्याने रक्कम रुपये 76,657/- अतिप्रदान झालेले आहे.

2) सिमेंट बंधारा चौकावाडी क्रमांक 2 या कामात बी-1 निविदा, शेडयुल बी व कार्यारंभ आदेश यात नमुद केलेल्या रकमेपेक्षा जास्तीचे रक्कमेने देयक पारीत करुन संबंधीतास रक्कम रुपये 1,07,611/- जादा प्रदान केलेले आहे.

3) विवरणपत्रातील अनुक्रमांक 8 वरील कामाचे बाबतीत मोजमाप पुस्तिका क्रमाक 109 मधील पान क्रमांक 36 वर बाब क्रमांक 6 Providing and laying in situ C.C.1:3:6 etc या बाबीचे मोजमाप (U/Stream wall व D/Stream wall सहीत) नोंदविलेले आहे. परंतु पुन्हा पान क्रमाक 54 वर U/Stream wall व D/Stream wall या बाबीचे दुबार मोजमापे (Qty 89.50 cu.m.) नोंदवून त्यापोटी रक्कम रुपये 2,51,656/- अतिप्रदान झाले आहे.

4) विवरणपत्रातील अनुक्रमांक 9 वरील कामाचे बाबतीत मोजमाप पुस्तिका क्रमाक 109 मधील पान क्रमांक 46 वर बाब क्रमांक 6) Providing and laying in situ C.C.1:3:6 etc या बाबीचे मोजमाप (U/Stream wall व D/Stream wall सहीत) नोंदविलेले आहे. परंतु पुन्हा पान क्रमांक 50 वर U/Stream wall व D/Stream wall या बाबीचे दुबार मोजमापे (Qty 96.98 cu.m.) नोंदवून त्यापोटी रुपये 2,72,688/- अतिप्रदान झालेले आहे.

5) मुल्यवर्धित कर अधिसूचना दिनांक 04/04/2012 पासुन नोंदणीकृत ठेकेदाराकडून 2 टक्के मुल्यवर्धित कर वसुल करणे आवश्यक आहे. विवरणपत्रातील अनक्रमांक 3 वरील कामाचे बाबतीत रुपये 1,187/- कमी कपात केली आहे.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग,शासन परिपत्रक क्रमांक दिनांक 20/11/2009 कमी शुल्क रुपये 2,500/- संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करणे आवश्यक आहे.

7) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार कंत्राटदाराकडून आयकरापोटी 2 टक्के दराने कपात करणे आवश्यक आहे. विवरणपत्रातील अनुक्रमांक 3 वरील कामाचे बाबतीत रुपये 128/- कमी कपात केली आहे.

8) उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 17/06/2010 नुसार 1 टक्का कामगार कल्याण उपकर वसुल करणे आवश्यक आहे. विवरणपत्रातील अनुक्रमांक 3 वरील कामाचे बाबतीत कमी कपात रक्कम रुपये 594/- संबंधीताकडून वसुल करणे आवश्यक आहे.

9) काम सुरु करण्यापुर्वी कंत्राटदाराने कामाचा आणि कामावरील मजुराचा विमा उतरविणे आवश्यक आहे. परंतु विवरणपत्रातील अनुक्रमांक 3 वरील कामाचे बाबतीत रुपये 594/- कमी कपात केलेली आहे.

10) विवरणपत्रातील अनुक्रमांक 7 व 8 वरील कामाचे बाबतीत मोजमाप पुस्तिकेतील पान क्रमांक अनुक्रमे 33 व 39 वरील नोंदींनुसार बाब क्रमांक अनुक्रमे 10 व 09 providing earth work या बाबीवर रुपये 70.68/- प्रती घनमीटर या दराने अनुक्रमे रुपये 84,816/- व रुपये 56,544/- एवढी रक्कम रॉयल्टीपोटी समाविष्ट केलेली आहे व त्याच पानावरील प्रदान आदेशानुसार कपातही केलेली आहे. परंतु पुन्हा पान क्रमांक 61 व 55 वर रॉयल्टीपोटी रुपये 84816 व रुपये 56,544/- समाविष्ट केलेली आहे, परंतु कपात मात्र केलेली नाही. तरी अतिप्रदान रक्कम रुपये 1,41,360/- संबंधीताकडून वसुल करणे आवश्यक आहे.

11) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्थर), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक दिनांक 13/04/2006 नुसार वहन नकाशा व वहन अंतर 10 कि.मी. पुढील अधिक्षक अभियंता यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक असतांना विभागाने याप्रमाण कार्यवाही केलेली नाही.

**3.415 सिमेंट बंधारा योजनेतील कामाबाबत. (उपविभाग कन्नड)**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 40,40,692/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी कामाची 5 टक्के मोजमापे तपासणे आवश्यक असताना तशी तपासणी करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक दिनांक 19/10/2011 नुसार संबंधीत संस्थेने (मक्तेदाराने) 2 वर्ष देखभाल हमी घेणे आवश्यक असून देयकाच्या 10 टक्के रक्कम राखून ठेवणे आवश्यक असताना विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच कार्यारंभ आदेशात दोष दायित्व निवारण कालावधी 2 वर्ष असलेबाबत स्पष्टपणे नोंद घेण्यात आलेली नाही.

3) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्थर), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक दिनांक 13/04/2006 नुसार वहन नकाशा व वहन अंतर 10 कि.मी. पुढील अधिक्षक अभियंता यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक असतांना विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) कोल्हापुरी बंधारा करंजखेडा या कामावर प्रमाणक क्रमांक 122 दिनांक 05/12/2014 अन्वये रक्कम रुपये 9,68,462/- एवढा खर्च नोंदविलेला आहे. हे काम सिमेंट बंधा-याचे असूनही त्याबाबतचा खर्च लेखाशिर्ष - कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे राज्यक्षेत्र (2702 5993) या लेखाशिर्षाअंतर्गत नोंदविलेला आहे. ही बाब गंभीर असून सदर खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. याबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन जलसिंचन विभागाच्या नियमपुस्तिका पान क्रमांक 109 परिच्छेद क्रमांक 8.7.3 चे उपपरिच्छेद (ड) नुसार माती कामासंदर्भात 20 टक्के संकोच (Shrinkage) वजा करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 02/01/2004 नुसार हार्टींग व केसींग झोन भरावयाचे संकुचन व आकुंचन 20 टक्के असल्याने विहित प्रमाणात घट दर्शविणे आवश्यक आहे. परंतु विभागाने 20 टक्के घट न दर्शविल्यामुळे रक्कम रुपये 29,207/- अतिप्रदान झालेले आहे.

6**)** विवरणपत्रातील अनुक्रमांक 2 ,3 व 4 वरील Dewatering during entire excavation etc. हया बाबीवर अनुक्रमे रुपये 26,460/-, रुपये 29,938/- व रुपये 15,483/- एवढा खर्च नोंदविला आहे. परंतु सदर यंत्राचे लॉगबुक संचिकेस/प्रमाणकास संलग्न केलेले नाही. त्यामुळे या बाबीवर नोंदविलेला खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

7**)** अनुक्रमांक 5 वरील कामाचे बाबतीत बाब क्रमांक (11) मध्ये 10 टक्के संकुंचन घट वजा केलेली नाही. 10 टक्के संकुंचन घट वजावटीपोटी रक्कम रुपये 6,532/- संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करावी.

**3.416 कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे योजनेतील कामाबाबत. (उपविभाग औरंगाबाद)**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 1,25,27,130/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी कामाची 5 टक्के मोजमापे तपासणे आवश्यक असतांना तशी तपासणी करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक दिनांक 19/10/2001 नुसार संबंधीत संस्थेने (मक्तेदाराने) 2 वर्ष देखभाल हमी घेणे आवश्यक असून देयकाच्या 10 टक्के रक्कम राखून ठेवणे आवश्यक असताना विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच कार्यारंभ आदेशात दोष दायित्व निवारण कालावधी 2 वर्ष असलेबाबत स्पष्टपणे नोंद घेण्यात आलेली नाही.

3) कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा कुतुबखेडा तालुका पैठण व कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा पाचोड क्रमांक 1 सदरची कामे ही कोल्हापुरी पध्दतीचे बंधा-याची असूनही त्याबाबतचा खर्च लेखाशिर्ष - MIN-6, ल.पा.ची कामे (27025984) या लेखाशिर्षात नियमबाहयपणे नोंदविलेला आहे. तसेच कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा केकत जळगाव

क्रमांक 2 या कामावर प्रमाणक क्रमांक 573 दिनांक 31/03/2015 अन्वये रक्कम रुपये 9,86,865/- एवढा खर्च नोंदविलेला आहे. हे काम कोल्हापुरी पध्दतीचे बंधा-याचे असूनही त्याबाबतचा खर्च लेखाशिर्ष - भुसंपादन (3451 2595) या लेखाशिर्षाअंतर्गत नोंदविलेला आहे. ही बाब गंभीर असून सदर खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. याबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन जलसिंचन विभागाच्या नियमपुस्तिका पान क्रमांक 109 परिच्छेद क्रमांक 8,7,3 चे उपपरिच्छेद (ड) नुसार माती कामासंदर्भात 20 टक्के संकोच (Shrinkage) वजा करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 02/01/2004 नुसार हार्टींग व केसींग झोन भरावयाचे संकुचन व आकुंचन 20 टक्के असल्याने विहित प्रमाणात घट दर्शविणे आवश्यक आहे. परंतु विभागाने 20 टक्के घट न दर्शविल्यामुळे रक्कम रुपये 99,982/- अतिप्रदान झालेले आहे.

5) बी-1 निविदा, शेडयुल बी व कार्यारंभ आदेश यात नमुद केलेल्या रकमेपेक्षा जास्तीचे रकमेने देयक पारीत केल्याने रक्कम रुपये 11,988/- संबंधीतास जादा प्रदान केलेले आहे**.**

6) विवरणपत्रातील अनुक्रमांक 10 वरील कामाचे बाबतीत बाब क्रमांक 5) Providing and laying situ C.C.M-150 etc. या बाबीचा मूळ दर दर पृथ:क्करणानुसार रुपये 2,539.46/- प्रती घनमीटर असा घेतलेला आहे. तर याच बाबीसाठी सिमेंट बंधारा मंगरुळ (प्रमाणक क्रमांक 11 दिनांक 01/12/2014 रुपये 4,66,119/-) या कामाचे दर पृथ:क्करणानुसार मूळ दर रुपये 2,308.60/- प्रती घनमीटर असा घेतलेला आहे. परंतु दोन्ही कामांचे अंदाजपत्रक जिल्हा दरसुची 2011-2012 नुसार बनविल्याचे नमुद असतानाही उपरोक्त कामात बाब क्रमांक 5 मध्ये प्रतीघनमीटर रुपये 230.86/- दराने रक्कम रुपये 60,494/- अतिप्रदान झालेले आहे.

7) विवरणपत्रातील अनुक्रमांक 11 वरील कामाचे बाबतीत स्टील वहन अंतर 30 कि.मी. दर्शविलेले (पैठण ते निलजगाव) आहे. परंतु त्याचविवरणपत्रात वाळुसाठीचे अंतर 42 कि.मी. दर्शविलेले आहे. म्हणजेच निलजगाव हे अंतर 30 कि.मी. असताना ते 42 कि.मी. दर्शविलेले आहे व त्यावर वाहतूक खर्च परिगणीत केलेला आहे. म्हणून 12 कि.मी. अंतर जास्तीचे दर्शविल्याने वाहतूक खर्चात अतिप्रदान झालेले आहे. तरी याबाबत विभागाने परिगणना करुन अतिप्रदानाची रक्कम वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात जमा करुन अनुपालन दर्शवावे.

8) औरंगाबाद (35 कि.मी.) येथे साहित्य उपलब्ध असताना अनावश्यकपणे वाळुज (50 कि.मी.) येथून साहित्य खरेदीपोटी वाहतूक खर्च (Lead) जास्तीचे दराने घेतलेला आहे.

9) विवरणपत्रातील अनुक्रमांक 12 वरील कामाचे बाबतीत बाब क्रमांक 6) Providing earth work या बाबीसाठी 810 घनमीटर ऐवजी 44.79 घनमीटर रॉयल्टी कपात केल्याने रुपये 54,085/- अतिप्रदान झालेले आहे.

10) विवरणपत्रातील अनुक्रमांक 11 वरील कामाचे बाबतीत बाब क्रमाक 9) Providing earth work या बाबीसाठी 867 घनमीटर ऐवजी 483.51 घनमीटरची रॉयल्टी कपात केल्याने रुपये 27,105/- अतिप्रदान झालेले आहे.

11) विवरणपत्रातील अनुक्रमांक 2,6 व को.प.बं.वरवंडी तालुका पैठण वरील कामाचे बाबतीत संचिकेत संलग्न केलेल्या फोटोनुसार या तीनही कामांसाठी एकच फोटो लावण्यात आलेला आहे.

12) विवरणपत्रातील अनुक्रमांक 8 वरील कामाचे बाबतीत काम हे को.प.बं.चे असताना संलग्न केलेल्या फोटोत सिमेंट बंधा-याचे काम केल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे को.प.बं.साठी आवश्यक असणा-या गेट ची तरतुद अंदाजपत्रकात केलेली नाही.

13) विवरणपत्रातील अनुक्रमांक 3,5 वरील कामाचे बाबतीत अंदाजपत्रकात गेट बसविण्याची तरतुद केलेली असतानाही प्रत्यक्षात गेट बसविलेले नाही. तसेच अनुक्रमांक 11,12 वरील कामाचे बाबतीत अंदाजपत्रकात 9 गेट बसविण्याची तरतुद केलेली असताना प्रत्यक्षात 3 गेट बसविलेले आहेत. सबब संबंधीत को.प.बंधा-यास गेट न बसविल्याने/कमी गेट बसविल्याने कामाचा हेतू साध्य होत नाही.

**3.417 कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा उपलखेडा, नादी व जातेगाव या कामातील अनियमीततेबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 24,77,756/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा उपलखेडा या कामाचे बाबतीत ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक 15/07/2008 अन्वये विकास योजना संबंधी रुपये 25.00/- लक्ष ते रुपये 50.00/- लक्ष पर्यंतचे कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा अधिकार स्थायी समितीस असतांना सुधारीत प्रशासकीय मान्यता कार्यकारी अभियंता यांनी प्रदान केलेली आहे. कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा नादी या कामाचे बाबतीत मूळ प्रशासकीय मान्यता कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी क्रमांक 10 दिनांक 25/02/2010 अन्वये रुपये 15.00/- लक्ष रकमेस प्रदान केलेली आहे. तसेच सुधारीत प्रशासकीय मान्यता कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी क्रमांक नमुद नाही दिनांक 31/03/2012 अन्वये रुपये 48.75/- लक्ष रकमेस प्रदान केली आहे. परंतु ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक 15/07/2008 अन्वये जिल्हा परिषदेमधील कामे किंवा विकास योजना यांचेसंबंधी रुपये 5.00/- लक्ष ते रुपये 20.00/- लक्ष पर्यंतचे कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी/ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहे. कार्यकारी अभियंता यांना केवळ रुपये 5.00/- लक्ष पर्यतचे कामास प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार असतानाही संबंधीतांनी रुपये 15.00/- लक्षचे कामास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्याचप्रमाणे ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक 19/03/2012 अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील मूळ बांधकामे व दुरुस्ती संबंधी रुपये 25.00/- लक्ष ते रुपये 50.00/- लक्ष पर्यंतचे कामास प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार स्थायी समितीस आहे. परंतु सदर कामास कार्यकारी अभियंता यांनी रुपये 48.75/- लक्ष चे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

2) कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा जातेगाव या कामाचे बाबतीत मूळ प्रशासकीय मान्यता कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी क्रमांक 10 दिनांक 25/02/2010 अन्वये रुपये 15.00/- लक्ष रकमेस प्रदान केलेली आहे. तसेच सुधारीत प्रशासकीय मान्यता कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी क्रमांक 521 दिनांक 31/03/2012 अन्वये रुपये 49.70/- लक्ष रकमेस प्रदान केली आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक दिनांक 15/07/2008 अन्वये जिल्हा परिषदेमधील कामे किंवा विकास योजना यांचेसंबंधी रुपये 5.00/- लक्ष ते रुपये 20.00/- लक्ष पर्यंतचे कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी/ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहे. कार्यकारी अभियंता यांना केवळ रुपये 5.00/- लक्षपर्यतचे कामास प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार असतानाही संबंधीतांनी रुपये 15.00/- लक्ष चे कामास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्याचप्रमाणे ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक 19/03/2012 अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील मुळ बांधकामे व दुरुस्ती संबंधी रुपये 25.00/- लक्ष ते रुपये 50.00/- लक्ष पर्यंतचे कामास प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार स्थायी समितीस आहे. परंतु सदर कामास कार्यकारी अभियंता यांनी रुपये 49.70/- लक्ष चे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी कामाची 5 टक्के मोजमापे तपासणे आवश्यक असतांना तशी तपासणी करण्यात आलेली नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक दिनांक 19/10/2001 नुसार संबंधीत संस्थेने (मक्तेदाराने) 2 वर्ष देखभाल हमी घेणे आवश्यक असून देयकाच्या 10 टक्के रक्कम राखून ठेवणे आवश्यक असताना विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच कार्यारंभ आदेशात दोष दायीत्व निवारण कालावधी 2 वर्ष असलेबाबत स्पष्टपणे नोंद घेण्यात आलेली नाही.

5) कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा नादी या कामाचे बाबतीत सिमेंट चाचणी अहवाल काम पूर्ण झाल्यानंतर जवळपास 1 वर्ष 8 महिन्यानंतर प्रयोगशाळेस चाचणीसाठी पाठविलेला आहे.

6) कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा नादी या कामाचे संदर्भात संदर्भ मोजमाप पुस्तिका क्रमांक 1229, 2385 लेखापरीक्षणात दर्शविण्यात आलेल्या नाहीत.

7) कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा नादी या कामाचे बाबतीत गुत्तेदार चे. भैरवनाथ मजुर सहकारी संस्था मर्यादीत मुददेश वाडगाव तालुका गंगापूर यांचे व कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा उपलखेडा या कामाचे बाबतीत गुत्तेदार चे.गिरीजा मजुर सहकारी संस्था मर्यादीत औरंगाबाद यांचे जिल्हा परिषदेकडील नोंदणी प्रमाणपत्रानुसार त्यांची काम करण्याची पात्रता रुपये 15.00/- लक्ष पर्यंतचीच असतानाही संबंधीत संस्थेस अनुक्रमे रक्कम रुपये 44,31,800/- रक्कम रुपये 24,98,900/- एवढया रकमेचे काम दिलेले आहे.

8) कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा नादी या कामाचे बाबतीत करारनामा रुपये 3,600/- चे मुद्रांकावर व कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा उपलखेडा या कामाचे बाबतीत रुपये 1,600/- ऐवजी रुपये 100/- च्या मुद्रांकावर करण्यात आलेला आहे.

9) कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा जातेगाव या कामाचे बाबतीत सुधारीत तांत्रिक मान्यता रक्कम रुपये 45,18,150/- प्रदान केलेली आहे. सदर कामावर एकूण खर्च रुपये 45,57,007/- नोंदविण्यात आलेला आहे. तांत्रिक मान्यतेपेक्षा रक्कम रुपये 38,857/- जास्तीचा खर्च नोंदविला आहे.

10) कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा जातेगाव या कामाचे संदर्भात संदर्भ मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात दर्शविण्यात आलेल्या नाहीत. मोजमाप पुस्तिका क्रमांक 1291 ही दिनांक 11/03/2014 रोजी संबंधीत शाखा अभियंता यांना वाटप केलेली आहे. परंतु या मोजमाप पुस्तिकेतील नोंदीनुसार दिनांक 21/07/2013 व दिनांक 30/07/2013 रोजी इतर कामाची मोजमापे घेतल्याची नोंद आहे. म्हणजेच मोजमाप पुस्तिका संबंधीत शाखा अभियंता यांना प्राप्त होण्यापुर्वीच त्यात कामाची मोजमापे नोंदविलेली आहेत.

11) कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा जातेगाव या कामाचे बाबतीत बाब Providing and dewatering etc. या बाबीवर रक्कम रुपये 49,478/- एवढा खर्च नोंदविण्यात आलेला आहे. परंतु सदर यंत्राचे लॉगबुक देयकास/संचिकेस संलग्न केलेले नाही.

12) कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा जातेगाव या कामाचे बाबतीत गुत्तेदार चे.नारायणगीरी मजुर सहकारी संस्था मर्यादित जामगाव तालुका गंगापूर यांचे जिल्हा परिषदेकडील नोंदणी प्रमाणपत्रानुसार त्यांची काम करण्याची पात्रता रुपये 15.00/- लक्ष पर्यंतचीच असतानाही संबंधीत संस्थेस रक्कम रुपये 45,18,150/- एवढया रकमेचे काम दिलेले आहे

13) कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा जातेगाव या कामाचे बाबतीत रुपये 3,700/- ऐवजी रुपये 100/- चे मुद्रांकावर करारनामा केलेला आहे.

14) विवरणपत्रातील तीनही कामे ही कोल्हापुरी पध्दतीचे बंधा-याची असूनही त्याबाबतचा खर्च लेखाशिर्ष - कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा राज्यक्षेत्र (2702 5993) या लेखाशिर्षात नोंदविणेऐवजी नोंदवही नमुना क्रमांक 14 नुसार लेखाशिर्ष - MIN-6 (2702 5984) या लेखाशिर्षांतर्गत नियमबाहयपणे नोंदविण्यात आलेला आहे.

15) शासन जलसिंचन विभागाच्या नियमपुस्तिका पान क्रमांक 109 परिच्छेद क्रमांक 8.7.3 चे उपपरिच्छेद (ड) नुसार माती कामासंदर्भात 20 टक्के संकोच (Shrinkage) वजा करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 02/01/2004 नुसार हार्टींग व केसींग झोन भरावयाचे संकुचन व आकुंचन 20 टक्के असल्याने विहित प्रमाणात घट दर्शविणे आवश्यक आहे. परंतु विभागाने 20 टक्के घट न दर्शविल्याने रक्कम रुपये 94,674/- अतिप्रदान झालेले आहे.

16) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 138 प्रमाणे व ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक दिनांक 31/12/2009 नुसार रुपये 5 ते 50 लक्ष पर्यंतची निविदा नोटीस जिल्हा व राज्यस्तरावर मराठी तसेच इंग्रजी दैनिकामध्ये प्रसिध्द करणेत करण्यात आलेली नाही.

**3.418 मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत (गाळ काढणे) केलेल्या कामाबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 25,63,233/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील परिशिष्ट 24 (13 व 15) नुसार मोजमाप नोंदी रक्कम प्रदानाच्या वेळेस लालशाईने रद्द करण्यात आलेल्या नाहीत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 व निविदा अटीनुसार निविदेच्या प्रत्येक पानावर निविदा स्विकारताना कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक असताना तशा पध्दतीने कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी कामाची 5 टक्के मोजमापे तपासणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 21/12/2000 मधील तरतुदीनुसार संबंधित कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता व उपअभियंता यांनी मोजमाप पुस्तकात दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही.

5) कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा वजनापूर गाळ काढणे या कामाचे बाबतीत मोजमाप नोंदवहीतील नोंदीनुसार प्रत्यक्ष काम करण्यापुर्वीचे दिनांकास कामाची मोजमापे नोंदविलेली आहेत व सदर मोजमापे तपासली आहेत.याबाबत नोंदविलेला खर्च रक्कम रुपये 1,97,640/- लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

6) पा.त.तरटयाची वाडी व पा.त.रघुनाथपुरवाडी गाळ काढणे या कामाचे बाबतीत सोबत जोडलेल्या लॉगबुक प्रमाणे काम हे दिनांक 17/3/2015 ते दिनांक 30/03/2015 पर्यंत केल्याचे दिसून येते. परंतु देयकावर टोकन क्रमांक 149 दिनांक 28/03/2015 असे नमुद आहे. म्हणजेच लॉगबुकप्रमाणे दिनांक 28/03/2015 ते दिनांक 30/03/2015 या कालावधीतील 60 तास x दर रुपये 1,080/- = रुपये 64,800/- प्रत्येकी एवढा खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

**3.419 सिमेंट बंधारा योजनेतील कामाबाबत. (उपविभाग सिल्लोड)**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 23) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 1,10,93,719/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक 31/12/2009 अन्वये प्रत्यक्ष कामाचे जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक बसविणे आवश्यक असे फलक बसविलेले नाहीत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 125 व 99 तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 151 नुसार तांत्रिक मान्यतेपुर्वी प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असताना सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील अनुक्रमांक 1, 2 वरील कामाचे बाबतीत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच मागणी करुनही तांत्रिक मान्यता आदेश नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. अनुक्रमांक 9 (पा.त.विरगाव क्रमांक 1) वरील कामाचे बाबतीत कार्यकारी अभियंता यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. परंतु रक्कम रुपये 15,13,900/- एवढया रकमेचे कामास तांत्रिक मान्यता प्रदान करणेस कार्यकारी अभियंता हे सक्षम आहेत किंवा कसे याबाबतचा प्राधिकार संचिकेस संलग्न केलेला नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी कामाची 5 टक्के मोजमापे तपासणे आवश्यक असतांना विवरणपत्रातील कामाचे बाबतीत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118,120 व 152 प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच बी-1 निविदेतील अटी 25 टक्के पर्यंत परिणामात वाढ झाल्यास त्याबाबत कार्यकारी अभियंता यांचे सुधारीत मंजुरीचे आदेश असणे आवश्यक आहे. परंतु विभागाने अशा प्रकारचे आदेश निर्गमित केलेले नाहीत.

5) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील नियम 296 (ब) नुसार माहे फेब्रुवारी आणि मार्च महिन्यामध्ये कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात येऊ नये, असे असतानासुध्दा विभागाने अनुक्रमांक 5,6,7,8,12,13 व 14 वरील कामाचे बाबतीत नियमबाहयपणे कार्यारंभ आदेश दिले आहेत.

6) जलसिंचन विभागाच्या नियमपुस्तिका पान क्रमांक 109 परिच्छेद क्रमांक 8.7.3 चे उपपरिच्छेद (ड) व महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 02/01/2004 नुसार माती कामासंदर्भात 20 टक्के संकोच (Shrinkage) वजा करणे आवश्यक आहे. हार्टींग व केसींग झोन भरावयाचे संकुचन व आकुंचन 20 टक्के असल्याने विहित प्रमाणात घट दर्शविणे आवश्यक आहे. परंतु विभागाने 20 टक्के घट न दर्शविल्याने रुपये 2,08,634/- अतिप्रदान झालेले आहे.

7) तपशिलात दर्शविलेप्रमाणे बी-1 निविदा, शेडयुल बी व कार्यारंभ आदेश यात नमुद केलेल्या रकमेपेक्षा जास्तीचे रकमेने देयक पारीत करुन संबंधीतास रुपये 3,57,174/- जादा प्रदान झालेले आहे.

8) विवरणपत्रातील अनुक्रमांक 3 वरील कामाचे बाबतीत बाब क्रमांक 11) Providing form work (Quantity 202.68 Sq.m.) या बाबीचा दर रुपये 85.70/- प्रती चौरस मीटर असा आहे. परंतु प्रत्यक्षात रुपये 99.50/- प्रती चौरस मीटर असा दिल्याने रक्कम रुपये 2,798/ एवढया रकमेचे अतिप्रदान झालेले आहे.

9) सोबतच्या विवरणपत्रातील अनुक्रमांक 9 वरील कामाचे बाबतीत कंत्राटदार श्री. मुकुंद कृष्णाजी उदारे (सुबेअ) यांच्या नोंदणी प्रमाणपत्राची मुदत दिनांक 05/06/2001 ते दिनांक 04/062006 पर्यंत असताना संबंधीतास नियमबाहयपणे संदर्भिय काम वाटप केलेले आहे. त्याचप्रमाणे गुत्तेदार श्री. मुकुंद कृष्णाजी उदारे (सुबेअ) यांचे नोंदणी प्रमाणपत्रानुसार त्यांची काम करण्याची क्षमता रुपये 15.00/- लक्षपर्यंतची असताना संबंधीतास उपरोक्त देयकान्वये रक्कम रुपये 16,78,267/- एवढया रकमेचे प्रदान झालेले आहे.

**3.420 कोल्हापुरी पध्दतीचे बंधारा योजनेतील कामाबाबत. (उपविभाग सिल्लोड)**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 24) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 1,00,46,788/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 125 व 99 तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 151 नुसार तांत्रिक मान्यतेपुर्वी प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असताना सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील अनुक्रमांक 7 वरील कामाचे बाबतीत तांत्रिक मान्यता आदेश संलग्न केलेले नाहीत व प्रशासकीय मान्यता आदेशात जावक क्रामांक नमुद केलेला नाही. तसेच मागणी करुनही तांत्रिक मान्यता आदेश नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. विवरणपत्रातील अनुक्रमांक 7 वरील (को.प.बं.मुखेड) कामाचे बाबतीत प्रशासकीय मान्यता कार्यकारी अभियंता यांनी क्रमांक नमुद नाही. दिनांक 11/11/2005 रुपये 15 लक्ष चे रक्कमेस प्रदान केली आहे. परंतु ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 12/01/2001 अन्वये कार्यकारी अभियंता यांना विकास कामे व योजना यांचेसंबंधी रक्कम रुपये 2.50 लक्ष पर्यंतचे कामास प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार आहे. परंतु सदर कामाचे बाबतीत रुपये 15 लक्ष चे कामास कार्यकारी अभियंता यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी कामाची 5 टक्के मोजमापे तपासणे आवश्यक असतांना विवरणपत्रातील कामाचे बाबतीत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही

3) विवरणपत्रातील अनुक्रमांक 10 वरील कामाचे बाबतीत बाब क्रमांक 7 Providing and laying C.C.1:2:4 या बाबीवर अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीचा दर लावून रक्कम रुपये 18,490/- जादा प्रदान केलेली आहे. त्याचप्रमाणे बाब क्रमांक 8 मध्ये End weir या पोटबाबीचे परिमाण 4.28 घनमीटर येत असताना 5.72 घनमीटर घेतल्याने जादा दर्शविलेले परिमाणाबाबत रक्कम रुपये 4,137/- जादा प्रदान झालेले आहे. तसेच प्रमाणकाच्या सर्व बाबींची बेरीज केली असता चुकीच्या परिगणनेमुळे रक्कम रुपये 1,198/- संबंधीतास जादा प्रदान झालेले आहे.

4) महाराष्ट्र शासन जलसिंचन विभागाच्या नियमपुस्तिका पान क्रमांक 109 परिच्छेद क्रमांक 8.7.3 चे उपपरिच्छेद (ड) नुसार माती कामा संदर्भात 20 टक्के संकोच (Shrinkage) वजा करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन परिपत्रक, दिनांक 02/01/2004 नुसार हार्टींग व केसींग झोन भरावयाचे संकुचन व आकुंचन 20 टक्के असल्याने विहित प्रमाणात घट दर्शविणे आवश्यक आहे. परंतु विभागाने घट दर्शविली नसल्याने रक्कम रुपये 19,023/- अतिप्रदान झालेले आहे**.**

5) तपशिलात दर्शविलेप्रमाणे बी-1 निविदा, शेडयुल बी व कार्यारंभ आदेश यात नमुद केलेल्या रकमेपेक्षा जास्तीचे रकमेने देयक पारीत करुन संबंधीतास रक्कम रुपये 2,45,225/- जादा प्रदान झालेले आहे**.**

6) कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा मुखेड या कामाचे बाबतीत प्रशासकीय मान्यता दिनांक 11/11/2005 रोजी प्रदान केलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 103 नुसार कामास दिलेली प्रशासकीय मान्यता व्यपगत झालेली असताना, तसेच सुधारीत प्रशासकीय मान्यता घेतलेली नसतानाही संबंधीत कामावर नियमबाहयपणे रक्कम रुपये 14,99,980/- इतका खर्च नोंदविलेला आहे.

7) सोबतच्या विवरणपत्रातील अनुक्रमांक 7 वरील कामाचे बाबतीत मुळ अंदाजपत्रक लेखापरीक्षणास न दर्शविल्याने/संचिकेस संलग्न न केल्यामुळे केलेले प्रदान हे योग्य असलेबाबत व केलेल्या कपाती योग्य असलेबाबत खात्री होत नाही, त्याचप्रमाणे त्यामध्ये गेट बसविणे बाबतची तरतुद होती किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही. तसेच कामाचे देयक हे प्रथम व अंतिम असल्याने त्यात गेट बसविलेलेबाबत खर्च नोंदविलेला नाही. सबब संबंधीत कोल्हापुरी पध्दतीच्या बंधा-यास गेट न बसविल्याने कामाचा हेतू साध्य होत नाही. तसेच संबंधीत कामाचे गुत्तेदार हे केवळ रुपये 5 लक्ष पर्यंतची कामे करण्यास सक्षम असलेबाबत संबंधीतांचे नोंदणी प्रमाणपत्रानुसार दिसून येते. तरीही संबंधीतस रक्कम रुपये 12,99,986/- ची बी-1 निविदा स्विकृत करुन संबंधीतास नियमबाहयपणे कार्यारंभ आदेश देउुन खर्च नोंदविलेला आहे.

8) कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा गलवालाडा क्रमांक 2 या कामाचे बाबतीत कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्रमांक जिपऔ/सिंचन/लेखा/765/2014 दिनांक 19/05/2014 तसेच कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्रमाक 1034 दिनांक 28/07/2014 अन्वये संदर्भिय कामास दिलेली प्रशासकीय मान्यता रदद करुन त्याऐवजी दुस-या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. परंतु विभागाने प्रस्तुत कामावर एकूण रक्कम रुपये 9,88,758/- एवढा खर्च नोंदविलेला आहे. सबब कामाची प्रशासकीय मान्यता रदद करुनही सदर कामावर नियमबाहयपणे रक्कम रुपये 9,88,758/- एवढा खर्च नोंदविल्याचे दिसून येते.

### 3.421 जिल्हा परिषद उपकरातून केलेल्या पाझर तलाव व कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा दुरुस्ती कामातील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 27) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 36,08,791/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166(ब) प्रमाणे तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक 22/10/2000 प्रमाणे उपअभियंता, कार्यकारी अभियंता व शाख अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकामध्ये कामाच्या तपासणी केली दिनांक नमूद करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

2) जल व्यवस्थापन व स्वच्छता समिती सभा दिनांक 27/09/2013 अन्वये अनुक्रमांक 1 ते 117 यामध्ये पाझर तलाव खंडाळा हे काम मंजूर यादीत दिसून येत नाही. काम मंजूर यादीत नसतांना केल्याचे दिसून येते.

3) शासन परिपत्रक दिनांक 18/08/2000 नुसार मोजमाप पुस्तिकावर मोजमापे मान्य असलेबाबत व देयकावर रक्कम प्राप्त झाल्याबाबत ठेकेदार यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक दिनांक 22/12/2000 नुसार एका कामासाठी एकाच मोजमाप पुस्तिका ठेवण्यात यावी. असे निर्देश असतांना वेगवेगळया कामाचे मुल्यांकन एकाच मोजमाप वहीत नोंदविले आहे.

5) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक दिनांक 30/06/2000 नुसार बांधकाम साहित्य कामावर वापरण्यापूर्वी साहित्याचे शासकीय प्रयोगशाळेत चाचणी करून घेणे आवश्यक असतांना प्रमाणक क्रमांक 40 या कामाचे चाचणी अहवाल संचिकेत दिसून आला नाही.

6) कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांची दैनंदिनी उपलब्ध न झाल्यामूळे कामाच्या ठिकाणी जावूनच मोजमापे तपासले बाबत खात्री करता आली नाही.

**3.422 पाझर तलाव दुरुस्ती अकोली नं 1 कामातील अनियमितते बाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदर कामावर रक्कम रुपये 2,60,375/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 01/11/2004 रोजी संबंधित संस्थेला 11 महिने मुदतीत काम पुर्ण करणे बाबतचे आदेश दिले परंतु काम पुर्ण झालेले नाही. तसेच महराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 नुसार मुदतवाढ सुध्दा घेण्यात आली नाही.

2) उपविभागीय अधिकारी, लघुपाट बंधारे उपविभाग परतुर यांचे पत्र क्रमांक 47, दिनांक 02/02/2011 अन्वये त्यानी कामाचे कंत्राटदार चेअरमन मच्छीद्रनाथ मजुर सहाकरी संस्था यांना लेखी नोटीस देवुनही मजुर सस्था काम करत नसल्याने निविदा खंड 3 (क) नुसार अंतिम नोटीस देवुनही कामाची सुरुवात न केल्यामुळे कामाचा ठेका रद्द केला परंतु संबंधित संस्थेला काळ्या यादी टाकण्यात आलेले नाही.

3) दिनांक 11/12/2010 रोजी उपविभागीय अभियंता उपविभाग परतुर यांनी संबंधित संस्थेस प्रथम नोटीस दिली. दिनांक 11/01/2011 रोजी दुसरी नोटीस व 19/05/2011 रोजी तिसरी नोटीस दिली. 01/11/2004 ते 11/12/2010 पर्यंत उपरोक्त काम झाले किंवा कामाबाबत उपअभियंता यांनी कोणताही पत्रव्यवहार न करता सदरील कामाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसुन येते.

4) उपरोक्त काम 30/03/2011 रोजी पुर्ण झाल्याचा दिनांक मोजमाप पुस्तिका क्र. 240 पान क्र. 83 ते 85 वर नमुद आहे. परंतु 2011 ते 2015 या 4 वर्षापर्यंत निधी अभावी पेमेंट झाले नसल्याचे टिपणी पान क्र. 21 कार्यकारी अभियंता यांनी आपल्या अभिप्रायत नोंद केली आहे. याबाबत संबंधित कामावर कोणत्या निधी मधुन खर्च नोंदवला व 4 वर्ष रुपये 2,60,375/- एवढा खर्च ग्रामपंचायतीकडे निधी उपलब्ध होता किवां कसे?

5) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 चे परीच्छेद 8 मधील नियम 20 प्रमाणे ठेकेदाराकडुन केलेल्या करारनाम्याची नोंद नमुना नंबर 48 मध्ये घेण्यात आली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 124 नुसार बांधकामाचे आदेश पुस्तक ठेवण्यात आले नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 प्रमाणे ब-1 निविदेच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

8) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परीपत्रक क्रमांक झेडपीए/200/ प्र.क्र./44/33,दिनांक 22/12/2000 मध्ये सुचित केल्याप्रमाणे प्रत्येक कामासाठी स्वतंत्र पुस्तक न वापरता अनेक कामाच्या नोंदी एकाच पुस्तकात घेण्यात आल्या आहेत.

9) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 100/123/124 मध्ये नमुद केल्यानुसार योजना सुपुर्द करणे बाबतची कार्यवाही झालेली नाही.

10) महाराष्ट्र शासन, निर्णय ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक व्ही पी एस-1099/प्र.क्र./54108, दिनांक 20/05/1999 मधील परीच्छेद (9) नुसार सर्व प्रकारच्या नविन व दुरुस्तीच्या कामाच्या ठिकाणी बोर्ड लावलेला नाही.

**3.423 लेखा परीक्षणास अभिलेखे सादर न करणे बाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 8, दिनांक 22/06/2016 अन्वये अभिलेखे ची मागणी करुनही उपरोक्त प्रमाणकासंदर्भिय मोजमाप पुस्तिका क्र.148/3 संदर्भिय संचिका लेखापरीक्षणात सादर करण्यात आले नाही त्यामुळे आहे त्या परीस्थितीत अंतिम केलेल्या देयकांची रक्कम रुपये 10,81,489/- व सुरक्षा अनामत परत केलेली रक्कम रुपये 53,075/- बाबत लेखापरीक्षणामध्ये टिपण्णी करता आली नाही.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक लेखा 2013/(7/13) वित्त-8 मंत्रालय मुंबई, दिनांक 11/02/2013 अन्वये दंडात्मक कार्यवाही केलेली नाही.

**3.424 गोडाऊन भाडेसाठी होणा-या निरर्थक खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, बीड गोडाऊन भाडे पोटी रक्कम रुपये 1,89,410/- केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लघुपाटबंधारे विभागाने विभागाकडील लोखंडी पहारी, नळयोजनेचे निरुपयोगी साहित्य तसेच कोल्हापुरी बंधारे दरवाजे इत्यादी ठेवण्यासाठी एम.आय.डी.सी. भागातील इमारत भाडे तत्वावर दिनांक 01/11/2010 पासुन पुढे 10 वर्ष करारावर रुपये 14,570/- प्रतिमाह दराने घेतलेली आहे. सन 2014-2015 मध्ये रुपये 1,89,410/- इतके भाडे प्रदान केलेले आहे.

2) शासन निर्णय क्रमांक जेईपी-1096/सीआर-3588/26 दिनांक 22/01/2000 अन्वये तसेच वेळोवेळी शासनाने निरुपयोगी साहित्याचे निर्लेखन करुन सदरच्या वस्तु जाहीर लिलावाने विक्री करणेबाबत सुचित केले आहे, परंतु विभागाने साहित्याचे निर्लेखन न करता पुढील 10 वर्षासाठी भाडे करार करुन गोडाऊनसाठी इमारत घेतली आहे. सदरील गोडाऊन मधील निरोपयोगी व विनावापर पडुन असलेले साहित्य सांभाळणेसाठी दोन पहारेकरी असुन त्यांच्या वेतनावर निरर्थक खर्च होत आहे.

3) गोडाऊन किरायापोटी प्रदान केलेल्या भाडे रकमेवर आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (आय) नुसार 10 टक्के आयकर रुपये 18,941/- कपात केलेला नाही.

**3.425 शासन नियमाचा अवलंब न केल्यामुळे सिंमेट नाला बंधारे कामात झालेल्या जादा अदाई/ नुकसानीबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद बीड चे सिमेंट नाला बंधारे व कोल्हापुरी बंधारेच्या 96 कामावरील खर्चाची तपासणी केली असता शासनाचे रुपये 15,90,515/- चे नुकसान झाल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, जलसिंचन विभागाच्या नियम पुस्तिकेतील पान क्रमांक 109 परिच्छेद क्रमांक 8.7.3 चे उप परिच्छेद (ड) नुसार माती कामा संदर्भात 20 टक्के संकोच घट वजा करणे आवश्यक आहे तसेच महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 02/01/2004 नुसार हार्टींग व केसींग झोन भरावाचे संकोचन व आंकुचन 20 टक्के प्रमाणे घट दर्शविणे आवश्यक आहे. विभागाने कामाच्या पहिल्या धावत्या देयकातून 10 टक्के संकोच घट वजा केली व अंतिम देयकात सदरील 10 टक्के रक्कम संबंधितास अदा केली, त्यामुळे रुपये 2,01,754/- चे नुकसान झालेले आहे.

2) माती भरावाच्या कामाच्या बाबीमध्ये माती टाकणे, पाणी शिंपडणे व 10 टन जनाच्या रोलरने दबाई करणे या बाबींचा समावेश आहे परंतु रोलरचे लॉगबुक ठेवले नसल्याने सदरील बाबीची दबाई झाली किंवा नाही याबाबत तपासणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक राकृयो-2011/प्र.क्रं. 72/ जल-7 दिनांक 09/05/2013 मधील परिच्छेद क्रमांक 3.5 अन्वये नाला खोलीकरणासाठी कठीण पाषाणात खोदकाम करु नये. महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जलसं-2012/प्र.क्रं.1/जल-7 दिनांक 12/11/2013 मधील तांत्रिक मान्यता देताना विचारात घ्यावयाच्या बाबीमधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना

दगडी धरणे नाशिक यांनी निश्चित केलेल्या सिमेंट नाला बांधाच्या काटच्छेद मध्ये नाला तळपातळीच्या खाली खोदाई कठीण खडकापर्यंत व जास्तीत जास्त 1.20 मीटर घेण्यात यावी परंतु सदर कामामध्ये कठीण पाषाणात खोदकाम केले आहे त्यामुळे रक्कम रुपये 13,77,176/- इतका अतिरिक्त खर्च झाला आहे.

4) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) यांचे परिपत्रक दिनांक 03/08/2004 अन्वये Cleaning the site ही बाब निविदा कामात अंर्तभूत करु नये असे असतांना सदर बाबीचा समावेश करुन रुपये 11,585/- ची नियमबाह्य प्रदान केले आहे.

**3.426 गावतलाव व पाझर तलाव कामात झालेल्या जादा अदाई/ नुकसानी बाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद बीड चे गाव तलाव व पाझर तलाव इत्यादी वरील खर्चाची तपासणी केली असता शासनाचे रक्कम रुपये 9,39,390/- चे नुकसान झाल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, जलसिंचन विभागाच्या नियम पुस्तिकेतील पान क्रमांक 109 परिच्छेद क्रमांक 8.7.3 चे उप परिच्छेद (ड) नुसार मातीकामा संदर्भात 20 टक्के संकोचघट वजा करणे आवश्यक आहे, तसेच महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 02/01/2004 नुसार हार्टींग व केसींग झोन भरावाचे संकोचन व आंकुचन घट दर्शविणे आवश्यक आहे. विभागाने सोबतच्या विवरणपत्रात दर्शविलेल्या कामाच्या पहिल्या धावत्या देयकातून 10 टक्के संकोचघट वजा केल्याचे दर्शविले परंतु अंतिम देयकात सदरील 10 टक्के रक्कम संबंधितास अदा केली त्यामुळे रुपये 9,39,390/- चे नुकसान झालेले आहे.

2) माती भरावाच्या कामाच्या संदर्भात असलेल्या बाबीमध्ये माती टाकणे, पाणी शिंपडणे व 10 टन वजनाच्या रोलरने दबाई करणे या बाबीचा समावेश आहे. परंतु रोलरचे लॉगबुक ठेवले नसल्याने सदरील बाबीची दबाई झाली किंवा नाही याबाबत तपासणी करता आली नाही.

**3.427 सिंमेट नाला बंधारे बांधकामाच्या अंदाजपत्रकात प्रादेशिक दरसुचीतील योग्य बाबीचा दर न दिल्याने ठेकेदारास जादा प्रदान झालेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद बीड चे सिमेंट नाला बंधारे बांधकामाच्या कामावरील खर्चाची तपासणी केली असता शासनाचे रुपये 16,75,846/- चे नुकसान झाल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

लघुपाटबंधारे विभागाने सिमेंट नाला बंधारेचे कामासंदर्भात माती भराव कामासाठी अंदाजपत्रकात जो दर दिलेला आहे, तो दर गाभा भराव काम यासाठीचा असल्याचे प्रादेशिक जिल्हा दरसुचीनुसार दिसुन येते. या बाबीनुसार माती दिड मिटर पर्यंत उचलणे, पाणी शिंपडणे, रोलर दबाई करणे, इत्यादी बाबीचा समावेश आहे. परंतु सदर कामात केवळ माती, मुरुम/खडक, खोदलेल्या जागी भरणे इतकेच कामे आहेत. उर्वरित बाबी करणे आवश्यक नाही. त्यामुळे सदर बाबीसाठी प्रादेशिक दरसूचीतील बाब क्रमांक 7 (पृष्ठ क्रमांक 5) नुसार रुपये 2.65 पैसे प्रति घ.मी. दर देणे आवश्यक असतांना सदरचा दर न देता प्रादेशिक दरसूचीतील बाब क्रमांक 17 (पृष्ठ क्रमांक 5) प्रमाणे रुपये 97.40 हा दर दिल्यामुळे ठेकेदाराला रक्कम रुपये 16,75,846/- ची जादा अदाई झालेली आहे. जादा दर देणेबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 12 दिनांक 12/08/2016 अन्वये विचारणा केली असता विभागाने सदर अर्धसमास पत्रास उत्तर अथवा अभिप्राय दिला नाही.

**3.428 सिमेंट नाला बांध पांढरगाळा क्रमांक 2 तालुका जिंतूर कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी सन 2014-15 या वित्तीय वर्षात सिमेंट नाला बांध पांढरगाळा क्रमांक 2 तालुका जिंतूर या कामावर रक्कम रुपये 8,84,326/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील कामाची निविदा मंजुरी अध्यक्ष, जल व्यवस्थापन समिती, जिल्हा परिषद, परभणी यांनी दिली आहे तथापी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 19/03/2012 मधील टिप एक नुसार सदरील मान्यतेची माहिती विषय समितीस सादर केल्याबाबत दिसुन आले नाही.

2) कंत्राटदाराने आणलेल्या सर्व साहित्याची चाचणी घेऊन परिक्षणानंतर योग्य ते साहित्य कामावर प्रत्यक्ष उपयोगात आणणे तसेच सदरील साहित्य कामावर आल्याचा पुरावा नोंदवणे तसेच जमेची तारीखवार नोंद घेणे व त्यानंतर वापराची तारीखवार नोंद घेणे ईत्यादी बाबी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी काटकोरपणे पाळणे आवश्यक असताना, तसेच प्रत्येक देयकासोबत बांधकाम साहित्यांच्या चाचण्यांचा वारंवारिता तक्ता जोडणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही तसेच उक्त संचीकेतील चाचणी अहवालांची तपासणी केली असता केवळ हार्ड मुरुमचीच चाचणी केल्याचे दिसुन आले आहे सिमेंट कॉंक्रीट, स्टील व इतर साहित्याची चाचणी केल्याचे दिसुन आले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति लेखा संहिता 1968 च्या नियम क्रमांक 147 अन्वये, संबंधित विभाग व कंत्राटदार (ग्रामपंचायत) यांच्यामध्ये झालेल्या कराराची करारनामा नोंदवही ठेवणे व लेखापरीक्षणात दर्शविणे आवश्यक असताना अशी नोंदवही ठेवली नाही.

4) प्रस्तुत संचिकेत जिल्ह्याचा खदान दर्शक नकाशा आढळून न आल्यामुळे बांधकाम साहित्य quarry chart मध्ये दाखवलेल्या अंतरावरून आणण्याची खरोखरच आवश्यकता होती किंवा त्यापेक्षा कमी अंतरावर सदर साहित्य उपलब्ध होते याची पडताळणी करता आली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी त्यांनी विहीत केलेल्या प्रमाणात कामाची तपासणी बाबत नोंद मापन पुस्तीकेत घेवून स्वाक्षरी केली आहे. परंतू स्वाक्षरी खाली दिनांक नमुद केलेला नाही.

**3.429 कोल्हापुरी बंधारा कासारवाडी क्रमांक 1 तालुका गंगाखेड कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** लघु पाटबंधारे विभाग जिल्हा परिषद, परभणी यांनी सन 2014-15 या वित्तीय वर्षात कोल्हापुरी बंधारा कासारवाडी क्रमांक 1 तालुका गंगाखेड या कामावर रक्कम रुपये 18,76,479/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लेखापरीक्षणात सदरील कामाच्या संचीकेची तपासणी केली असता सदरील कामाची निविदा मंजुरी अध्यक्ष, जल व्यवस्थापन समिती, जिल्हा परिषद, परभणी यांनी दिली आहे तथापि महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012 /प्र.क्र.680/वित्त-9,दिनांक 19/03/2012 मधील टिप एक नुसार सदरील मान्यतेची माहिती विषय समितीस सादर केल्याबाबत दिसुन आले नाही.

2) कंत्राटदाराने आणलेल्या सर्व साहित्याची चाचणी घेऊन परिक्षणानंतर योग्य ते साहित्य कामावर प्रत्यक्ष उपयोगात आणणे तसेच सदरील साहित्य कामावर आल्याचा पुरावा नोंदवणे तसेच जमेची तारीखवार नोंद घेणे व त्यानंतर वापराची तारीखवार नोंद घेणे ईत्यादी बाबी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी काटकोरपणे पाळणे आवश्यक असताना, तसेच प्रत्येक देयकासोबत बांधकाम साहित्यांच्या चाचण्यांचा वारंवारिता तक्ता जोडणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही तसेच उक्त संचीकेतील चाचणी अहवालांची तपासणी केली असता केवळ हार्ड मुरुमचीच चाचणी केल्याचे दिसुन आले आहे सिमेंट कॉंक्रीट, स्टील व इतर साहित्याची चाचणी केल्याचे दिसुन आले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति लेखा संहिता 1968 च्या नियम क्रमांक 147 अन्वये, संबंधित विभाग व कंत्राटदार (ग्रामपंचायत) यांच्यामध्ये झालेल्या कराराची करारनामा नोंदवही ठेवणे व लेखापरीक्षणात दर्शविणे आवश्यक असताना अशी नोंदवही ठेवली नाही.

4) प्रस्तुत संचिकेत जिल्ह्याचा खदान दर्शक नकाशा आढळून न आल्यामुळे बांधकाम साहित्य quarry chart मध्ये दाखवलेल्या अंतरावरून आणण्याची खरोखरच आवश्यकता होती किंवा त्यापेक्षा कमी अंतरावर सदर साहित्य उपलब्ध होते याची पडताळणी करता आली नाही.

5) सदरील कामाचे आदेश क्रमांक 10, दिनांक 29/03/2013 अन्वये देण्यात येवुन 18 महिन्यात पुर्ण करण्याची मुदत (दिनांक 29/09/2014 पर्यंत) देण्यात आली होती तथापी प्रत्यक्षात सदरील काम लेखापरीखण वर्षाखेरपर्यंत पुर्ण करण्यात आले नाही. सदरील कामास मुदतवाढ मिळण्यासाठी दिनांक 15/12/2014 रोजी ठेकेदाराने अर्ज केल्याबाबत संचीकेत आढळुन आले तथापी सदरील अर्जावर आवक क्रमांक व दिनांक नमुद नाही. ठेकेदाराचा अर्ज दिनांक 15/12/2014 रोजीचा असताना प्रत्यक्षात उपविभागीय अधिकारी यांनी कॅम्प मध्ये असल्यामुळे जावक क्रमांक नमुद न करता दिनांक 23/12/2014 रोजी मुदतवाढीचा प्रस्ताव सादर केला आहे विहीत मुदतीत काम पुर्ण न झाल्यामुळे व विहीत मुदतीत ठेकेदाराचा अर्ज न आल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 नुसार कार्यादेशातील मर्यादेनंतर मंजुर केलेली वाढ वैध असणार नाही व त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पुनरीक्षणाची शक्ती विहीत केलेली असताना अशी कार्यवाही न करता कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी स्वत:चे अधिकारात नियमबाहयपणे मुदतवाढ मंजुर केली आहे. सदरील मुदतवाढ ही नियमबाह्य तर आहेच शिवाय ती कार्यारंभ आदेशातील मुदतवाढ संपल्याच्या दिंनांकपासून 5 महिने म्हणजे दिनांक 28/02/2015 पर्यंतच दिलेली असूनही सदरील काम लेखापरीक्षण वर्षाखेरपर्यंत पुर्ण करण्यात आलेले नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी त्यांनी विहीत केलेल्या प्रमाणात कामाची तपासणी बाबत नोंद मापन पुस्तीकेत घेवून स्वाक्षरी केली आहे. परंतू स्वाक्षरी खाली दिनांक नमुद केलेला नाही.

7) सदर बंधाऱ्याच्या कामामध्ये, needle चा मूळ दर रुपये 7,109/- इतका दर्शविण्यात आला आहे. अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकेचे अवलोकन केले असता हा दर अधिक्षक अभियंता, लघुसिंचन, औरंगाबाद यांच्या परिपत्रकाच्या अधीन राहून निश्चित केल्याचे दिसून येते परंतु अर्धसमासपत्र क्रमांक 1 व 3, दिनांक 26/10/2015 अन्वये मागणी करूनसुद्धा सदर परिपत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 105(ब) नुसार, एखाद्या विवक्षित बाबीसाठी दरांच्या अनुसूचीमध्ये दर दिलेला नसेल परंतु ती बाब पार पाडणे आवश्यक असेल तर अशा बाबींचा दर स्थायी समितीकडून मान्य करून घेणे आवश्यक असते. असे असूनही विभागाने अशी कार्यवाही केली नाही.

**3.430 कोल्हापुरी बंधारा कासारवाडी क्रमांक 2 तालुका गंगाखेड कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** लघु पाटबंधारे विभाग जिल्हा परिषद, परभणी यांनी सन 2014-15 या वित्तीय वर्षात कोल्हापुरी बंधारा कासारवाडी क्रमांक 2 तालुका गंगाखेड या कामावर रक्कम रुपये 19,95,070/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील कामाची निविदा मंजुरी अध्यक्ष, जल व्यवस्थापन समिती, जिल्हा परिषद, परभणी यांनी दिली आहे तथापि महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9,दिनांक 19/03/2012 मधील टिप एक नुसार सदरील मान्यतेची माहिती विषय समितीस सादर केल्याबाबत दिसुन आले नाही.

2) कंत्राटदाराने आणलेल्या सर्व साहित्याची चाचणी घेऊन परिक्षणानंतर योग्य ते साहित्य कामावर प्रत्यक्ष उपयोगात आणणे तसेच सदरील साहित्य कामावर आल्याचा पुरावा नोंदवणे तसेच जमेची तारीखवार नोंद घेणे व त्यानंतर वापराची तारीखवार नोंद घेणे ईत्यादी बाबी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी काटकोरपणे पाळणे आवश्यक असताना, तसेच प्रत्येक देयकासोबत बांधकाम साहित्यांच्या चाचण्यांचा वारंवारिता तक्ता जोडणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही तसेच उक्त संचीकेतील चाचणी अहवालांची तपासणी केली असता केवळ हार्ड मुरुमचीच चाचणी केल्याचे दिसुन आले आहे सिमेंट कॉंक्रीट, स्टील व इतर साहित्याची चाचणी केल्याचे दिसुन आले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति लेखा संहिता 1968 च्या नियम क्रमांक 147 अन्वये, संबंधित विभाग व कंत्राटदार (ग्रामपंचायत) यांच्यामध्ये झालेल्या कराराची करारनामा नोंदवही ठेवणे व लेखापरीक्षणात दर्शविणे आवश्यक असताना अशी नोंदवही ठेवली नाही.

4) प्रस्तुत संचिकेत जिल्ह्याचा खदान दर्शक नकाशा आढळून न आल्यामुळे बांधकाम साहित्य quarry chart मध्ये दाखवलेल्या अंतरावरून आणण्याची खरोखरच आवश्यकता होती किंवा त्यापेक्षा कमी अंतरावर सदर साहित्य उपलब्ध होते याची पडताळणी करता आली नाही.

5) लेखापरीक्षणात सदरील कामाच्या संचीकेची तपासणी केली असता सदरील कामाचे आदेश क्रमांक 10, दिनांक 29/03/2013 अन्वये देण्यात येवुन 18 महिन्यात पुर्ण करण्याची मुदत (दिनांक 29/09/2014 पर्यंत) देण्यात आली होती तथापि प्रत्यक्षात सदरील काम लेखापरीक्षण वर्षाखेरपर्यंत पुर्ण करण्यात आले नाही. सदरील कामास मुदतवाढ मिळण्यासाठी दिनांक 15/12/2014 रोजी ठेकेदाराने अर्ज केल्याबाबत संचीकेत आढळुन आले तथापी सदरील अर्जावर आवक क्रमांक व दिनांक नमुद नाही. ठेकेदाराचा अर्ज दिनांक 15/12/2014 रोजीचा असताना प्रत्यक्षात उपविभागीय अधिकारी यांनी कॅम्प मध्ये असल्यामुळे जावक क्रमांक नमुद न करता दिनांक 23/12/2014 रोजी मुदतवाढीचा प्रस्ताव सादर केला आहे विहीत मुदतीत काम पुर्ण न झाल्यामुळे व विहीत मुदतीत ठेकेदाराचा अर्ज न आल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 नुसार कार्यादेशातील मर्यादेनंतर मंजुर केलेली वाढ वैध असणार नाही व त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पुनरीक्षणाची शक्ती विहीत केलेली असताना अशी कार्यवाही न करता कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी स्वत:चे अधिकारात नियमबाहयपणे मुदतवाढ मंजुर केली आहे सदरील मुदतवाढ ही नियमबाह्य तर आहेच शिवाय ती-कार्यारंभ आदेशातील मुदतवाढ संपल्याच्या दिंनाकपासून 5 महिने म्हणजे दिनांक 28/02/2015 पर्यंतच दिलेली असूनही सदरील काम लेखापरीक्षण वर्षाखेरपर्यंत पुर्ण करण्यात आलेले नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी त्यांनी विहीत केलेल्या प्रमाणात कामाची तपासणी बाबत नोंद मापन पुस्तीकेत घेवून स्वाक्षरी केली आहे.परंतू स्वाक्षरी खाली दिनांक नमुद केलेला नाही.

7) सदर बंधाऱ्याच्या कामामध्ये, needle चा मूळ दर रुपये 7,109/- इतका दर्शविण्यात आला आहे. अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकेचे अवलोकन केले असता हा दर अधिक्षक अभियंता, लघुसिंचन, औरंगाबाद यांच्या परिपत्रकाच्या अधीन राहून निश्चित केल्याचे दिसून येते परंतु अर्धसमासपत्र क्रमांक 1 व 3, दिनांक 26/10/2015 अन्वये मागणी करूनसुद्धा सदर परिपत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 105 (ब) नुसार, एखाद्या विवक्षित बाबीसाठी दरांच्या अनुसूचीमध्ये दर दिलेला नसेल परंतु ती बाब पार पाडणे आवश्यक असेल तर अशा बाबींचा दर स्थायी समितीकडून मान्य करून घेणे आवश्यक असते. असे असूनही विभागाने अशी कार्यवाही केली नाही.

### 3.431 कोल्हापुरी बंधारा विशेष दुरूस्ती कामातील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद, परभणीचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणात मूळ परिच्छेदामध्ये नमूद केलेली कोल्हापुरी बंधारा विशेष दुरुस्तीची 6 कामे करण्यात आल्याचे दिसून येते. यावर रुपये 40,26,723/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.444/वित्त-9,दिनांक 15/07/2008, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9,दिनांक 19/03/2012 तथा शुध्दीपत्रक दिनांक 23/07/2012 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील टिप दोन नुसार जिल्हा परिषदेतील विभागाने कामांच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल

जिल्हा परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेत सादर करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाल्याचे दिसुन आले नाही.

2) कंत्राटदाराने आणलेल्या सर्व साहित्याची चाचणी घेऊन परिक्षणानंतर योग्य ते साहित्य कामावर प्रत्यक्ष उपयोगात आणणे तसेच सदरील साहित्य कामावर आल्याचा पुरावा नोंदवणे तसेच जमेची तारीखवार नोंद घेणे व त्यानंतर वापराची तारीखवार नोंद घेणे ईत्यादी बाबी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी काटकोरपणे पाळणे आवश्यक असताना, तसेच प्रत्येक देयकासोबत बांधकाम साहित्यांच्या चाचण्यांचा वारंवारिता तक्ता जोडणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही तसेच उक्त संचीकेतील चाचणी अहवालांची तपासणी केली असता केवळ हार्ड मुरुमचीच चाचणी केल्याचे दिसुन आले आहे सिमेंट कॉंक्रीट, स्टील व इतर साहित्याची चाचणी केल्याचे दिसुन आले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति लेखा संहिता 1968 च्या नियम क्रमांक 147 अन्वये, संबंधित विभाग व कंत्राटदार यांच्यामध्ये झालेल्या कराराची करारनामा नोंदवही ठेवणे व लेखापरीक्षणात दर्शविणे आवश्यक असताना अशी नोंदवही ठेवली नाही.

4) प्रस्तुत संचिकेत जिल्ह्याचा खदान दर्शक नकाशा आढळून न आल्यामुळे बांधकाम साहित्य quarry chart मध्ये दाखवलेल्या अंतरावरून आणण्याची खरोखरच आवश्यकता होती किंवा त्यापेक्षा कमी अंतरावर सदर साहित्य उपलब्ध होते याची पडताळणी करता आली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी त्यांनी विहीत केलेल्या प्रमाणात कामाची तपासणी बाबत नोंद मापन पुस्तीकेत घेवून स्वाक्षरी केली आहे. परंतू स्वाक्षरी खाली दिनांक नमुद केलेला नाही.

6) सदर बंधाऱ्याच्या कामामध्ये, needle चा मूळ दर रुपये 7,109/- इतका दर्शविण्यात आला आहे. अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकेचे अवलोकन केले असता हा दर अधिक्षक अभियंता, लघुसिंचन, औरंगाबाद यांच्या परिपत्रकाच्या अधीन राहून निश्चित केल्याचे दिसून येते परंतु अर्धसमासपत्र क्रमांक 1 व 3, दिनांक 26/10/2015 अन्वये मागणी करूनसुद्धा सदर परिपत्रक लेखापरीक्षण दरम्यान उपलब्ध झाले नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 105(ब) नुसार, एखाद्या विवक्षित बाबीसाठी दरांच्या अनुसूचीमध्ये दर दिलेला नसेल परंतु ती बाब पार पाडणे आवश्यक असेल तर अशा बाबींचा दर स्थायी समितीकडून मान्य करून घेणे आवश्यक असते. असे असूनही विभागाने अशी कार्यवाही का केली नाही याचा समर्पक खुलासा द्यावा.

8) सदर बंधाऱ्यांची मूळ कामे पूर्ण होऊन 20 वर्षाहून अधिक कालावधी लोटलेला आहे.या बंधाऱ्यांची दुरूस्ती यापूर्वी नेमकी कधी झाली होती याची माहिती सदर विभागाच्या नमुना नंबर 23 वरुन प्राप्त होऊ शकली असती. परंतु सदर नोंदवहीत फक्त मागील 5 वर्षापासूनच्याच नोंदी अद्ययावत आहेत. त्यापूर्वीच्या नोंदी या नोंदवहीत घेतलेल्या नसल्यामुळे सदर दुरुस्तीच्या कामावर वारंवार खर्च झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

9) जुन्या needles वापरण्यायोग्य नसून त्या बदलण्याची आवश्यकता असल्याबाबतचा स्थळ पाहणी अहवाल (spot inspection report) उप अभियंता श्री.एस.जे.थेटे यांनी उपरोक्त सर्व ठिकाणी दिनांक 23/08/2014 या एकाच दिवशी जाऊन केल्याचे संचिकेस जोडलेल्या तपासणी अहवालावरून दिसून येते. सर्व तपासण्या एकाच दिवशी पूर्ण होण्याची बाब योग्य नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 90 नुसार वरिलप्रमाणे निरनिराळ्या कामान्वये बदलण्यात आलेल्या जुन्या needles ची नोंद साठा नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. विभागाने संबंधित उपविभागाकडून (sub division) या जुन्या needles ची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आल्याबाबतचे प्रमाणपत्र तर घेतले आहे. परंतु या प्रमाणपत्रावर दिनांक तसेच साठा नोंदवहीत नोंद घेतल्याचा पृष्ठ क्रमांक नमूद नाही. अर्धसमास पत्र क्रमांक 2,दिनांक 26/10/2015 अन्वये लेखी व वारंवार तोंडी मागणी करूनही प्रत्यक्ष साठा नोंदवही मात्र लेखापरीक्षणाला दाखविण्यात आली नाही.

**3.432 विविध सिमेंट नाला बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद, परभणीचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणात मूळ परिच्छेदामध्ये नमूद केलेली विविध सिमेंट नाला बांधकामाची 18 कामे करण्यात आल्याचे दिसून येते. यावर रुपये 1,35,25,440/- एवढा खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.444/वित्त-9, दिनांक 15/07/2008, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 19/03/2012 तथा शुध्दीपत्रक दिनांक 23/07/2012 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील टिप दोन नुसार जिल्हा परिषदेतील विभागाने कामांच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेत सादर करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाल्याचे दिसुन आले नाही.

2) कंत्राटदाराने आणलेल्या सर्व साहित्याची चाचणी घेऊन परिक्षणानंतर योग्य ते साहित्य कामावर प्रत्यक्ष उपयोगात आणणे तसेच सदरील साहित्य कामावर आल्याचा पुरावा नोंदवणे तसेच जमेची तारीखवार नोंद घेणे व त्यानंतर वापराची तारीखवार नोंद घेणे ईत्यादी बाबी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी काटकोरपणे पाळणे आवश्यक असताना , तसेच प्रत्येक देयकासोबत बांधकाम साहित्यांच्या चाचण्यांचा वारंवारिता तक्ता जोडणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही तसेच उक्त संचीकेतील चाचणी अहवालांची तपासणी केली असता केवळ हार्ड मुरुमचीच चाचणी केल्याचे दिसुन आले आहे सिमेंट काँक्रीट, स्टील व इतर साहित्याची चाचणी केल्याचे दिसुन आले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति लेखा संहिता 1968 च्या नियम क्रमांक 174 अन्वये, पहिले व अंतिम देयक नमुना नंबर 55 मध्ये सादर करणे आवश्यक असताना अनुक्रमांक 5 ते 18 कामांच्या बाबतीत ते नमुना नंबर 58 मध्ये सादर करण्यात आले आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति लेखा संहिता 1968 च्या नियम क्रमांक 147 अन्वये, संबंधित विभाग व कंत्राटदार (ग्रामपंचायत) यांच्यामध्ये झालेल्या कराराची करारनामा नोंदवही ठेवणे व लेखापरीक्षणात दर्शविणे आवश्यक असताना अशी नोंदवही ठेवली नाही.

5) मूळ लेखा परीक्षण अहवालाच्या अक्षेपासोबत जोडलेल्या परिशिष्टातील काम क्रमांक 4 सिमेंट नाला बांधकाम रूढी ता मानवत च्या बाबतीत निविदा सूचनेतील अटी नूसार कंत्राटदाराने सूरक्षा ठेव अनामत रक्कम मूदती ठेवीच्या स्वरूपात जमा करणे आवश्यक असतांना कंत्राटदाराने सदर रक्कम रूपये 13,500/- आर.टी.जी.एस द्वारे जमा केल्याचे दिसून येते. सदर रक्कम मूदत ठेवीत न गूंतविल्यामूळे सदर रकमेचा विनियोग इतरत्र झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी त्यांनी विहीत केलेल्या प्रमाणात कामाची तपासणी बाबत नोंद मापन पूस्तिकेत घेवून स्वाक्षरी केली आहे. परंतू स्वाक्षरी खाली दिनांक नमूद केलेला नाही.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 2010/प्र.क्र.172/पंरा-7, दिनांक 19/10/2011 व शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2013/प्र.क्र.49/पंरा, दिनांक 07/02/2013 अन्वये ग्रामपंचायतने करावयाच्या एकाच साहित्याच्या खरेदीची किंमत जर 1 लाख रुपयाच्या वर जात असेल तर अशा साहित्याच्या खरेदीसाठी ग्रामपंचायतने e-tendering ची प्रक्रिया अमलात आणणे आवश्यक आहे. असे असताना 16 कामांच्या ग्रामपंचायतींनी अशी कार्यवाही केल्याचे उपलब्ध अभिलेख्यांवरून दिसून आले नाही.

8) प्रस्तुत कामांच्या संचिकेत जिल्ह्याचा खदान दर्शक नकाशा आढळून न आल्यामुळे बांधकाम साहित्य quarry chart मध्ये दाखवलेल्या अंतरावरून आणण्याची खरोखरच आवश्यकता होती किंवा त्यापेक्षा कमी अंतरावर सदर साहित्य उपलब्ध होते याची पडताळणी करता आली नाही.

**3.433 पाझर तलाव क्रमांक 2 सुप्पा तालुका गंगाखेड कामातील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** लघु पाटबंधारे विभाग जिल्हा परिषद, परभणी यांनी सन 2014-2015 या वित्तीय वर्षात पाझर तलाव क्रमांक 2, सुप्पा, तालुका गंगाखेड या कामावर रक्कम रुपये 25,00,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.444/वित्त-9, दिनांक 15/07/2008, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 19/03/2012 तथा शुध्दीपत्रक दिनांक 23/07/2012 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9,दिनांक 31/01/2013 मधील टिप दोन नुसार जिल्हा परिषदेतील विभागाने कामांच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेत सादर करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाल्याचे दिसुन आले नाही.

2) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2008/प्र.क्र.152/यंत्रकक्ष-बां.सा.,दिनांक 18/11/2009 नुसार कंत्राटदाराने आणलेल्या सर्व साहित्याची चाचणी व परिक्षणानंतर योग्य ते साहित्य कामावर प्रत्यक्ष उपयोगात आणण्यात येईल असे पाहावे तसेच सदरील साहित्य कामावर आल्याचा पुरावा नोंदवणे तसेच जमेची तारीखवार नोंद घेणे व त्यानंतर वापराची तारीखवार नोंद घेणे ईत्यादी बाबी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी काटकोरपणे पाळावे असे नमुद आहे तसेच अधिक्षक अभियंता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक गुनि-1/1019, दिनांक 24/05/2006 व गुनि-1/2031, दिनांक 03/11/2006 नुसार बांधकाम साहित्याच्या चाचण्या वारंवारितेनुसार घेवुन कामावर साहित्य वापरणे आवश्यक आहे तसेच प्रत्येक देयकासोबत बांधकाम साहित्यांच्या चाचण्यांचा वारंवारिता तक्ता जोडणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही तसेच उक्त संचीकेतील चाचणी अहवालांची तपासणी केली असता केवळ हार्ड मुरुमचीच चाचणी केल्याचे दिसुन आले आहे सिमेंट काँक्रीट,स्टील व इतर साहित्याची चाचणी केल्याचे दिसुन आले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति लेखा संहिता 1968 च्या नियम क्रमांक 174 अन्वये, पहिले व अंतिम देयक नमुना नंबर 55 मध्ये सादर करणे आवश्यक असताना ते नमुना नंबर 58 मध्ये सादर करण्यात आले आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति लेखा संहिता 1968 च्या नियम क्रमांक 147 अन्वये, संबंधित विभाग व कंत्राटदार (ग्रामपंचायत) यांच्यामध्ये झालेल्या कराराची करारनामा नोंदवही ठेवणे व लेखापरीक्षणात दर्शविणे आवश्यक असताना अशी नोंदवही ठेवली नाही.

5) अंदाजपत्रकातील rate analysis (बाब क्रमांक 6) मध्ये कोंक्रिटचा दर निश्चित करताना,सिमेंट,मेटल व वाळूच्या मूळ दरात lead charges मिळवून अंतिम दर निश्चित केले आहेत.तथापि लेखापरीक्षणास जिल्हयाचा खदान दर्शक तक्ता पाहावयास न मिळाल्यामुळे दिलेले दर बरोबर असल्याची पडताळणी करता आली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी त्यांनी विहीत केलेल्या प्रमाणात कामाची तपासणी बाबत नोंद मापन पुस्तीकेत घेवून स्वाक्षरी केली आहे.प रंतू स्वाक्षरी खाली दिनांक नमुद केलेला नाही.

7) आदेश क्रमांक CR-390, दिनांक 23/04/1984 अन्वये सदर कामाकरिता मूळ प्रशासकीय मान्यता रुपये 7,29,018/- ला असताना जून 1987 पर्यंत या कामावर कुशल खर्चापोटी रुपये 5.93 लाख तर अकुशल खर्चापोटी रुपये 13.31 लाख असा एकूण 19.74 लाख रुपये खर्च होऊनसुद्धा सदरील काम अर्धवट अवस्थेत थांबविण्यात आल्याचे अभिलेख्यावरून दिसून येते. प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्च केला आहे

8) नियोजन विभागाचे पत्र क्रमांक रोहयो-2004/प्र.क्र.74/रोहयो-5, दिनांक 18/12/2007 अन्वये अपूर्ण राहिलेल्या कामाची किंमत रुपये 25,24,196/- इतकी निश्चित करण्यात आली व हे काम शासकीय यंत्रणेमार्फत पूर्ण करण्यास परवानगी देण्यात आली. नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक रोहयो, दिनांक 23/12/2013 अन्वये जुन्या रोहयो योजनेअंतर्गत दिनांक 01/04/2008 रोजी अपूर्ण स्वरुपात असलेल्या शासनमान्य यादीतील कामांना

विहित प्रक्रियेद्वारे पूर्ण करण्यासाठी परवानगी देण्यात आली.सदर काम विलंबाने पूर्ण करण्यात आल्यामुळे सदरील कामापोटी करण्यात आलेल्या खर्चात प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते.

**3.434 मौजे इंचा, तालुका हिंगोली येथील पाझर तलाव बांधकामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-2015 या वित्तीय वर्षात मौजे इंचा तालुका हिंगोली येथे पाझर तलावाचे बांधकामावर रूपये 4,12,714/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक पविनि/ कार-डब्ल्युसी/xxxvII शाविनि/संकिर्ण/फ-2,दिनांक 27/04/2006 नुसार कामांचे देयकातून 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम वसूल करावयाची आहे. परंतु लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सदर कामाचे अंदाजपत्रकात 1 टक्के विमा रक्कम कामाच्या प्रत्येक बाबीत अंतर्भुत करुन समाविष्ट केली असुन त्याप्रमाणे देयक प्रदान केले आहे. त्यामुळे कंत्राटदारास विम्यापोटी 1 टक्के रक्कम रुपये 45,453/- चे नियमबाहय जादा प्रदान झाल्याने जादा प्रदानाची रक्कम रूपये 45,453/- वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक दिनांक 20/11/2009 नुसार सदरील कामाचा करारनामा हा मुद्रांक पेपर रक्कम रूपये 4,000/- वर करणे आवश्यक असतांना तो रक्कम रुपये 2100/- वर केला आहे. कमी रक्कम रुपये 1900/- वसूल करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक- बीसीए/2009/प्र.क्र.-108/ कामगार-7, दिनांक 17/06/2010 अन्वये कंत्राटदाराचे कामाचे देयकातून 1 टक्के कामगार कल्याण उपकर कपात करावयाचा असताना विभागाने कामाचे दर पृथ:करणामध्ये बाब निहाय कामगार कल्याण उपकर 1 टक्का रक्कम अंतर्भुत करुन अंदाजपत्रकात समाविष्ट केली असुन त्याप्रमाणे देयक प्रदान केल्याने देयकामधील समाविष्ट बाबींच्या दरामध्ये 1 टक्का प्रमाणे कामगार कल्याण उपकर रक्कम रूपये 41,271/- चे कंत्राटदारास जादा प्रदान झालेली आहे. जादा प्रदान रक्कम रुपये 41,271/- वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 87 नुसार तसेच शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2008/प्र.क्र.152/ यंत्र कक्ष बा.स., दिनांक 18/11/2009 नुसार साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 166 नुसार कार्यकारी अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकेवर दिनांकीत स्वाक्षरी केली नाही.

6) निविदेतील जोडपत्र क्रमांक 1 मधील अटीनुसार विक्रीकर आयुक्ताकडील व प्राप्तीकर आयुक्ताकडील नोंदणीपत्र व तसेच निविदेच्या दिनांकापर्यंत मुल्यवर्धीत कर व प्राप्ती कर भरणा केल्याचे प्रमाणपत्र सादर न करता नोंदणी प्रमाणपत्राचा क्रमांक सादर केला आहे.

7) निवेदेतील अट क्रमांक 11 नुसार कामाच्या ठिकाणाची कंत्राटदाराने पाहणी करून काम स्वीकारण्यापूर्वी विभागाला कळविणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न केल्याने सुधारीत प्रशासकीय मान्यता दिल्याने कंत्राटदारास अतिरिक्त प्रदान झालेले आहे.

8) जागेचे दानपत्र महसुल विभागाकडे नोंदणी केली नाही.

9) कंत्राटदाराकडून धनादेश मिळाल्याबाबत मुद्रांकीत पोंच घेतलेली नाही.

10) उक्त कामाची सुरक्षा अनामत रक्कम जिल्हा परिषद निधीच्या खात्यामध्ये जमा केल्याचे अभिलेखे लेखा परीक्षणास दर्शविले नाहीत.

**3.435 बांधकामाच्या जागेचे सर्व्हेक्षणासाठी रक्कम प्रदान केलेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणामध्ये विविध बांधकाम करण्यापुर्वी संबंधित जागेचा

सर्वेक्षण खर्चाचे स्वतंत्रपणे देयक तयार करुन रक्कम रुपये 8,88,920/- प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, 1968 चे नियम 99 नुसार जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता हे सर्व प्रकारची बांधकामे पार पाडण्यासाठी व देखभाल दुरुस्तीसाठी जबाबदार प्राधिकारी आहेत.

2) विभागाने परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे विविध बांधकामाचे सर्वेक्षण स्वतंत्र यंत्रणेमार्फत केले असुन सर्वेक्षणाचे ठेकेदारास नियमबाह्य प्रदान केले आहे.

3) विभागाकडे सर्व प्रकारची शासकीय यंत्रणा उपलब्ध असतांना खाजगी यंत्रणेमार्फत सर्वेक्षण करुन घेण्याचे प्राधिकार दर्शविले नाहीत.

**3.436 मौजे ताकतोडा, तालुका सेनगाव येथील पाझर तलाव बांधकामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणामध्ये ताकतोडा, तालुका सेनगाव येथे पाझर तलावाचे बांधकामावर रूपये 7,59,970/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक पविनि/कार-डब्ल्युसी/xxxv।। शाविनि/संकिर्ण/फ-2, दिनांक 27/04/2006 नुसार कामांचे देयकातून 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम वसूल करावयाची असताना विभागाने कामाचे अंदाजपत्रकात 1 टक्के विमा रक्कम कामाच्या प्रत्येक बाबीत अंतर्भुत करुन समाविष्ट केली असुन त्याप्रमाणे देयक प्रदान केल्याने कंत्राटदारास विम्यापोटी 1 टक्के रक्कम रूपये 7,600/- चे नियमबाह्य जादा प्रदान झाल्याने जादा प्रदानाची रक्कम रूपये 7,600/- वसूल करुन शासन खाती भरणा केली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक दिनांक 20/11/2009 नुसार सदरील कामाचा करारनामा हा मुद्रांक पेपर रक्कम रूपये 2,000/- वर करणे आवश्यक असतांना तो रक्कम रुपये 100/- वर केला आहे. कमी रक्कम रुपये 1900/- वसूल करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक- बीसीए/ 2009/ प्र.क्र.-108/ कामगार-7, दिनांक 17/06/2010 अन्वये कंत्राटदाराचे कामाचे देयकातून 1 टक्के कामगार कल्याण उपकर कपात करावयाचे असताना विभागाने कामाचे दर पृथ:करणामध्ये बाबनिहाय कामगार कल्याण उपकर 1 टक्का रक्कम अंतर्भुत करुन अंदाजपत्रकात समाविष्ट केल्याने देयकामधील समाविष्ट बाबींच्या दरामध्ये 1 टक्का प्रमाणे कामगार कल्याण उपकर रक्कम रूपये 7,600/- चे कंत्राटदारास जादा प्रदान झालेले असल्याने जादा प्रदान रक्कम रुपये 7,600/- वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 87 नुसार तसेच शासन निर्णय क्र संकिर्ण 2008/प्र.क्र.152/ यंत्र कक्ष बा.स., दिनांक 18/11/2009 नुसार साहित्याचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 166 नुसार कार्यकारी अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकेवर दिनांकीत स्वाक्षरी केली नाही.

6) निविदेतील जोडपत्र क्रमांक 1 मधील अटीनुसार विक्रीकर आयुक्ताकडील व प्राप्तीकर आयुक्ताकडील नोंदणीपत्र व तसेच निविदेच्या दिनांकापर्यंत मुल्यवर्धीत कर व प्राप्तीकर भरणा केल्याचे प्रमाणपत्र सादर न करता नोंदणी प्रमाणपत्राचा क्रमांक सादर केला आहे.

7) जागेचे दानपत्र महसुल विभागाकडे नोंदणी केली नाही.

8) कंत्राटदाराकडून धनादेश मिळाल्याबाबत मुद्रांकीत पोंच घेतलेली नाही.

9) उक्त कामाची सुरक्षा अनामत रक्कम जिल्हा परिषद निधीच्या खात्यामध्ये जमा केल्याचे अभिलेखे लेखा परीक्षणास दर्शविले नाहीत.

**3.437 सिमेंट बंधारा क्रमांक 02 गौरठा, उमरी कामाची नियमबाहयता.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 33) -** सन 2014-2015 या कालावधीचे लघू पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात लघु पाटबंधारे योजने अंतर्गत केलेल्या कामावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाच्या देयकातुन काम उशीराने पुर्ण केल्यामुळे दंड रुपये 05/- प्रतिदिन प्रमाणे रुपये 1445 अंत्यल्प आकारला आहे. प्रत्यक्षात काम दिनांक 14/09/2013 ला पुर्ण होणे बंधनकारक असतांना ते दिनांक 13/06/2014 ला पुर्ण होणे म्हणजेच एकुण 289 दिवस उशिराने झालेले आहे. सदर बाब नियमबाहय आहे.

2) एकूण 289 दिवस उशिराने झालेले कामाचा दर्जा राखला गेला नसल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर कामावर वापरण्यासाठीचे साहित्य सुस्थितीत राहिले नसल्याची शक्यता आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक सिमेंट साहित्य-1049/प्र.क्र.56/35 दिनांक 30/06/2000 नुसार सिमेंट/मुरुम/खडी इत्यादीचा वापर करण्यापुर्वी शासकिय प्रयोग शाळेतुन गुणवत्ता चाचणी करुन व सदरचे प्रमाणपत्र प्राप्त करुन नंरतच प्रत्यक्षात कामाला सुरुवात करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नाही. सदर कामाचे तपासणी अहवाल अप्राप्त असल्याने देयकातुन रुपये 2,000/- दंड आकारला व नियमबाहय देयक पारित केलेले आहे. सदर कामाचा दर्जा योग्य असल्याबाबत सत्यता पडताळणी होऊ शकत नाही.

4) नियमानुसार कामाची मुदत संपण्याच्या 15 दिवस अगोदर मुदतवाढीचा अर्ज सादर करणे आवश्यक असतांना सरपंच/ग्रामसेवक यांनी अंत्यंत विलंबाने मुदत वाढीचा अर्ज सादर केला आहे. असे असतांना पत्र क्रमांक 733 दिनांक 24/06/2014 ला रुपये 5 नियमबाहय अत्यंल्प दंडासह मंजुरी देण्यात आली. सदर बाब संशयास्पद आहे.

**3.438 सिमेंट गेटेड बंधारा कामावरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 40)** - सन 2014-2015 या कालावधीचे लघू पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 3,00,985/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) करारनामावर सरपंच व ग्रामसेवक मांजरी, तालुका मुखेड यांची स्वाक्षरी नाही.तसेच बंधा-याचे काम नेमके कोठे व कोणाच्या शेतात करावयाचे आहे. ते ठरावात नमुद नाही.

2) सिमेंट कॉक्रीट गेटेड बंधारा होनवडज, तालुका मुखेड याची नोंद देयकावर नमुद मात्र मोजमाप पुस्तिका दर्शविली नाही.

3) गेटेड सिमेंट बंधारा धनज (खु), तालुका लोहा बंधारा कोठे बांधायचा कोणाच्या सर्व्हे नंबर शेतात बांधायचा याबाबत ग्रामपंचायत ठरावात नाव नमुद नाही.

4) निविदा कराराची नोंद जिल्हा परिषद लेखासंहीता नमुना क्रमांक 48 नोंदवहीत नोंद घेण्यात आली नाही.

5) जिल्हा परिषद लेखासंहीता नमुना क्रमांक 39 मालमत्ता नोंदवही व नमुना 69 मध्ये पुर्ण झालेल्या कामाची नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना नोंदी घेतल्याचे दर्शविले नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक सिमेंट साहीत्य 1049/प्र.क्र.56/35 दिनांक 30/06/2000 नुसार सिमेंट / मुरुम / खडी इत्यादीचा वापर करण्यापुर्वी शासकिय प्रयोग शाळेकडून गुणवत्ता चाचणी करुन व सदरचे प्रमाणपत्र प्राप्त करुन नंतरच प्रत्यक्षात कामाला सुरुवात करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नाही.

7) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तकातील परिशिष्ट 24 मधील नियम 12 नुसार नोंद केलेली मोजमापे गुत्तेदाराने स्वीकारल्याचे दर्शक म्हणुन संबंधीत गुत्तेदाराची स्वाक्षरी मोजमाप पुस्तकात घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

**3.439 सिमेंट गेटेड बंधारा क्रमांक 01 माळझरा, तालुका हदगाव कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 41) -** सन 2014-2015 या कालावधीचे लघू पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 38,451/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बी-1 निविदा फॉर्म मध्ये काम कोणत्या दराने करावयाचे याबाबत दर नमुद केले नाहीत.

2) सुर्यभान भीसे यांच्या शेताच्या 7/12 दिनांक 03/02/2014 चा असतांना ग्रामपंचायत ठराव 10/08/2013 रोजी कसा घेतला याबाबत खुलासा करावा.

3) अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 11 चे काम केले नाही.

4) अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 08 चे जादा प्रदान रूपये 1,162/- वसूल करावे.

5) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 नुसार मंजुर निविदा कराराची नोंद नमुना 48 मध्ये नोंदविण्यात आली नाही.

**3.440 सिमेंट गेटेड बंधारा कामावरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 47) -** सन 2014-2015 या कालावधीचे लघू पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 15,83,627/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायत कौंडूर बंधारा क्रमांक 2 बी-1 निविदा फॉर्म मध्ये काम कोणत्या दराने करावयाचे याबाबत दर नमुद केले नाहीत.

2) प्रमाणक क्रमांक 1466,दिनांक 31/03/2015 रुपये 63,655/- चे देयकातुन कामगार विमा रुपये 4,996/- व कामगार उपकर रुपये 4,996/-कपात करणे आवश्यक असतांना प्रत्येकी 4,586/- रूपये कपात केले असुन, कमी कपात विमा रुपये 410/- व उपकर रुपये 410/- वसुल करुन कामगार कल्याण मंडळाकडे व विमा संचालनालयाकडे जमा करावा.

3) ग्रामपंचायत माळझरा बंधारा मोजमाप पुस्तीका क्रमांक 488 दर्शविली नाही.

4) ग्रामपंचायत दाभाड बंधारा ग्रामपंचायत ठरावात बंधारा कोठे करावयाचा आहे नमुद नाही.

**3.441 कोल्हापूर पध्दतीचा बंधारा, बोरवंटी, तालुका कळंब.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 या वित्तीय वर्षात कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा बोरवंटी बांधकामावर रक्कम रुपये 1,78,104/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे परिशिष्ट 1 चे नियम 1(ड) नुसार जिल्हा परिषदेचा वित्तीय सल्लागार म्हणून मुख्य लेखा व वित्त अधिका-याशी विचार विनिमय केल्याशिवाय कोणत्याही प्राधिका-याकडून वित्तीय मंजूरी देण्यात येणार नाही आणि कोणताही व्यवहार प्रकल्प / प्रस्ताव त्याच्या वित्तीय औचित्याबाबत त्यांचे मत घेतल्याशिवाय करण्यात येणार नाही. तथापि वित्त विभागाचा सल्ला अव्हेरून प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 125(1) प्रमाणे सदरील कामास प्रशासकिय मान्यता घेण्यापूर्वी अधिनियमाचे कलम 109 प्रमाणे सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी घेतलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 100 अन्वये सदरील कामासाठी वित्त विभागाची सहमती घेणे आवश्यक असताना लघूपाटबंधारे विभागाद्वारा टिपणी क्रमांक 13 मध्ये नमुद त्रुटीची पूर्तता न करताच वित्त विभागाचा सल्ला अव्हेरून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकिय मान्यता प्रदान केली आहे.

4) सदर कामात वाढीव खर्च हा मंजूर अंदाजपत्रकामध्ये नमुद असलेल्या पात्र खोलीपेक्षा (Foundation Level) 0.32 मीटर जादा खोदकाम करावे लागल्याने बांधकामाच्या परिमाणात वाढ झाल्याचे नमुद आहे. त्यामुळे सुधारित अंदाजपत्रक बनवावे लागले. तथापि स्टँडर्ड स्पेशीफ़िकेशन B.1.4 नुसार अंदाजपत्रकात नमुद परिमाणापेक्षा जादा खोदकाम करुन वाढीव खर्च झाला तर ती कंत्राटदाराची जबाबदारी राहील असे स्पष्ट नमुद आहे. वाढीव खोदकामामुळे झालेला जादा खर्च रक्कम रुपये 1,78,104/- लेखापरिक्षणात अमान्य करण्यात येतो. याबाबत जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

5) सदरील कामास सुधारीत प्रशासकिय मान्यता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक 07/10/2014 रोजी प्रदान केलेली आहे. सदर कामाचा सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव विलंबाने सादर करणा-या शाखा अभियंता, उप अभियंता यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करावी असे नमुद आहे. त्यांचेवर कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

6) सदरील कामाची निविदा मंजूरी वित्त विभागाचे अभिप्राय न घेताच दिनांक 09/03/2011 ला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंजूर केलेली आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

7) सुधारीत प्रशासकिय मान्यता रक्कमेवर दंड आकारणी लागू करावी असे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी टिपणी क्रमांक 130 मध्ये नमुद केले आहे. तथापि सुधारीत प्रशासकिय मान्यता रक्कम रुपये 17,76,100/- वर दंड आकारणी न करता रक्कम रुपये 16,05,624/- वर दंड आकारणी केली त्यामूळे रक्कम रुपये 17,048/- कमी दंड आकारणी झालेली आहे. कमी वसुल दंडाची रक्कम रुपये 17,048/- वसुल करुन जिल्हा परिषद खाती भरणा करणे आवश्यक आहे.

8) कामाची मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता त्यात Providing & laying M-100 CC या बाबीचे काम 98.57 येत असताना 99.09 दर्शविण्यात आले आहे जे 0.52 ने जादा आहे. व दर रुपये 2,556.75 प्रमाणे रुपये 1,330/- ने जादा प्रदान झाले आहे. रक्कम रुपये 1,330/- संबंधिताकडून वसुल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

9) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33,दिनांक 21/12/2000 मधील तरतुदी नुसार संबधीत शाखा अभियंता, उपअभियंता यांनी मोजमाप पुस्तकात दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे कामाची तपासणी केव्हा करण्यात आली याबाबत पडताळणी करता आली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 197 नुसार नमुना क्रमांक 69 पूर्ण कामाची नोदंवही ठेवून त्यामध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. सदर नोदंवही लेखा परिक्षणात तपासली असता नमुना क्र. 69 साध्या रजिस्टर मध्ये ठेवलेली आहे. परंतु त्यामध्ये उपरोक्त कामांच्या नोंदी घेतलेल्या नाही. योजना निहाय, तालुका निहाय, वर्ष निहाय कामांच्या नोंदी नाहीत, रकाना क्र. 1 ते 9 पूर्ण भरलेले नाहीत. नोंदवहीत कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

11) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपा2009/प्र.क्र.180/परा-8,दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्येक कामाचे ठिकाणी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक बसविण्यात येईल. परंतु वरील सर्व कामांचे ठिकाणी फलक बसविल्याबाबत कोणतीच नोंद मोजमाप पुस्तिकेत, संचिकेत पहावयास मिळाली नाही.

12) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण.2008/प्र.क्र.152/यंत्रकक्ष-बां.सा.,दिनांक 18/11/2009 नुसार कंत्राटदाराने आणलेल्या सर्व साहित्याची चाचणी व परिक्षणानंतर योग्य ते साहित्य कामावर प्रत्यक्ष उपयोगात आणण्यात येईल असे पहावे. सदर कामावर वापरलेले सिमेंट, स्टील, खडी, वाळू, दगड इत्यादीचे प्रयोगशाळेतुन चाचणी करुन घेण्यात आल्याबाबत चाचणी अहवाल संचिकेत नाहीत. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

13) कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के कामाची तपासणी केल्याचे मोजमाप पुस्तिेकत स्वाक्षरी केलेली आहे. परंतू प्रत्येक कामाची रुपये 50,000 चे प्रत्येक टप्प्यात तपासणी केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 168 नुसार योग्य ती कार्यवाही केलेली नाही.

**3.442 पाझर तलाव कामे व सिमेंट नाला बंधारे योजनांतर्गत कामातील अनियमितताबाबत (उप विभाग कळंब, उमरगा, उस्मानाबाद, परंडा, तुळजापूर).**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9,10,11,12,13) -** लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद, सन 2014-2015 या वित्तीय वर्षात खालील प्रमाणे पाझर तलाव कामे योजना अंतर्गत 24 कामावर रक्कम रुपये 1,45,37,560/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक जिपर.2009/प्र.क्र.180/ पंरा.8,दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाचे ठिकाणी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक बसविण्यात यावेत, परंतु कामाचे ठिकाणी फलक बसविण्यात आल्याबाबत कोणतीच नोंद पहावयास मिळाली नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण 2008/प्र.क्र.152/यंत्रकक्ष-बां.सा.,दिनांक 18/11/2009 नुसार कंत्राटदाराने आणलेल्या सर्व साहित्याची चाचणी व परिक्षणा नंतर योग्य ते साहित्य कामावर प्रत्यक्ष उपयोगात आणण्यात येईल असे पहावे, सदर कामावर ठेकेदाराने साहित्य वापरले आहे. परंतु त्याबाबत जमेच्या व वापराच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

3) सार्वजनिक बांधकाम विभाग, नियम पुस्तिका 1984 मधील परिशिष्ट क्रमांक 24(13 व 15) नुसार देयकाचे प्रदानाचे वेळी मोजमाप पुस्तकातील नोंदी लाल शाईने रद्द करुन प्रदान करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक लपायो/2008/प्र.क्र.153/जल-1,दिनांक 30/06/2008 नुसार कोणत्याही परिस्थितीत अपुर्ण कामे पुर्ण केल्याशिवाय नविन कामे सुरु करु नयेत, अशा स्पष्ट सुचना असतांना विभागाकडील बरीच कामे अपुर्ण असतांना ती पुर्ण करुन घेण्याविषयी कोणतीही उपाययोजना न करता नवीन काम हाती घेवुन त्यावर खर्च करण्यात आलेला आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 107 नुसार मुळ बांधकामाचे नकाशे व अंदाज, त्यांना सक्षम प्राधिकाऱ्याची आवश्यक ती प्रशासकीय मान्यता लेखी मिळाल्यावर तयार करण्यात येतील. असे स्पष्ट नियम असतांना वरील प्रमाणे सर्व कामास प्रशासकीय मान्यता मिळण्यापुर्वीच तांत्रिक मंजुरी प्रदान केलेली आहे.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 21/12/2000 मधील तरतुदीनुसार संबधीत शाखा अभियंता, उपअभियंता यांनी मोजमाप पुस्तकात दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे कामाची तपासणी केव्हा करण्यात आली याबाबत पडताळणी करता आली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 147 नुसार मंजुर करण्यात आलेला करारनामा नोंदवही नमुना क्रमांक 48 ठेवण्यात आली आहे. परंतु सदरील नोंदवहीत कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. काही रकाने पूर्ण भरलेले नाहीत. सदरील नोंदवही पूर्ण करणे आवश्यक आहे.

8) दुधाळवाडी या कामाचे आदेश दिनांक 11/09/2014 नुसार काम पुर्ण करण्याची मुदत दिनांक 31/01/2015 पर्यंत होती त्यानुसार सदर काम दिनांक 31/01/2015 रोजी पुर्ण होणे आवश्यक होते, परंतु विभागाने दिनांक 31/03/2015 रोजी प्रथम धावते देयक पारीत केल्याने सदर काम प्रत्यक्षात पुर्ण झालेले नाही. कामासाठी मुदतवाढीची मागणी केलेली नसतांना व मुदतवाढ मंजुर केलेली नसतांना दिनांक 31/03/2015 रोजी धावते देयक कसे प्रदान करण्यात आले. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148(2) मधील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत खुलासा हाणे आवश्यक आहे.

9) कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के कामाची तपासणी केल्याचे मोजमाप पुस्तिेकत स्वाक्षरी केलेली आहे. परंतू प्रत्येक कामाची रुपये 50,000 चे प्रत्येक टप्प्यात तपासणी केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 168 नुसार योग्य ती कार्यवाही केलेली नाही.

**3.443 कोल्हापूरी पद्धतीचा बंधारा क्रमांक-1 तुरोरी उर्वरित कामाबाबत ब-1 निविदा खंड 3 (क) खाली रद्द केलेल्या कामाचा वाढीव खर्च वसूल न केलेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 24) -** लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबादने कोल्हापूरी पद्धतीचा बंधारा क्रमांक एक तुरोरी उर्वरीत कामावर रुपये 2,50,316/- खर्च केलेला आहे. सदरचे मुळ काम कंत्राटदार कुन्हाळी मजूर सहकारी संस्था यांनी काम अर्धवट ठेवल्यामुळे जिल्हा परिषदेने कार्यकंत्राटाचा ठेका रदद करुन नव्याने निविदा मागवून कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा क्रमांक-1 मौजे तुरोरी हे काम पूर्ण करुन घेतले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) चेअरमन कुन्हाळी मजूर सहकारी संस्था मर्यादीत कुन्हाळी यांना कोल्हापूरी पद्धतीचा बंधारा क्रमांक-1 तुरोरी ता.उमरगा हे काम अंदाजपत्रकीय दराने देण्यात आले होते व सदर कामाची मुदत दिनांक 30/06/2009 पर्यत होती. कंत्राटदारास दिनांक 14/04/2011 पर्यत मुदतवाढ देवूनही कंत्राटदाराने काम अपूर्ण ठेवल्यामुळे जिल्हा परिषदेने काम आहे त्या स्थितीत अंतिम करुन निविदा अटी व शर्ती खंड 3(क) खाली दिनांक 08/08/2013 ला ठेका रद्द केला. तथापि सदर कंत्राटदारास काळया यादीत टाकल्याबाबतची कागदपत्रे संचीकेत उपलब्ध नाहीत. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) चेअरमन कुन्हाळी मजूर सहकारी संस्था मर्यादीत कुन्हाळी यांनी रुपये 13,12,227/- चे काम केले. उर्वरित कामाची रक्कम रुपये 2,19,276/- दरवाढीमुळे रुपये 2,84,519/- एवढी झाली. विहित मुदतीत काम पूर्ण न झाल्याने शासनास सदर कामावर वाढीव खर्च करावा लागला आहे.

3) कोल्हापूरी पद्धतीचा बंधारा क्रमांक-1 तुरोरी ता. उमरगा या कामावर खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे. मुळ निविदा किंमतीप्रमाणे सदरचे बांधकाम रुपये 14,99,163/- च्या मर्यादेत पूर्ण होणे आवश्यक असताना सदर बांधकामावर रुपये 15,62,543/- एवढा खर्च झालेला आहे. "ब-1" निविदेच्या अटी व शर्ती खंड 3(क) खाली ठेका रद्द केल्यामुळे वाढीव खर्चाची रक्कम रुपये 63,380/- मुळ कंत्राटदार चेअरमन कुन्हाळी मजूर सहकारी संस्था मर्यादीत कुन्हाळी यांचेकडून वसूलीची कार्यवाही केलेली नाही. सबब वाढीव खर्चाची रक्कम रुपये 63,380/- वसुल करुन शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

**3.444 कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा क्रमांक 1 कामातील अनियमीतता (मौजे शिरोळ, मौजे मनचातांडा, तालुका उदगीर).**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4 व 8) -** लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, लातूर. सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणाचे वेळी निवड महिन्या व्यतिरिक्त इतर महिन्यातील उपरोक्त कामाच्या संचिकाची तपासणी केली असता सदरील कामावर अनुक्रमे रक्कम रुपये 13,72,688/- व रक्कम रुपये 12,36,385/- एकूण रक्कम रुपये 26,36,073/- एवढा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) महाराष्ट्र शासन, राजपत्र विक्रीकर आयुक्त, मुंबई याची अधिसूचना दिनांक 4 एप्रिल 2012 नुसार मूल्यवर्धितकर अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या कंत्राटदाराकडून 2 टक्के प्रमाणे मूल्यवर्धितकर वसूल करावा व मूल्यवर्धितकर अधिनियमाखाली नोंदणी न झालेल्या कंत्राटदारा कडून 5 टक्के प्रमाणे मूल्यवर्धितकर वसूल करण्यात यावा. सदरील कामाचे देयकातून 5 टक्के प्रमाणे दोन्ही कामांतील अनुक्रमे रक्कम रुपये 64,857/- व रक्कम रुपये 44,061/- एकूण रक्कम रुपये 1,08,918/- एवढा मूल्यवर्धितकर कमी कपात केलेली आहे. संबधित कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारन विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2009/ प्र.क्र.514/वित्त-9,दिनांक 20/11/2009 नुसार निविदा मुल्य रुपये 10,00,000/- पर्यंत रुपये 100/- व त्या पेक्षा अधिक असेल तर रुपये 10 लक्ष रुपयाच्या वरील प्रत्येक रुपये 1 लक्ष रुपयासाठी किंवा त्याच्या भागासाठी रुपये 100/- महसुली मुंद्राक वर कार्यकरार करणे आवश्यक आहे. सदरील कामाचा रुपये 500/- च्या महसुली मुंद्राक वर

करारनामा करणे आवश्यक असताना करारनामा केलेला नाही त्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे. तरी रक्कम रुपये 400/- संबधीताकडुन वसुल करुन शासन खाती भरणा आवश्यक आहे.

3) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार कंत्राटदाराचे देयकातून आयकराची रक्कम 2.30 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 31,571/- व रक्कम रुपये 29,057/- एकूण रक्कम रुपये 60,628/- कपात केलेली नाही. संबधित कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/ 44/33,दिनांक 22/12/2000 नुसार मोजमाप पुस्तिकेत नोंद घेणाऱ्या अभियंता यांनी मोजमापाच्या नोंदी घेतल्या नंतर मोजमाप पुस्तिकेत दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे तथापी अशी कार्यवाही झालेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 नुसार अंतिम मोजमाप घेवून रक्कम प्रदान केल्यानंतर मोजमापावर लाल शाईने कर्ण रेषा मारावयास पाहिजे परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

6) सदरील कामाच्या संचिकेत काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणात दिसून आले नाही. त्यामुळे काम विहित मुदतीत पुर्ण झाले किंवा मुदतवाढ दिलेली आहे. याची खात्री करता आली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 168 अन्वये कार्यकारी अभियंता यानी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे तथापि, कार्यकारी अभियंता यानी अशी तपासणी केलेली नाही. तरी कार्यकारी अभियंता यानी तपासणी न केलेल्या सर्व कामाची उच्चस्तीय अधिका-याकडून प्रशासकीय व तांत्रीक तपासणी करण्यात यावी.

**3.445 मौजे झरी (बु.) तालुका चाकूर येथील कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा क्रमांक 6 व 7 तसेच मौज दिग्रज, तालुका उदगिर येथील कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा कामाबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर**, **सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10**,**11 व 18) -** लघुपाटबंधारे विभाग जिल्हा, परिषद लातूर. सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात निवड महिन्यातील कामाच्या संचिकाची तपासणी केली सदरील कामावर एकूण रक्कम रुपये 23,31**,**757/- एवढा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1**)** आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 **(**क) नुसार कंत्राटदाराचे देयकातून आयकराची रक्कम 2.30 टक्के प्रमाणे तिन्ही कामातून अनुक्रमे रक्कम रुपये 13**,**330/-, रक्कम रुपये 11,197/- व रक्कम रुपये 29,103/- एकूण रक्कम रुपये 53,630/- कपात करणे आवश्यक असताना देयकातून कपात झालेली नाही. आयकराची रक्कम रुपये 53**,**630/- संबधित कंत्राटदारा कडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) सदर निविदेतील विवरणपत्र मधील माहिती निविदाकारानी भरलेली नाही. त्यामुळे निविदाकाराकडील उपलब्ध हत्यारे व संयंत्रे**,** तांत्रिक कर्मचारी व मजूर इत्यादी आवश्यक बाबी त्यांच्या कडे असल्याची लेखा परीक्षणास खात्री करता आली नाही सदर उणीवा असताना निविदा स्विकारली आहे**.**

3) महाराष्ट्र शासन**,** ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक विकास-2011/प्र.क्र./ 217**/**पंरा-8, दिनांक 15/11/2011 मधील अनु. क्रमांक 4 नुसार ग्रामपंचायत स्वत: काम करणार असल्यास व कंत्राटदार नेमणार नसल्यास खरेदी करावयाच्या मटेरियल च्या प्रत्येक बाबी जर साहित्याची किंमत रुपये एक लक्ष पेक्षा जास्त असल्यास खरेदी इत्यादी निविदेद्वारे करावी व त्या पेक्षा कमी किंमतीची सामुग्री किमान तीन कोटेशन मागवून व आय.एस.आय.मार्क प्रतीची खरेदी करावी तथापी अशी कार्यवाही केल्याची खात्री करता आली नाही**.**

4) ग्रामपंचायतीस रक्कम मिळाल्या बाबत नमुना नंबर 7 ची सामान्य पावती घेण्यात आलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन**,** ग्रामविकास व जलसंधारण विभाग**,** शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/ 44/33,दिनांक 22/12/2000 नुसार मोजमाप पुस्तिकेत नोंद घेणाऱ्या अभियंता यानी मोजमापाच्या नोंदी घेतल्या नंतर मोजमाप पुस्तिकेत दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे तथापी अशी कार्यवाही झालेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-1099/ प्र.क्र.54/08, दिनांक 20/05/1999 मधील परिच्छेद (ब) नुसार कामाचा नामफलक बसविल्याचे छायाचित्र आढळून आले नाही. त्यामुळे शासन आदेशानुसार संबधीताचे प्रभावी संनियंत्रण व पर्यवेक्षण असल्याचे दिसून येत नसून फलक बसविल्याचे प्रमाणपत्रा शिवाय कामाच्या देयकाची रक्कम अदा झालेली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 168 अन्वये कार्यकारी अभियंता यानी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे तथापि, कार्यकारी अभियंता यानी अशी तपासणी केलेली नाही. तरी कार्यकारी अभियंता यानी तपासणी न केलेल्या सर्व कामांची उच्चस्तरीय अधिका-याकडून प्रशासकीय व तांत्रीक तपासणी करण्यात यावी.